म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. १७६१

BVBK-0400946

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा:
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ..९.... दिनांक ......
विषय क्र. ......

म. ग्रं. सं. कार्य, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ...९४९ दिनांक .....
विषय ..किशोर.. क्र. ...443..

BVBK-0400946

# प्रतापगड

: लेखक :

परशुराम रामचंद्र दाते

किंमत ३ रुपये

प्रथम आवृत्ती सन १९७० प्रती १०००
द्वितीय आवृत्ती सन १९७२ प्रती १०००

लेखक : प. रा. दाते, पेण

प्रकाशक : प. रा. दाते, मु. पो. पेण, जि. कुलाबा

प्रथमावृत्ती प्रसिद्धी : विजया दशमी, १० ऑक्टोबर सन १९७०

द्वितीयावृत्ती प्रसिद्धी : विजया दशमी, १७ ऑक्टोबर सन १९७२

मुद्रक : व्यं. रा. शिगरे,
सर्वोदय मुद्रणालय, ४५० बुधवार पेठ, पुणे २

ठसे : के. जोशी आणि कं., पुणे

*सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

# अर्पणपत्रिका

श्रीशिवछत्रपतींच्या आदेशानुसार स्वतःच्या जीविताची, स्वार्थाची अगर कसलीही पर्वा न करता सध्याच्या बिहार बंगाल प्रांताच्या सीमेवरच्या श्रीश्वेतगंडकी व त्रिशूलगंडकी संगमापर्यंत जाऊन तुळजा भवानीची प्रतिकृती सांभाळून नेऊन शालीग्राम शीला शोधून काढून व नेपाळी कारागिरां-कडून घडवून ज्यांनी महत्प्रयासाने प्रतापगडची तुळजामाता प्रतापगडापर्यंत अनवाणी खांद्यावर वाहून आणली त्या महाराष्ट्रावर उपकारकर्त्या श्री. मंबाजीबुवा पाणसरे व त्यांचे अनामिक-सहकारी यांना प्रतापगडाचा हा वृत्तांत आदराने कर्तव्य म्हणून अत्यंत विनम्र भावाने अर्पण केला आहे.

विनम्र

परशुराम रामचंद्र दाते

..१८
वे मि5वीत

## अनुक्रमणिका


- लेखकाचे निवेदन (प्रथमावृत्तीचे)
- डॉ. अ. रा. कुलकर्णी यांची प्रस्तावना
- दुसऱ्या आवृत्तीबद्दलचे लेखकाचे निवेदन

| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रतापगड | १ |
| २ | जावळीचा इतिहास | १० |
| ३ | प्रतापगडाची तुळजाभवानी | १९ |
| ४ | प्रतापगडाचे मार्ग | २९ |
| ५ | बालेकिल्ला | ३४ |
| ६ | मराठी सैन्याची तयारी | ४५ |
| ७ | अफझलखान पारचे खोरे उतरला | ४९ |
| ८ | लढाईची धुमश्चक्री | ५८ |
| ९ | शिवभारतातील वृत्तांत | ६५ |
| १० | युद्धातील नफा–तोटा | ७३ |
| ११ | फतनदासाचा पोवाडा | ७६ |
| १२ | शिवाजी महाराजां[illegible]त्र व शत्रू | ८६ |

# लेखकाचे निवेदन

प्रतापगड व त्याचा आसमंत ही एक पावनभूमी आहे. त्या प्रदेशांत हिंडून फिरून आल्याला बरीच वर्षे होऊन गेली. त्यावेळची टिपणे, दंतकथा उतरलेली वही अनेक वर्षे पडून होती. तिचा उपयोग या लिखाणाचे वेळी झाला.

अनेक पुस्तके वाचली. मराठ्यांचा इतिहास प्रतापसिंह महाराज छत्रपती यांचेपर्यन्तचा वाचला. गडावर श्रीतुळजाभवानी मंदिर, रायगडाचा परिसर, समर्थ रामदासस्वामी यांचे आनंदवनभुवन आणि वाई ते जंजिरा पर्यंतचा मुलूख पायाखाली घातला.

भारत इतिहास संशोधन मंडळाची त्रैमासिके, पत्रसार संग्रहाचे सर्वभाग, गॅझिटिअर्समधील माहिती या सर्वांच्या आधाराने हे लिखाण लिहिलेले आहे. कै. शंकरराव देव यांचे रामदास रामदासीचे जुने अंक व पुस्तके मिळविली व इतर अनेक पुस्तके वाचली. चित्रावशास्त्री यांनी प्रसिद्ध केलेले चरित्रकोश या सर्वांचा उपयोग झाला. शिवभारत, अनेक बखरी, कॅ. मोडक यांचे प्रतापगडचे युद्ध वगैरे ग्रंथही वाचले.

महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची सुप्रभात या प्रतापगडाच्या युद्धातील विजयाने झाली. यानंतरच शिवप्रभूंच्या कर्तृत्वाचा विश्वास महाराष्ट्राला वाटू लागला. शिवाजी हा आदिलशाही सत्तेला खरा शह आहे, हे साऱ्या भारताला कळून चुकले आणि मग प्रतापगडच्या युद्धानंतर पन्हाळा लक्ष्मेश्वरपर्यन्त महाराजांची घोडदौड गेली व तेथे स्थिरावली. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा प्रभात सूर्य उदयास आला.

प्रतापगडावर या युद्धानंतर व अगोदर विशेष असे काही घडलेले नाही. या एका युद्धाने प्रतापगड सर्वांच्या हृदयात बिलगून बसला आणि मग तुळजा-भवानीच्या प्रतिस्थापनेनंतर तर ते एक तीर्थस्थानच झालेले आहे. आज गडावरची वसती भवानी मातेच्या वास्तव्यामुळेच आहे हे सत्य आहे.

म्हणून गडाबाबतचा इतिहास लिहून काढण्याचे मनात आले व आज ते सर्व कथन वाचकांसमोर पुस्तकरुपाने ठेवीत आहे.

या कामी पेणच्या श्री मुद्रणालयाचे मालक श्री. सुगवेकर, दि पेणको-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे डायरेक्टर बोर्ड, महाडचे श्री. श्रीकृष्ण सीताराम रानडे व कुलाबा, रत्नागिरी जिल्हा परिषदेची शिक्षण खाती, मुंबई व पुणे महापालिका, कुलाब्याचे व महाराष्ट्र राज्याचे प्रसिद्धी अधिकारी यांनी मोठी मोलाची मदत दिली त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

महाराष्ट्र गॅझेटिअर्स ऑफीसचे पूर्वीचे संचालक श्री. सेतुमाधव पगडी व सध्याचे संचालक श्री. भ. ग. कुंटेसाहेब यांनी वेळोवेळी माहिती देण्यात तत्परता दाखविली. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांचे चिटणीस श्री. ग. ह. खरे वगैरे नामवंत इतिहास जाणकारांनी वेळोवेळी मदत केली. त्याबद्दल कृतज्ञता प्रकट करणे हे माझे कर्तव्यच आहे. प्रस्तावना श्री. अ. रा. कुलकर्णीसाहेब यांनी लिहून देऊन मला अक्षरशः ऋणी केले आहे.

या पुस्तकात पहिल्या दोन विभागात द्विरूक्ती झालेली आहे असे वाचकांना वाटण्याचा संभव आहे. परंतु नवी माहिती देताना विद्यार्थ्यांच्याच दृष्टीने मागील इतिहास पुन्हा एकवार सांगून मग नवा मुद्दा मी लिहिला आहे जाणकार वाचकांनी त्याबद्दल मला क्षमा करावी.

हा इतिहास आहे हे वाचकांनी ध्यानी घ्यावे. नव्या पिढीला काय घडले याचे यथार्थ दर्शन लेखनाद्वारे देण्याची आज नितांत गरज आहे म्हणूनच प्रतापगडच्या या युद्धाबद्दलचा भाग गडाच्या स्थलवर्णनाबरोबरच मी लिहीलेला आहे.

मराठी वाचकांना माझी ही कृती आवडावी असे मला वाटते. तरीही काही राहिले असले तर सर्वांनी मला क्षमा करावी.

भवदीय विनम्र

**प. रा. दाते**

# प्रस्तावना

**डॉ. अ. रा. कुलकर्णी,** एम. ए., एलएल. बी., पी. एच. डी.
(**प्रोफेसर, डेक्कन कॉलेज**; पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख)

'प्रतापगड' हे मराठ्यांचे एक सदैव स्फूर्तिस्थान ठरले आहे. प्रतापगडावर मराठी राज्याचे संस्थापक छत्रपति शिवाजी महाराजांनी परकीय सत्तेविरुद्ध आपली शक्ति आजमावून पाहिली होती. प्रतापगडावरील तुळजाभवानीने मराठी राज्याला आशिर्वाद दिला आणि तिच्या कृपाप्रसादाने हे राज्य भरभराटीस आले होते. अशा या प्रतापगडाचे आकर्षण मराठी मनाला नेहमीच होत राहिले आहे. श्री. प. रा. दाते यांचे प्रस्तुतचे पुस्तक "**प्रतापगड**" हे या आकर्षणाचेच फलित होय.

प्रतापगडाची माहिती यापूर्वी श्री. पारसनीस यांच्या महाबळेश्वर या ग्रंथात आणि कॅप्टन मोडकांच्या 'प्रतापगडाचे युद्ध' या ग्रंथात विस्तृतपणे आली आहे. प्रतापगडावरील तुळजाभवानीची कुळकथा श्री. आवळसकर यांच्या पोतदार स्मृती ग्रंथातील लेखांत आली आहे. ही सर्व सिद्धसाधने, आणि शिव चरित्रासंबंधीची अस्सल कागदपत्रे, सभासदी, चिटणीशी इत्यादी बखरी, आणि पवाडे यांच्या साहाय्याने श्री. दाते यांनी आपल्या ग्रंथाची रचना केली आहे. एक संशोधनपर संदर्भ ग्रंथ असा उल्लेख या ग्रंथाचा करता येणार नसला तरी प्रतापगडाची माहिती थोडक्यांत करून देणारा आणि अस्सल कागदांची दखल घेणारा एक उपयुक्त उपक्रम श्री. दाते यांनी येथे केला आहे असे मान्य करावे लागेल.

प्रतापगडाचा परिसर वर्णन करीत असताना कोणत्याही लेखकाला प्रथम मोऱ्यांच्या जावळीची आठवण होणे स्वाभाविक आहे. जावळीच्या राज्याची मर्यादा म्हणजे आजच्या सातारा जिल्ह्याचा बराचसा भाग अधिक कोकणचा काही भाग असे सांगता येईल. स्वराज्याच्या उपक्रमांत जावळीचे ठाणे शिवाजीराजांच्याकडे असणे आवश्यक होते. शिवभारतकार परमानंद यांनी

या जयवल्लीचे (जावळीचे) दुर्जयपुरी असे वर्णन केले आहे. 'गुप्त वाटा' असलेली, सह्याद्रीच्या लगत्यास बसलेली, दाट झाडी असलेली, किल्यांचा आश्रय असलेली, गिरीतटांच्या मध्ये असलेली' अशी ही जावळी (अध्याय १८:४ ते ६) स्वराज्याच्या संरक्षणाच्या आणि वाढीच्या दृष्टीने आपल्याकडे असणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटत होते. "ज्याच्या ताब्यात जावळी आहे त्याच्या ताब्यात वाई प्रांत पूर्णपणे आहे; त्याचप्रमाणे सर्व सह्याद्री आणि समुद्र किनाराही आहे." (अ. १८ : १३, १४) अशी मुत्सद्यांची खात्री होती. तेव्हा असे हे महत्वपूर्ण जावळीचे खोरे, मोऱ्यांचे पारिपत्य करून जिंकून घेण्याचा पहिला आक्रमक पवित्रा शिवाजी महाराजांनी घेतला आणि १६५६ च्या सुरवातीस जावळी बळकावली व दुर्गम अशा प्रदेशांत आपला शिरकाव करून घेतला. जावळीच्या मागोमाग प्रतापगड आणि राजगड हे किल्ले स्वराज्यात दाखल झाले आणि मराठ्यांचा इतिहास घडविण्यात त्यांनी फार मोठी कामगिरी बजाविली.

प्रतापगड किल्ला म्हणजे पारघाटचा रखवालदार होय. १६५६ साली मराठी राज्याचा एक प्रमुख प्रशासक मोरोपंत पिंगळे यांनी याची मांडणी केली. भोरप्या डोंगर नावाने ओळखल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या एका शिखरावर हा मराठी राज्याचा तुरा उभा आहे. याच्या परीसरात तोरणा, रायगड, राजगड, वासोटा, सातारा, चंदनवंदन, पुरंदर असे महत्त्वाचे आणि अगदी शेजारी चंद्रगड, मकरंदगड, सोनगड, कांगोरी किल्ले आपल्याला दिसतात.

श्री. दाते यांनी प्रतापगडाचा हा प्रारंभीचा इतिहास आणि त्या किल्यांच्या काही अंगाचे वर्णन केले आहे. यानंतर जावळीचा इतिहास, प्रतापगडाच्या तुळजाभवानीची हकीगत दिली आहे. प्रतापगडावर कसे जावे या संबंधीची या पुस्तकातील माहिती प्रवाशांस उपयुक्त ठरावी. गडावरील दर्गा, अफझुल बुरुज, बालेकिल्ला इत्यादी भागांचे वर्णन केल्यानंतर या किल्ल्यावर घडलेल्या एका महत्त्वपूर्ण घटनेचे वर्णन करून नवजात मराठी राज्यावर आलेले यावनी अरिष्ट शिवाजी महाराजांच्या चातुर्यामुळे आणि प्रसंगावधानाने कसे टळले याची साद्यंत हकीगत श्री. दाते यांनी दिली आहे.

प्रतापगडाच्या युद्धाची पूर्वतयारी कशी चालली होती, मराठी सरदारांना आपल्याकडे ओढण्याचे प्रयत्न आदिलशाही आणि मराठेशाही कसे करीत होत्या याची हकीगत श्री. दाते यांनी कागदपत्राच्या सहाय्याने मांडली आहे. जावळी खोऱ्यात खानाला आणण्यात शिवाजीराजांच्या मुत्सद्देगिरीने उच्चांक गांठला होता. जावळीत आल्यावर खानाला काय वाटले आणि शिवाजी-राजांना काय वाटले याचे कवींद्र परमानंदाने केलेले विश्लेषण महत्वाचे आहे. शिवाजीराजाला आपण कोंडीत पकडले असे खानाला वाटत होते तर खान माझ्या हाती गवसला, आता तो कसा निसटतो ते पाहतो असा महा-राजांना आत्मविश्वास वाटत होता.

विजापूर दरबारची या सुमारास परिस्थिती दयनीय होती. अलि अदिल शहा हा नुकताच गादीवर आला होता आणि राज्यकारभाराची सूत्रे ‘ बडीसाहेबा ’ म्हणजे त्याच्या आईकडे होती. दरबारात वातावरण तंग होते. सैन्याची कमतरता होती, आणि शिवाजीराजांचा पुंडावा थंड करावयास उमरावांना एकतर सवड नसावी किंवा कोणासही जबाबदारी पत्करण्याची हिंमत नसावी. ‘ कुल, वजीर, उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरि रवाना करावे म्हणोन पुसतां कोणी कबूल केले नाही, ’ ( सभासद ) – परंतु अफजलखान तयार झाला आणि ‘ शिवाजी काय ; चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो ’ अशी फुशारकी मारून जावलीकडे यावयास निघाला.

लोकांची जमवाजमव करीत असताना महाराजांच्यावतीने कारीच्या जेध्यांनी मावळ खोऱ्यातील लोकांना जे आवाहन केले आहे ते प्रस्तुत संदर्भात अत्यत महत्वाचे आहे. प्रतापगडाच्या युद्धातील यशाचे रहस्य आणि महत्व समजण्यास जेध्यांनी केलेल्या कामगिरीचा उल्लेख आवर्जुन केला पाहिजे. आपल्या परिसरांतील देशमुखांना उद्देशून जेधे यांनी “ हे महाराष्ट्र राज्य आहे. अवघियांनी हिम्मत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन सेवा करावी ” अशा हिंमतीच्या गोष्टी सांगितल्याचा उल्लेख जेधे करीन्यांत येतो. सभासद बखर, जेधे करीना, शिवभारत यांची सांगड घालून श्री. दाते यांनी हे प्रकरण रंगविले असते तर ते अधिक रोचक ठरले असते.

स्वारीचा विडा उचलतांना ' शिवाजीला उंदरासारखा धरून आणतो' (पृ. ५९ ) असे अफझलचे जे उद्गार त्यांनी घातले आहेत त्यापेक्षा सभासद बखरीतील वर्णन नि:संशय प्रभावी आहे.

श्री. दाते यांच्या पुस्तकाचे एक वैशिष्टय म्हणजे या प्रसंगावर अलिकडेच उपलब्ध झालेल्या फतनदासाच्या पोवाडयाचा त्यांनी करून घेतलेला उपयोग हे होय. भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिकांत ( वर्ष ४४ ) हा पोवाडा प्रथम प्रसिद्ध झाला, आणि श्री. दाते यांच्या मते अज्ञानदासाच्या पोवाडयाहून तो अत्यंत महत्वाचा आहे.

या युद्धातील नफ्या–तोटयाचा आणि महाराजांच्या साथीदारांचा देखील श्री. दाते यांनी आढावा घेतला असून पुस्तक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण येथे सुद्धा सभासद आणि शिवभारतकार यांच्या माहितीचा उपयोग अधिक करून घेता आला असता असे वाटते.

प्रतापगड व त्यावर घडलेला इतिहास सामान्य वाचकास कळण्याच्या दृष्टीने श्री. दाते यांच्या पुस्तकाने ऐतिहासिक साहित्यात भर टाकली आहे. ऐतिहासिक ग्रंथ मग तो सामान्य वाचकांसाठी असो अथवा विद्वानांसाठी असो काल, व्यक्ति, स्थल, घटना यांच्याबाबतीत अचूकता साधणे अपरिहार्य असते. यादृष्टीने श्री. दाते यांनी अधिक श्रम घेतले असतें तर काही दोष सहज टाळता आले असते.

काही माहिती अनावश्यक आहे. प्रतापगड युद्धाच्या संदर्भात समर्थ रामदास यांचा उल्लेख आवश्यक वाटत नाही. उदाहरणार्थ पृ. ९ वर शिवथरच्या घळीत रामदासांनी दासबोध लिहिण्याचा उपक्रम केला ही माहिती आणि त्याचबरोबर ' शिवाजी महाराज व रामदास यांचा पत्रव्यवहार अगर भेटीगाठी झाल्या नव्हत्या असे म्हणता येत नाही ' हे विधान अप्रस्तुत वाटते. तसेच पृष्ठ २८ वर अफझलखानवधापूर्वी शिवाजी–रामदास भेट झाली असावी हा निष्कर्ष केवळ ' नारायण ब्राम्हण ' या नावावरून काढला आहे

तो योग्य नाही. किंबहुना शिवाजी – रामदास भेट या वादग्रस्त मुद्यास हात घालण्याची या ग्रंथात आवश्यकता नव्हती.

अर्थात या उणीवांमुळे श्री. दाते यांच्या पुस्तकाची उपयुक्तता कमी झाली आहे असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रांतील एक पिढी मराठ्यांच्या मर्दूमकीच्या इतिहासाने भारावून गेलेली, त्याचे कथन कसे आणि किती करूं अशा भावनेनें प्रेरित झालेली अशी आहे. श्री. दाते हे अशा पिढीतील उत्साही इतिहासप्रेमी अभ्यासक आहेत. पण या पुस्तकाची कांही पाने वाचल्यावर त्यांचे मन अद्याप कसे टवटवीत आहे, इतिहासकाळांत ते कसे रमून जाते याची कल्पना वाचकाला येईल. डोळ्याला दिसत नाही, निरनिराळ्या ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ पाहून तपासून घेणे वार्धक्यामुळे शक्य नाही अशा अवस्थेतही श्री. दाते यांनी छत्रपति शिवाजी महाराजांवरील प्रेम आणि तुळजाभवानी वरील निष्ठा व्यक्त करण्यासाठी हा ' प्रतापगड ' रचला आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. मराठी माणसे त्यांच्या या उपक्रमाचे स्वागत करतील याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

**अ. रा. कुलकर्णी**
पुणे विद्यापीठाच्या इतिहास
विभागाचे मुख्य
प्रोफेसर, डेक्कन कॉलेज, पुणे

पुणे विद्यापीठ
गणेशखिंड,
पुणें–७.
१९ सप्टेंबर, १९७०

स्वारीचा विडा उचलतांना 'शिवाजीला उंदरासारखा धरून आणतो' (पृ. ५९) असे अफझलचे जे उद्‌गार त्यांनी घातले आहेत त्यापेक्षा सभासद बखरीतील वर्णन निःसंशय प्रभावी आहे.

श्री. दाते यांच्या पुस्तकाचे एक वैशिष्टय म्हणजे या प्रसंगावर अलिकडेच उपलब्ध झालेल्या फतनदासाच्या पोवाडयाचा त्यांनी करून घेतलेला उपयोग हे होय. भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिकांत ( वर्ष ४४ ) हा पोवाडा प्रथम प्रसिद्ध झाला, आणि श्री. दाते यांच्या मते अज्ञानदासाच्या पोवाडयाहून तो अत्यंत महत्वाचा आहे.

या युद्धातील नफ्या-तोटयाचा आणि महाराजांच्या साथीदारांचा देखील श्री. दाते यांनी आढावा घेतला असून पुस्तक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण येथे सुद्धा सभासद आणि शिवभारतकार यांच्या माहितीचा उपयोग अधिक करून घेता आला असता असे वाटते.

प्रतापगड व त्यावर घडलेला इतिहास सामान्य वाचकास कळण्याच्या दृष्टीने श्री. दाते यांच्या पुस्तकाने ऐतिहासिक साहित्यात भर टाकली आहे. ऐतिहासिक ग्रंथ मग तो सामान्य वाचकांसाठी असो अथवा विद्वानांसाठी असो काल, व्यक्ति, स्थल, घटना यांच्याबाबतीत अचूकता साधणे अपरिहार्य असते. यादृष्टीने श्री. दाते यांनी अधिक श्रम घेतले असतें तर काही दोष सहज टाळता आले असते.

काही माहिती अनावश्यक आहे. प्रतापगड युद्धाच्या संदर्भात समर्थ रामदास यांचा उल्लेख आवश्यक वाटत नाही. उदाहरणार्थ पृ. ९ वर शिवथरच्या घळीत रामदासांनी दासबोध लिहिण्याचा उपक्रम केला ही माहिती आणि त्याचबरोबर 'शिवाजी महाराज व रामदास यांचा पत्रव्यवहार अगर भेटीगाठी झाल्या नव्हत्या असे म्हणता येत नाही' हे विधान अप्रस्तुत वाटते. तसेच पृष्ठ २८ वर अफझलखानवधापूर्वी शिवाजी-रामदास भेट झाली असावी हा निष्कर्ष केवळ 'नारायण ब्राम्हण' या नावावरून काढला आहे

तो योग्य नाही. किंवहुना शिवाजी – रामदास भेट या वादग्रस्त मुद्यास हात घालण्याची या ग्रंथात आवश्यकता नव्हती.

अर्थात या उणीवांमुळे श्री. दाते यांच्या पुस्तकाची उपयुक्तता कमी झाली आहे असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रांतील एक पिढी मराठ्यांच्या मर्दूमकीच्या इतिहासाने भारावून गेलेली, त्याचे कथन कसे आणि किती करूं अशा भावनेनें प्रेरित झालेली अशी आहे. श्री. दाते हे अशा पिढीतील उत्साही इतिहासप्रेमी अभ्यासक आहेत. पण या पुस्तकाची कांही पाने वाचल्यावर त्यांचे मन अद्याप कसे टवटवीत आहे, इतिहासकाळांत ते कसे रमून जाते याची कल्पना वाचकाला येईल. डोळ्याला दिसत नाही, निरनिराळ्या ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ पाहून तपासून घेणे वार्धक्यामुळे शक्य नाही अशा अवस्थेतही श्री. दाते यांनी छत्रपति शिवाजी महाराजांवरील प्रेम आणि तुळजाभवानी वरील निष्ठा व्यक्त करण्यासाठी हा ' प्रतापगड ' रचला आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. मराठी माणसे त्यांच्या या उपक्रमाचे स्वागत करतील याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

पुणे विद्यापीठ<br>गणेशखिंड,<br>पुणें–७.<br>१९ सप्टेंबर, १९७०

**अ. रा. कुलकर्णी**<br>पुणे विद्यापीठाच्या इतिहास<br>विभागाचे मुख्य<br>प्रोफेसर, डेक्कन कॉलेज, पुणे

## दुसऱ्या आवृत्तीबद्दलचे

# लेखकाचे निवेदन

थोड्याच काळात या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग आला व तो १९७१ मध्येच आला होता. कारण अवघ्या एका वर्षात या पुस्तकाची पहिली आवृत्ती संपून गेली.

दुसऱ्या आवृत्तीत शिवभारतातील अध्याय १९ ते २३ यांत आलेला प्रतापगड युद्धाचा प्रसंग काव्यात्मक लिखाण गाळून मुद्दामच दिला आहे मागील चुका दुरुस्त्या केल्या आहेत व नवा मजकूरही घातलेला आहे. हे वाचकांच्या ध्यानी येईलच.


या पुस्तकावर वर्तमानपत्रांचे अभिप्राय चांगले आलेले आहेत. मुंबई महापालिका, पुणे महापालिका, कुलाबा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हा परिषद आणि सरकारी प्रसिद्धी खात्याने पुस्तक संपविण्याचे कामी हातभार लावला व त्यामुळेच पहिली आवृत्ती लवकर संपून गेली हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

श्री छत्रपती शिवरायाचा अटीतटीचा सामना व गडाचे वर्णन अनेकांना पटले याबद्दल मला आनंद वाटतो.

ही आवृत्तीही लवकरच संपून जाईल याबद्दल मला शंका नाही.

असाच लोभ सर्वांनी ठेवावा हीच एक विनंती आहे.

भवदीय विनम्र
प. रा. दाते



किनेश्वर खोरे
वस्ती
श्रीकेदारेश्वर-मंदीर
देवीचे देऊळ
तलाव
पार घाट
गोळेगणी खोरे

# १ प्रतापगड

## गडाचा परिसर

प्रतापगड अक्षांश १७.५५ व रेखांश ७३.३५ वर सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर पेट्यात आहे. सह्याद्री पर्वताच्या उंच शिखरांपैकी महाबळेश्वर या थंड हवेच्या आधुनिक विश्रामस्थानाच्या पश्चिमेस हा गड मध्येच गुडघ्या-सारखा उंच असलेला दिसतो. या गडाची उंची समुद्र सपाटीपासून तीन हजार पाचशे त्रेचाळीस फूट आहे. थंड झालेल्या एका पुरातन ज्वालामुखीच्या सुळक्यावरच हा गड बसविला गेला आहे. गडाचे स्थान मोक्याचे असून घाट व कोकण यांच्या सीमेवर तो अवघड जागी बांधून काढला गेला आहे. गडाचा सर्व परिसर घाटमाथ्यावरचा व कोकणातील खोल दऱ्या, गहनारण्ये, झपाट्याने वाहणाऱ्या नद्या–नाल्यांनी भरलेला आहे. जावळी हे पुरातन गाव चंद्रराव मोरे या शिवकालीन आदिलशाही सरदाराच्या राजधानीचे गाव होते. त्या अगोदरच्या बहामनी राजांच्या काळी राजे शिर्के या जावळीच्या प्रदेशाचे शास्ते झाले होते. सध्या सातारा जिल्ह्याचा जावळी हा एक तालुका किंवा तहशील आहे. त्यात हे गाव मोडते.

जावळी, महाबळेश्वर, वाईचा काही भाग व खंडाळा पेट्याचा काही भाग मिळून शंभुमहादेवाच्या डोंगररांगेचा पश्चिम भाग होतो. महाबळेश्वरापासून उत्तरेस दहा मैलांवरून शंभुमहादेवाची ही पर्वतांची रांग पूर्वेकडे व नंतर थोडी दक्षिणेकडे सातारा जिल्ह्याच्या सर्व भूप्रदेशातून जाते.

संतोषगड किंवा ताथवडा, खेळणा, वीरगड व इतर किल्ले याच रांगेत आहेत. महिमानगड, चंदनवंदन वगैरे किल्लेही या रांगेच्या सुळक्यावरील किल्ले आहेत. सातारा जिल्हाभर शंभुमहादेवाची डोंगररांग अगर तिचे फाटे पसरले असून मोक्याच्या प्रत्येक जागी या रांगेत किल्लेकोट बांधलेले आहेत. कोरेगावजवळचा वर्धनगड, कऱ्हाड शहराजवळचा सदाशिवगड हे याच

शंभुमहादेवाच्या डोंगरमाथ्यावरचे गड आहेत. महिमानगड असलेली रांग शंभुमहादेव डोंगराचीच एक शाखा आहे. एकंदरीत या शंभुमहादेवाच्या डोंगररांगेने सर्व सातारा जिल्हा व्यापून टाकलेला आहे आणि हे किल्ले प्रतापगडाचे संरक्षकच आहेत असे म्हणावे लागते.

सातारा जिल्ह्याच्या पश्चिम अंगाला साठ मैल दक्षिणोत्तर सह्याद्रीची रांग पसरलेली आहे. प्रतापगडापेक्षाही उंच असलेला मकरंदगड चार हजार चौपन्न फूट उंच असा, महाबळेश्वर पेट्यात प्रतापगडाच्या आग्नेय कोपऱ्यात आहे.

प्रतापगडाच्या सभोवारही अनेक किल्ले आहेत. सह्याद्रीच्या आणखी काही लहान रांगा दक्षिणेस व दक्षिणपूर्व अशा पसरलेल्या आहेत. त्यात कमलगड, वैराटगड, हातगड, अरळा, घेरा–दातेगड, भार्गवगड, अजिमतारा, सज्जनगड, कोनळगड, मांदरदेव, पांडवगड, वासोटा वगैरे किल्ले आहेत.

प्रतापगड, वासोटा, मकरंदगड हे अत्यंत उंच किल्ले सह्याद्रीच्या जावळी महाबळेश्वराजवळ आहेत. महाबळेश्वराच्या पठारापासून निघालेल्या लहान-लहान पर्वत रांगांवरचे हे किल्ले आहेत आणि प्रतापगडाला ते पूरक आहेत.

एकूण सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेस असलेल्या अनेक गडकिल्ल्यांच्या घेऱ्यात हा प्रतापगड किल्ला आहे. कोकणातील खोल विभागात आणि सह्याद्रीच्या उंच माथ्यावरही अनेक किल्ले, चंद्रगड, रायगड, कांगोरी किंवा मंगलगड, सोनगड, चांभारगड वगैरे लहानमोठे गड आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातही काही गड आहेतच. त्यात महिपतगड, सुमारगड, रसाळगड, देवगड वगैरे किल्ले आहेत.

प्रतापगडाच्या दक्षिणेस व उत्तरेस असलेले घाट हे घाटमाथ्यावरून कोकणात जाणारे मुख्य मार्ग आहेत. फित्झिराल्ड किंवा अंबोली घाट, पारघाट, ढवळचा घाट, मढ्या घाट, कुंभार्ली घाट, हातलोट घाट, तिवरा घाट, माला घाट हे घाट आहेत. त्यांपैकी कुंभार्ली आणि अंबोली हे घाट मुख्य असून बाकी सर्व पायवाटांचे आहेत.

पारघाटाच्यावर तीन मैलांवर उत्तरेस प्रतापगड आहे. आदिलशाहीत व शिवकालात आणि नंतरही मुख्य घाट पारघाटच होता. गोळेणीच्या प्रचंड कोकणी खोऱ्यांतून हा घाट जात होता. आता हा घाट चालू नाही. या घाटाला मालकम पेठेवरून अगदी प्रतापगडासमोर उतरणारा रडतोंडीचा घाट होता. आज तो घाट नसून महाबळेश्वराहून जावळी व पार येथे जाणाऱ्या एस. टी. च्या गाड्या रडतोंडी घाटाच्या पायथ्याजवळून जातात. त्या विभागाला बोचे घोळ असे म्हणतात.

अशा सर्व बाजूंनी गड कोटांनी व उंच उंच डोंगररांगांनी वेढलेल्या अत्यंत दुर्गम जागी हा प्रतापगड आहे. फित्-झिराल्ड या गडापर्यंत केलेल्या घाटामुळे आज प्रतापगड बिकट वाटत नसला, तरी हा घाट नव्हता तेव्हा प्रतापगड हा अत्यंत विकट असाच गड होता म्हणूनच त्याचे त्या काळी मोठे महत्त्व होते.

या किल्ल्याला ढोपरा किंवा गुडघ्याचा डोंगर गुढचादुर्ग असे पुरातन नाव होते. गुडघा उंच केल्याप्रमाणे अकाशात हे सह्याद्रीचे निमुळते टोक उंच गेलेले आहे. तोच गुढादुर्ग होय. प्रतापगडाचे ते पूर्वीचे नाव आहे. (शिवकालीन प. सा. सं. ३ नं. २६४०)

शिवकालीन पत्रसार संग्रहाच्या २५९९ या पत्रात वरदाईनीदेवी, पार व हातलोट घाट या घाटांचा व देवीचा उल्लेख आहे. इ. स. १३५४ चे ते पत्र असून पुरातन चालत आलेल्या वतनदारांचे देणे त्यात लिहिलेले आहे.

शिर्के हे जावळी प्रांतात, बहामनी राज्यात मनसबदार होते. त्यांनी या ढोपऱ्याच्या डोंगरावर बालेकिल्ला म्हणून आज ओळखल्या जाणाऱ्या जागेवर एक लहानशी किल्लेवजा तटबंदी बांधली. तिला बुरूज नाहीत. अनेक शतके शिर्के ढोपरा व जावळीवर आपला अधिकार चालवीत होते. पंधराव्या शतकात बहामनी राज्याची छकले पडल्यावर चंद्रराव मोरे या नावाच्या सरदाराने शिर्क्यांचा पाडाव केला. विजापूरचा पहिला आदिलशहा युसफ याने चंद्ररावाला १२००० सैन्य देऊन त्यांच्याकडून जावळी सर केली व त्यांच्या ताब्यात वारणेपर्यंतचा भाग दिला.

जावळीचा मुलूख डोंगराळ दऱ्याखोऱ्यांनी भरलेला आहे. या प्रांतात एकूण लहानमोठ्या साठ खिंडी आहेत. यावरून त्या प्रदेशाची पूर्ण कल्पना येण्यासारखी आहे. हा प्रदेश मोरे यांच्या ताब्यात देताना युसफ आदिलशहाने व (सन १४८९ ते १५१०) चंद्रराव मोऱ्याने त्यावेळी गुजर आडनावाचे मराठे व मादुलकर, महाडिक, मोहिते, तारळे यांना पाटणच्या मुलखातून हाकलून दिल्याने, चंद्रराव हा किताब, मोर्चेलाचा मान मोऱ्यांना दिला व राजे हा किताबही दिला. पुरंदर जवळच्या लढाईत चंद्रराव व त्याचा मुलगा यशवंतराव यांनी बुऱ्हाण निजामशहा याचा पराभव केला. (सन १५०८ ते १५८९) म्हणूनच त्यांना चंद्रराव हा वंशपरपरा किताब मिळाला. यशवंतरावाच्या ७ मुलांनाही ही पदवी वंशपरंपरा मिळाली. नाममात्र नजर देण्याच्या अटीवर रानटी व न पिकणारा हा मुलूख मोऱ्यांकडे ठेवण्यात आला. या प्रदेशातूनच व्यापाराचा मुख्य रस्ता पारघाट जात होता त्याचे सर्वाधिकारही मोऱ्यांना दिले गेले.

शिवाजीच्या काळात दौलतराय मोरे हा गादीवर होता. तो निपुत्रिक वारला. त्याच्या विधवांच्या मांडीवर शिवथरकर बाबाजी किंवा यशवंतराव मोरे यांचे दोन मुलगे बाजी व कृष्णाजी देण्यात आले. (शि. भा. भाग १३) या बाबतीत विजापूर दरबारला राग आला व दरबारने अफजलखान याला कर्नाटकातून आणून वाईची सुभेदारी दिली. हे पाहिल्याबरोबर शिवाजीच्या कृपेने मोऱ्यांच्या गादीवर बसलेले मोरे पिता–पुत्र शिवाजीवर उलटले व विजापूरकरांच्या तंत्राने वागावयास लागले.

शिवाजी महाराजांनी जावळीवर दोन स्वाऱ्या केल्या व जावळी जिंकून घेतली. संभाजी कावजी या सरदाराने १५ जानेवारी सन १६५६ रोजी जावळी सर केली. (शकावली व शिवप्रताप) महाराज ३० मार्च १६५६ पर्यंत जावळीस होते व नंतर रायगडावर पळून गेलेल्या मोऱ्यांवर त्यांनी स्वारी केली. ६ एप्रिल रोजी त्याचवर्षी ते रायगडाखाली आले व मोऱ्यांचे मामा सिलीमकर यांच्या मध्यस्तीने त्यानी १६५६ च्या एप्रिल महिन्यात

रायगड घेतला. २७ ऑगस्टला यशवंतराव मोरे शिवाजीच्या कैदेतून पळाले व मोऱ्यांच्या घराण्याची वाताहात झाली. कृष्णाजी व बाजी कैद झाले व पुढे शत्रू संगनमताने मारले गेले.

शिवाजीचा तरुण पेशवा मोरोपंत पिंगळे यांच्यावर प्रतापगड बांधण्याची कामगिरी दिली गेली. १६५६ साली मोरोपंतांनी प्रतापगड बांधून पुरा केला. त्याच्या अगोदर मोरोपंतानी पुरंदरगड, तोरणागड व राजगड बांधले होते. त्यांना बांधकामाची पूर्ण माहिती होती. प्रतापगड व इतर गडांची नवी नावे याचवेळी शिवाजी महाराजांनी ठेवली. भाद्रपद व ॥ ११ शके १५७८ तारीख ४ सप्टेंबर, सन १६५६ ही शिकावलीव मिती व तारीख दिलेली आहे. ती बिनचूक आहे. याचवेळी या नव्या गडाला ‘ प्रतापगड ’ असे नाव दिले गेले. ॥ प्रतापगडचेठाई आदिशक्ति विराजते ॥ असे रामदास स्वामींनी वरदाइनी देवीच्या शोधाचे वेळी लिहिले आहे. ॥ रामवरदाइनीदेवी दासे धुंडोनि काढिली ॥ असेही रामदास म्हणतात. याचवेळी शिर्क्यांच्या वेळच्या किल्यांत मोरोपंतांना एक स्पटिकांचे शिवलिंग मिळाले ते अद्याप श्रीभवानी मंदिरात प्रतापगडावरच आहे.

हा गड शिवाजीच्या हाती गेल्याने विजापूरच्या आदीलशहाचा कोकणाच्या बंदरातून होणारा व्यापार बसला आणि विजापूरकरांना कोकणाकडे जाण्याचा मुख्य आणि जवळचा मार्ग बंद झाला. हजारो रुपयांचा माल, मक्केचे यात्री यांचा जवळचा मार्ग बंद झाला. कोकणचा समृद्ध प्रदेश यामुळे शिवाजीच्या हाती गेला. शिवाजीने जावळी घेतली आणि हा मोक्याचा गड व त्या सभोवारचे गड भराभर ताब्यात घेण्याचा सपाटा चालविला. त्याने याच काळात गायकवाडांच्या मुलीशी १० जानेवारी १६५७ रोजी लग्न केले. मुहमद आदीलशहा हा विजापूरचा सुलतानही ४ नोव्हेंबर १६५६ रोजी मरण पावला व दुसरा अल्ली गादीवर आला. तारीख २१ मार्च १६५७ रोजी पेशवे, मुजूमदार, डबीर, सुरनिस, सरनोबत, शिवाजीने नेमले (प. सा. स. ७२२). शिवाजी आपले स्वराज्य स्थापणार आहे याची कल्पना

विजापूरकरांना आली. जाधव, गोळे या सरदारांशीही सोयरिकी केल्याने शिवाजी आपल्या राज्याला खासच घातक ठरणार हे विजापूर दरबारला पुरेपूर कळून चुकले व किल्यांची नावे बदलून शिवाजीने मोठाच घोटाळा निर्माण केल्यामुळे विजापूरची आदीलशाही भांबावून गेली.

प्रतापगड हा गड दोन विभागात विभागलेला आहे. वरचा किल्ला बाले-किल्ला व त्या खालचा किल्ला असे दोन विभाग आहेत. बाले किल्ल्याचा दरवाजा साधा बिन बुरुजांचा आहे, तर खालच्या किल्याचा दरवाजा बुरुजांचा आहे.

बाले किल्ला साधारणत: दोनशे फूट लांब रुंद आहे. बाले किल्याचे तट साधारण उंच असून तटाचा माथा तीन फुटांचा आहे. गडाच्या तटबंदीचे या विभागाचे पश्चिमेकडील व आग्नेय दिशेकडील विभाग कमीत कमी सातशे फुटांच्या काळ्या फत्तर कड्यांवर बांधलेले आहेत. उत्तर विभागही अशाच उंचीचा आहे. गड पश्चिमेकडून पूर्वेकडे असलेल्या उतारावर वस-लेला असून, अफजुल बुरुज हा पूर्व बाजूचा शेवटचा तुटलेला किंवा मुद्दाम तोडलेला कडा आहे. त्या बुरुजासमोर लहानसे पठार असून त्याच्या पुढचा भाग कोयना खोऱ्यांत झपाट्याने उतरलेला, कातळ कड्यांचा, खोल खोल गेलेला आहे. अफजुल बुरुजासमोरच आग्नेय कोपऱ्यात अफजलखानाची कबर आहे.

खालचा किल्ला ३२० यार्ड लांब व १२० यार्ड रुंद आहे. लांबी दक्षिणोत्तर असून रुंदी पूर्व पश्चिम बाले किल्याच्या तटापर्यंतची आहे. सर्व दिशांना गडाची उंची चार पाचशे फुटांच्या वरची असली तरीही दक्षिण, पूर्व व उत्तरेची उंची त्यापेक्षा थोडी कमीच आहे.

बाले किल्याचा दरवाजा पूर्वाभिमुख, तर खालच्या किल्याचा दरवाजा पश्चिमाभिमुख आहे. या दरवाजाकडे अफजुलबुरुजाखालून एक अरुंद वाट

येते व प्रवासी पूर्वाभिमुख होऊन दोन बुरुजांतील दोन दरवाजांच्या बळकट प्रवेशद्वारात शिरतो.

प्रतापगड किल्ला कुलाबा व सातारा या जिह्यांच्या सीमा रेषेवर आहे. आज तो सातारा जिल्ह्यात मोडत असला तरी कुलाबा जिल्ह्याची सीमारेषा किल्ल्याच्या पश्चिम तटावरुनच जाते. या तटाच्या खाली कुलाबा जिल्ह्यातील किनेश्वराचे, पोलादपूर तहशिलातील, प्रचंड खोरे आहे. किल्याचा मुख्य मार्ग सातारा जिल्ह्याच्या हद्दीत आहे.

शिवाजी महाराजांनी प्रतापगड जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांच्या हातून त्यांचे राज्य घेतल्यावर घेतला. या किल्याची दुरुस्ती व नवे बांधकाम केले.

प्रतापगड सह्याद्रीच्या रांगांच्या माथ्यावर वसलेला आहे. ह्या किल्याच्या ईशान्येस जावळी गाव आहे. वरच्या बाजूला मोऱ्यांचा चंद्रगड हा किल्ला आहे. चंद्रगडाच्या पूर्वेस जेध्यांच्या कारी गावाजवळ रोहिडा किल्ला आहे. प्रतापगडाच्या पूर्वेस वाईजवळ पांडवगड व कमळगड हे किल्ले आहेत. आग्नेय कोपऱ्यात वासोटा व मकरंदगड दिसतात.

सातारा जिल्हातील शंभूमहादेवाची पूर्वपश्चिम डोंगरांची रांग महाबळेश्वराच्या पठारापासून किंवा प्रतापगडापासून निघून गोळेवाडी, मलवडी व म्हसवड गावाच्या पूर्व बाजूने जाते. महाबळेश्वरापासून सातारा शहराजवळच्या अजिमतारा किल्याचा डोंगरही याच पठारातून निघतो. अजिमतारा व सज्जनगड हे किल्ले याच रांगेत आहेत.

अशा रीतीने डोंगरांच्या रांगांचे आत आणि अत्यंत बिकट जागी प्रतापगड असल्याने स्वराज्यात या जागी किल्ला असणे शिवाजीमहाराजांना अत्यंत जरूरीचे वाटले. पूर्वी ह्या जागी बाले किल्याचे पुराणे बांधकाम होते. त्याला गुढेदुर्ग म्हणत असत.

शिवाय प्रतापगडाच्या पायथ्याला पारचे कोयना नदीचे प्रचंड खोरे असल्याने व त्या खोऱ्यातून त्या काळातील मोठा व्यापारी हमरस्ता,

घाटमाथ्यावरून कोकणच्या बंदराकडे जाणारा, असल्याने तर एक बळकट किल्ला या खोऱ्यावर असणेही जरूरीचेच होते. या प्रतापगडाच्या उत्तरेस वरंधा, करंजा, ढवळया हे घाट आहेत. तर दक्षिणेस पारघाटाप्रमाणे ताम्हने घाट व त्यांच्या पलीकडे कुंभार्ली व मळेघाट हे घाट आहेत.

म्हणूनच ही बळकट व युद्धशास्त्रदृष्टचा आणि कोकण घाटावर सत्तेचा दाब ठेवण्याच्याही दृष्टीने शत्रूला अवघड अशी प्रतापगडाची जागा शिवाजी महाराजांनी झटपट बांधून पुरी केली. त्यामुळे त्यांच्या सत्तेचा दबदबा वाढला.

जावळी आणि पार या मुख्य गावांच्यामध्ये ही जागा उंचावर पश्चिमेस आहे. कोकणातून सह्याद्रीची रांगच रांग उंचीची व कठीण अशी आहे. पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तरेलाही पसरलेली आहे. अक्राळ विक्राळ पसरलेले डोंगर, घनदाट झाडी व उंच सखल प्रदेशांमुळे हा बळकट किल्ला मोक्याची विनधोक जागा होती. या जागेशिवाय आसरा मिळण्यासारखी जागा सभोवार २–३ मैलाशिवाय नाही. घोडदळाला हा डोंगरमाथा चढणे कठीणच. तोफा वर चढविणे दुर्घटच. अशा तऱ्हेचा हा किल्ला बांधल्यावर महाराजांना हायसे वाटणे साहजिक होते. आदीलशाहीलाही मोक्याची जागा आगामी धोक्याची वाटली यात नवलच नाही.

विजापूर दरबार या किल्याच्या निर्मितीने अत्यंत हवालदील झाला. फत्तेखान आणि बाजीशामराज शिवाजीपुढे टिकले नाहीत व आता सोक्षमोक्ष केलाच पाहिजे म्हणूनच हा किल्ला कसेही करून बळ एकवटून घेणे जरूरीचे आहे, हे विजापूर दरबारने ओळखले. तशी तयारीही दरबारने चालविली.

शिवाजी महाराज व्यवहारचतुर होते. त्यांनी मोरे हे विजापूर दरबारचे विश्वासाचे सरदार जावळीतून उखडून काढले. कोकणचा व्यापारी राजमार्ग बंद झाला, हे पाहिल्यावर वाईचा पूर्वीचा सुभेदार अब्दुलखान याला

महाराजांवर पाठविले. त्यालाच प्रतापगडचे युद्ध असे म्हणतात. त्या युद्धाच्या वर्णनाचे अगोदर महाराजांनी जावळी कशी घेतली हा इतिहास आपणास समजून घेतला पाहिजे.

त्या काळाच्या अगोदरपासून श्री रामदासस्वामी कुलाबा जिल्ह्यातील नलावडयाचा कोंड, पडवी, शिवथर या विभागात रहात होते. मार्गशीर्ष व॥ ५ शके १५७७ तारीख ८ डिसेंबर सन १६५४ या तिथीला व तारखेला श्री रामदास स्वामींनी शिवथरच्या घळीत बसून १० वर्षेपर्यंत कोठेही न जाता दासबोध लिहिण्याचा संकल्प केला. (पत्र सार संग्रह १०३९) ही नोंद व पत्र ध्यानी घेता शिवाजी महाराज व रामदास यांचा पत्रव्यवहार अगर भेटीगाठी झाल्या नव्हत्या असे म्हणता येत नाही.

० ० ०

# २ जावळीचा इतिहास

जावळीचे राज्य पुरातन होते. मौर्य राजे महाराष्ट्रात राज्यकर्ते म्हणून असल्यापासून हे राज्य मोरे या मौर्यांच्या एका शाखेकडे होते. महाराष्ट्रात अनेक शास्ते झाले तरीही मौर्यकुल जावळीचे राजे म्हणून दाभोळ ते अवचितगड या कोकणपट्टीत व भोर ते माण या मुलुखात शांततेने राज्य करीत होते. दौलताबाद किल्ला मुस्लिमांनी जिंकला व यादवकुल लयाला पावले, त्याकाळी शिर्क्यांनी हा प्रदेश जिंकून घेतला व ते सत्तेच्या कृपाछत्राखाली या बिकट गिरिगुहांच्या प्रदेशात ते राज्य करू लागले. त्यांच्या तीन-चार पिढ्या जावळीवर राज्य करून गेल्या. या प्रदेशाला शिरकाण म्हणत.

बहामनीराजे राज्य करू लागल्यावर शिर्क्यांनी त्यांचे स्वामित्व मानून राज्य टिकविले होते. मलिक अलूतुजार या सेनापतीने शिर्क्यांवर स्वारी केली तेव्हा शिर्केकुल बाटविण्याचा मलिकने सवाल टाकल्यावर, शिर्क्यांनी खेळण्याच्या राजाकडे बोट दाखविले व त्यांना प्रथम मुस्लिम धर्माची दीक्षा द्या असे सांगून मलिकला एका अवघड गहनारण्यातून खेळण्यावर पाठविले व तो जात असताना मलिक व त्याचे सर्व सैनिक शिर्क्यांनी गारद करून टाकले.

बहामनी राज्याची पाच राज्ये झाली. त्यात पहिला युसूफ आदीलशहा याच्या पदरी मोऱ्यांपैकी एक मोरे सरदार होता. युसुफ हा स्वतंत्र झाला. त्याने विजापूरच्या आदीलशाहीची स्थापना केली. (१४८९ ते सन १५१०) त्यावेळी मोऱ्याने आपला मुलगा यशवंतराव यासह बाराहजार फौजेनिशी जावळीवर अचानक छापा घालून शिर्क्यांचा नायनाट केला व पुन्हा मोरे जावळीचे राजे झाले. दिवसा दिवटी लावण्याचा व मोर्चेलाचा अधिकार, चंद्रराव हा वंशपरंपरा किताब, आणि जावळीचे राज्य ठराविक खंडणीवर त्यांना देऊन घाटातील मालावरची जकात घेण्याचा त्यांना अधिकार दिला. सात पिढ्यांपर्यंत मोरे हे जावळीचे राजे म्हणून राज्य करीत होते.

शिवाजीच्या राज्यस्थापना व धर्म संरक्षणाच्या कार्याचे वेळी वृद्ध दौलतराव चंद्रराव मोरे हा जावळीच्या गादीवर होता.

शिर्के स्वतःला राजे असा किताब लावीत असत. असे राजे हा किताब नाममात्र लावणारे मराठे सरदार निजामशाहीत अनेक होते. राजे पांढरे, राजे भोसले, राजे निंबाळकर, असे कितीतरी राजे त्या काळात होते. राजे या किताबाचे स्वतःला भूषण मानणारे राजे या किताबाने खूष होते. किताब नाममात्र परक्यांनी दिलेला होता.

जावळीच्या या राज्यात डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांच्या जंगलाने भरून गेलेल्या प्रदेशांत माणगांव व महाड तालुक्याचा आणि पोलादपूर तालुक्याचा कुलाबा जिल्ह्यातील काही भूभाग मोडत होता. भोर संस्थानातीलही काही भाग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील हेळवाकपर्यंतचा भाग या मोऱ्यांच्या चंदरराई राज्यात मोडत असे.

या सर्व मुलखात राजे शिर्क्यांचे एकेकाळी शिर्केस्थान, शिरकाण, राज्य होते. तेव्हा मलिक अलतुजार या बहामनी सुलतानाच्या सरदाराची स्वारी कोकणात झाली असताना शिर्क्यांना मुस्लीम धर्म स्वीकारण्याची आज्ञा मलीकने केली. त्यावेळी खेळण्याच्या राजाला शंकररायला प्रथम मुस्लीम करा मग आम्ही तो धर्म स्विकारतो अशी बतावणी करून शिर्क्यांनी खेळण्याकडे जाणारे मलीकचे सारे सैन्य कापून टाकले. याचा सूड म्हणून शिरक्यांना नामशेष करून राजकर्त्यांनी त्याचे जावळीचे राज्य ताब्यात घेऊन शिर्के मंडळींचे शिरकाण केले. नंतर चंद्रराव हा किताब देऊन मोऱ्यांच्या ताब्यात शिर्क्यांचा सारा मुलुख विजापूरकरांनी दिला व तो शिवाजी महाराजांनी जावळीचा ताबा घेईपर्यंत सात पिढ्यांच्यावर मोऱ्यांकडे राहिला होता. शिर्के खेळणा किल्ल्याचा राजा शंकरराय याच्या मुलुखात जाऊन काही काळ राहिले होते.

या बाबतीत मोऱ्यांची काहीतरी विषेशच कामगिरी झाली असावी म्हणूनच त्यांना मोर्चेल दिवटीचा मान देण्यात आला.

विशाळगड किंवा खेळण्याचा राजा शंकरराय याच्याशी यावेळी शिर्क्यांनी संगनमत केले व चाकणहून आलेल्या या मलिक अल्तुजारचा काटा काढून टाकला. शिर्के यामुळे आपला धर्म व स्वत्व सांभाळून राहिले हे खरे परंतु त्यांचे सर्वस्व जाऊन ते परांगदा असे काही काळ दुसऱ्याच्या मुलुखात (कोल्हापूर खेळणा या विभागात) जाऊन आदिलशाहीत परत आलेले असावे. मलिक अल्तुजार याने शिर्क्यांचा सर्व मुलूख घेतला त्यावेळी शिर्के रायगडावरच होते, कारण शिर्के व मोरे यांच्या काळात रायरी या किल्याला महत्त्व होते.

महमद बहामनी २ रा याने आपल्या राज्याचे तुकडे राज्यकारभाराच्या सोईसाठी पाडले व ख्वाजागवान याला विजापूरचा अधिकारी नेमला. त्याने जावळीच्या मुलुखावर अत्याचार करून प्रांत आणि प्रजा यांचे हाल केले. महमदगवान यावरही पादशहाची इतराजी झाली व तो इ. स. १४४१ मध्ये मृत्यू पावला.

महमदगवान नंतर, युसुफ आदीलशहा याच्या ताब्यात विजापूरचा परगणा आला. जावळीचा प्रदेश त्यातच होता. तो एक तुर्क होता. महदमशहा ब्रहामनी (सन १४८२ ते १५१८) दुसरा याच्या कारकीर्दीत हा स्वतंत्र झाला व भीमा नदीपासून विजापूरपर्यंतच्या मुलूखात आदीलशाहीचे स्वतंत्र राज्य त्याने स्थापन केले.

पारघाटातून होणाऱ्या व्यापारी दळणवळणावर ताबा ठेवून आदीलशहाची सेवा करणे हे मोऱ्यांचे काम होते. सात पिढ्यांपर्यंत मोऱ्यांनी हे काम कधी प्रजेची मदत घेऊन तर कधी स्वमताप्रमाणे केले.

मोऱ्यांचा शेवटचा पुरुष दौलतराव मोरे. हा जावळीत राज्य करीत असताना वाईचा सुभेदार, विजापूरची मुख्य सत्ता, आणि नव्याने उदयास येणारी श्रीछत्रपती शिवाजी महाराजांची सत्ता या तीन सत्ता त्याला सांभाळावयाच्या होत्या.

विजापूरच्या आदीलशाहीचा सरदार शहाजीराजे भोसले हा फारच पराक्रमी व आदीलशाहीचा पालक वजीर म्हणून होता. त्याचा मुलगा

शिवाजी विजापूरच्या आदीलशाहीत मोठा उत्पात करीत होता. त्यासाठी शिवाजीवर फत्तेखानाची स्वारी पाठविण्यात आली, परंतु खळद-बेलसरच्या लढाईत फत्तेखान पराजित झाला. फत्तेखानाची धूळधाण झाली. या गोष्टीने दौलतराव मोरे बेचैन झाला आणि त्याने आपले राज्य टिकविण्यासाठी हरप्रयत्न चालविले होते.

विजापूरच्या ताब्यात प्रत्यक्ष सत्तेखाली जावळी असली तरीही ती मोरे यांच्याच अधिपत्याखाली ठेवणे जरूरीचे वाटले. कारण सिंधू सागराच्या बंदरी जाणारा सारा व्यापारी माल व प्रवासी याच मुलखातून जाणे क्रमप्राप्त असल्याने मुस्लीम सत्तांना आपल्या सत्तांच्या अंकित असणारे लोक तेथे राज्यांतर्गत सत्ताधीश ठेवणे जरूरीचेच होते. अशा डोंगराळ दुर्गम मुलुखातून व्यापारी मालाची ने आण करणे त्यामुळे विनधोक्याचे होणार होते आणि परस्पर कार्यभाग उरकत होता.

या मुलुखात काहीही उत्पन्न मोऱ्यांना येत नव्हते. नागली, वरी व क्वचित भातखाचरांनी भरलेला आणि गहनारण्याचा हा प्रदेशपट्टा जवळ जवळ तीस मैलांचा होता. या जावळीच्या राज्यात एकूण नागमोडी असे डोंगराचे उंच फाटे पसरलेले होते व पीकही नसल्याने समृद्धी तर नव्हतीच. अर्धनग्न स्थितीत राहणारे लोक दणकट, बळकट होते आणि डोंगरकडयांवरून चपळगतीने चालणारे होते. विजापूर, मिरज विभागाप्रमाणे समृद्ध व सपाट प्रदेश तेथे नव्हताच. म्हणूनच उंच डोंगर माथ्यावर दुर्गम जागा बांधून त्या गडाच्या आसपासच्या प्रदेशावर त्या गडावरून सत्ता चालविता येत असे. पारघाट हा मुख्य वाहतुकीचा घाट या खोऱ्यातून जात असल्याने शिर्के व मोरे ताठर वृत्तीने वागले तरी त्यांच्याकडे कानाडोळा करून हा प्रदेश राज्यांतर्गत अंकित करून ठेवला जाणे सर्व सत्तांना भागच पडले होते.

जावळी हे गाव त्यावेळी लहानसेच खेडे होते. शिर्के किंवा त्या नंतरच्या राजकर्त्यांनी जावळीला वाडे बांधले होते. परंतु ते जुजबीच असावेत कारण जावळी गावच्या आजच्या वसतीच्या आसपास पक्क्या इमारतींचे अवशेष

दिसत नाहीत. रायगड हा त्यांच्या राज्याचाच विभाग असल्याने मकरंदगड, प्रतापगड वा रायगडावरच संकटकालात ते जात असत.

परंतु तशी वेळही शिर्के किंवा मोरे यांना येणारी नव्हती. कारण त्यांच्या-वर सुसज्ज सैन्य नव्हते. राजे किंवा सुलतान त्यांच्यावरचे परचक्र निवारण्याला सिद्ध असत, स्वतःच्या व्यापार बंद होण्याच्या भीतीने ते सदैव तत्पर असत. हे जावळीचे संस्थानिक मुख्य सत्तेला कधी जुमानीत तर कधी जुमानणारे नव्हते. वेळ पडली म्हणजे ते त्यांच्या मदतीला धाऊनही जात.

जावळीचा चंद्रराव मोरे वृद्ध होता. विजापूरचा सरदार फत्तेखानाच्या खळद बेलसरच्या लढाईत विजापूरचा सेनापती आणि सेना यांचा फडशा पाडलेला पाहताच दौलतराव डगमगूनच गेला. त्या वृद्ध राजाचा सेनापती हणमंतराव मोरे हा त्याचा चुलत भाऊ. राजा दौलतराव, हा निपुत्रिक असल्याने त्याच्या मृत्यूनंतर जावळीचे राज्य आपल्याला मिळेल या आशेत दौलतरावाचा दुसरा चुलतभाऊ प्रतापराव जावळीचे राज्य आपणाला कसे मिळेल या विचारांत होता. प्रतापरावाचे विचार हणमंतरावाला कळत नव्हते आणि या दोघांचेही विचार वृद्ध दौलतरावाला समजत नव्हते. विजापूर दरबार तर पराभवाने अगदी भांबाऊन गेला होता. शिवाजीचे बंड मोडण्यासाठी काहीतरी केले पाहिजे हे तर दरबारने ठरविले होते. परंतु त्या स्वारीवर महाड, जोरखोरे वगैरे प्रदेशाची माहिती असणारा कोणीतरी हिंदू सेनापती पाठविला पाहिजे असा विचार दरबारने केला आणि शेवटी बाजी शामराज याला शिवाजीचा निर्मूळ फडशा पाडण्यासाठी विजापूर दरबारने पाठविला.

त्याचा मार्ग पारघाटाचा होता. शिवाजी महाडच्या आसपास असल्याने दग्याने त्याला पकडण्याचा बेत बाजी शामराजने केला. चंद्ररावाच्या जावळीच्या मुलखातील घनदाट जंगलांचा फायदा घेण्याचे त्याने ठरविले आणि गोळेगणी या गावाच्या आसपास डोंगराच्या उतारवर तो सैन्यासह छपून बसून राहिला. दौलतराव, शिवाजीला मानावे की बाजी शामराज

दिसत नाहीत. रायगड हा त्यांच्या राज्याचाच विभाग असल्याने मकरंदगड, प्रतापगड वा रायगडावरच संकटकालात ते जात असत.

परंतु तशी वेळही शिर्के किंवा मोरे यांना येणारी नव्हती. कारण त्यांच्यावर सुसज्ज सैन्य नव्हते. राजे किंवा सुलतान त्यांच्यावरचे परचक्र निवारण्याला सिद्ध असत, स्वतःच्या व्यापार बंद होण्याच्या भीतीने ते सदैव तत्पर असत. हे जावळीचे संस्थानिक मुख्य सत्तेला कधी जुमानीत तर कधी जुमानणारे नव्हते. वेळ पडली म्हणजे ते त्यांच्या मदतीला धाऊनही जात.

जावळीचा चंद्रराव मोरे वृद्ध होता. विजापूरचा सरदार फत्तेखानाच्या खळद बेलसरच्या लढाईत विजापूरचा सेनापती आणि सेना यांचा फडशा पाडलेला पाहताच दौलतराव डगमगूनच गेला. त्या वृद्ध राजाचा सेनापती हणमंतराव मोरे हा त्याचा चुलत भाऊ. राजा दौलतराव, हा निपुत्रिक असल्याने त्याच्या मृत्यूनंतर जावळीचे राज्य आपल्याला मिळेल या आशेत दौलतरावाचा दुसरा चुलतभाऊ प्रतापराव जावळीचे राज्य आपणाला कसे मिळेल या विचारांत होता. प्रतापरावाचे विचार हणमंतरावाला कळत नव्हते आणि या दोघांचेही विचार वृद्ध दौलतरावाला समजत नव्हते. विजापूर दरबार तर पराभवाने अगदी भांबाऊन गेला होता. शिवाजीचे बंड मोडण्यासाठी काहीतरी केले पाहिजे हे तर दरबारने ठरविले होते. परंतु त्या स्वारीवर महाड, जोरखोरे वगैरे प्रदेशाची माहिती असणारा कोणीतरी हिंदू सेनापती पाठविला पाहिजे असा विचार दरबारने केला आणि शेवटी बाजी शामराज याला शिवाजीचा निर्मूळ फडशा पाडण्यासाठी विजापूर दरबारने पाठविला.

त्याचा मार्ग पारघाटाचा होता. शिवाजी महाडच्या आसपास असल्याने दग्याने त्याला पकडण्याचा बेत बाजी शामराजने केला. चंद्ररावाच्या जावळीच्या मुलखातील घनदाट जंगलांचा फायदा घेण्याचे त्याने ठरविले आणि गोळेगणी या गावाच्या आसपास डोंगराच्या उतारवर तो सैन्यासह छपून बसून राहिला. दौलतराव, शिवाजीला मानावे की बाजी शामराज

याला मानावे, की विजापूरचे ऐकावे, की शिवाजीचे या संभ्रमात असतानाच विजापूरहून आलेले बाजी शामराजचे सैन्य पार गावाजवळ व गोळेगणी गावाच्याखालीही पसरून दबा धरून बसले आहे हे पाहून दौलतराव, हणमंतराव व प्रतापराव मोऱ्यांनाही काही करता येत नव्हते. या लढाईच्या रगाड्यांत आपण चेपटून जाणार अशीच त्यांची कल्पना झाली. चंद्ररावाच्या राज्यभर बाजी शामराज घुसून दबा धरून बसून राहिला होता.

शिवाजी महाराजांनी किनेश्वरच्या खोऱ्यात आणि विन्हेरे खोऱ्यात सैन्याची जमवाजमव केली. ही दोन्ही सैन्य एकत्र येण्याची जागा पारघाट रस्त्यावरच पश्चिम घाटाच्या खाली ठरवून महाराज हल्याची वाट पहात राहिले.

साखर व देवळेखोऱ्यातील सैन्य प्रतापगड व करंजे या गावावरून एकदम पार या गावावर पाठविण्याची व्यवस्था झाली. बोचेघोळीच्या खिडीतून ढोपराच्या डोंगराच्या ( प्रतापगड ) पूर्वेकडून जंगलातून मावळे देशमुखांनी सैन्य उभारून जय्यद तयार केले आणि मकरंदगडाखालीही मोठ्या सैन्याची जमवाजमव केली.

बाजी शामराजांचा आपल्या सैन्यावर मोठा विश्वास होता. एकदोन दिवसात तो महाडवर चालून जाऊन शिवाजीला पकडणार होता. इतक्यात त्याच्यावर असा काही जोरदार हल्ला पोलादपूर आणि पैठण किंवा गोळेगणी खोऱ्यातून झाला की ते सैन्य ढोपराच्या डोंगराच्या खिडीतून पलीकडे पळत जाऊ लागले. हे सैन्य कोतवाल या गावाकडे जाते तो विन्हेरे खोऱ्यातील शिवाजीचे सैन्य त्यांच्यापुढे उभे राहिले आणि बाजी शामराजचे सर्वच्या सर्व सैन्य कोंडीत पकडले गेले व अक्षरशः ठार झाले. चारी बाजूंनी त्यांचा कोंडमारा झाला होता.

वृद्ध दौलतरावाला आता कळून चुकले की आपली धडगत नाही. याच काळजीने बिचारा सन १६४८ साली मरण पावला. त्याची विधवा होती तिने वार्धिष्णु शिवशक्तीला शरण गेल्याशिवाय गत्यंतर नाही हे जाणून ती शिवाजीला शरण जाऊन तिने मोऱ्यांचे मोर्चेलाचे तक्त सोडू नका अशी

विनवणी शिवरायाजवळ केली. मयत दौलतरावानेही शिवाजी महाराजांशी संधान बांधले होते. कवींद्र परमानंद याचे पोलादपूर येथील वाड्यात राजे दौलतरावांना भेटत.

शिवथरच्या खोऱ्यात असलेल्या दंतकथेच्या आधाराने या पुढचा मजकूर मला लिहावयाचा आहे. शिवाजी महाराजांची श्री रामदास स्वामींची भेट, हा एक मोठा वादाचा प्रश्न आहे. परंतु दंतकथांप्रमाणे व काहीशा लिखाण आधारानेही या काळात शिवथरघळीच्या सभोवारच्या मुलुखात नलावड्याचा कोंड, पडवी, पारमाची, शिवथर, बाकी, या बाजूला रामदासस्वामी येऊन राहिलेले होते. शिवथर घळीत श्रीरामदास श्रीरामरायाच्या सतत चिंतनात रहात असत.

या शिवथर घळीच्यावरती एक तलाव असून त्या तलावाच्या काठावर जुने चौथरे व पाये आजही दिसतात. तेथेच बाबाजीराव मोरे या नावाचा चंद्रराव मोऱ्यांच्या वंशजापैकी एक इसम रहात असे. श्री रामदासस्वामी घळीत राहू लागल्यावर त्या परिसरांत त्यांची कीर्ति पसरली आणि बाबाजी मोऱ्यांचे दोन समान अंगकांतीचे तेजःपुंज पुत्र त्यांच्या नजरेस आले. ते लढवय्ये होते. निशाणबाज, तालीमबाज आणि मोठे चाणाक्ष होते. दौलतराव चंद्रराव मोऱ्यांच्या विधवेला आश्वासन दिल्यावर महाराजांना पत्र पाठवून या बाबाजी मोऱ्यांच्या दोन राजबिंड्यांना त्यांच्या भेटीसाठी रामदासस्वामींनी शिवाजीकडे पाठविले आणि महाराजांच्याही मनात व परीक्षेत ते उतरले.

जावळीत प्रतापराव मोरे व हणमंतराव मोरे यांचे दौलतरावाच्या विधवेशी गादीबाबत तंट्या बखेड्याचे प्रकार होऊ लागले. शिवाजीमहाराजांनी बहुधा श्रीरामदासस्वामींच्या अनुज्ञेने दौलतरावाच्या मांडीवर कृष्णाजी व बाजी या बाबाजी शिवथरकर मोऱ्यांची मुले मांडपुत्र म्हणून दिली. दत्तविधान झाले आणि प्रतापराव व हणमंतराव यांचे तोंडचे पाणी पळाले.

विजापूर दरबारात प्रतापराव मोऱ्याने तक्रार केली आणि हणमंतराव हुमकरेसो कायदा हाती घेऊन जावळीत बसला. हे दत्तक पुत्र शिवाजी

महाराजांकडेच राहिले. महाराजांनी त्यांच्या बरोबर सुसज्ज सैन्य दिले व त्या दोन मुलांनी हणमंतराव व प्रतापराव यांना राज्यकारभारातून दूर करून आपल्या हाती राज्यकारभार घेतला व ते दोन पुत्र बाबाजी मोऱ्यांसह जावळीस जाऊन राहिले.

यामुळे खटखटी वाढल्या आणि नवे आलेले दौलतरावाचे दत्तक पुत्र शिवाजी महाराजांचे उपकार विसरले. त्यावेळच्या कागद-पत्रांत मोरे शिवाजीशी टोंगाईने वागू लागले आणि त्यांचे व शिवाजीचेही वितुष्ट आले असे लिहिलेले आहे.

शिवाजी महाराजांनी पाहिले की, हे उपकार विसरणारे कृष्णाजी व बाजी यांना पदभ्रष्ट केल्याशिवाय आपला तरणोपाय नाही. म्हणूनच महाराजांनी जावळीवर स्वारी करण्याचे ठरवून तयारीही चालविली व ते स्वारीचा बेत करू लागले.

या बाबतीत हणमंतराव मोरे व प्रतापराव मोऱ्यांना शिवाजीचा मोठा राग आला. तरीपण प्राप्त परिस्थितीत स्वस्थ राहून कायद्याप्रमाणे ज्ञातिगंगा व कुळगोतसंबंध यांचे पुढे हक्क मांडण्याचा त्यांनी विचार सोडून दिला. कारण मयत दौलतरावाच्या विधवेच्या मांडीवर दिलेले हे दोन पुत्र आता मोरे कुळाच्या तक्ताचे मालक झालेले होते. ते वाममार्गाने आपल्या अशा अपेक्षांचा भंग करून गादी बळकावून बसले असले तरी कुळ व ज्ञातीगंगा प्रतापराव हणमंतराव चुलत चुलत घराण्यांतील असल्याने त्यांना मानीत नव्हती. शिवाय सैन्याचा वापर करावयाचा ठरविल्यास शिवाजी हा आपला काटा समूळ उपटून निवटून टाकल्याशिवाय रहाणार नाही असे त्यांच्या मनाने घेतले. प्रतापरावाने स्वतः विजापूरला जाऊन " गैरी लोकांनी मोऱ्यांचे तक्त बळकाविले आहे " अशी तक्रार केली.

त्यावेळचे देशमुख, बांदल, सिलीमकर आणि जेधे हे सैन्य बाळगून होते. सिलिमकरांचे व या शिवथरकर मोऱ्यांचे नाते जवळचे. सिलीमकर देशमुख हे या मोऱ्यांचे मामा, बांदलांचा रोहिडा किल्ला शिवाजीने घेताना कृष्णाजी बांदल मारला गेलेला व बाजीप्रभू हा सुप्रसिद्ध लढवय्या

बांदलांचा अंकीत परंतु शिवाजीच्या बाजूला होता. जेध्यांचे आणि शिवाजीचे संबंध प्रेमाचे होते. या सर्व देशमुखांना तंबी देण्यासाठीच प्रतापरावाने विजापूरच्या दरबाऱ्यांकडे व बादशहाकडे शिवाजी व हे मोरे चंद्रराव यांचे विरुद्ध कारस्थाने केली. एकदोन वर्षांच्या खटपटी लटपटीनंतर अफजलखानाची नेमणूक विजापूर दरबारने पुनरपी वाई सुभ्यावर केली व त्याचे जवळ फार मोठी सैन्य तरतूद करून देऊन पुढे वाईस पाठविले.

मध्यंतरीच्या काळात शिवाजीचे काही सैन्य जावळीतून गेल्यावर या कृष्णाजी व बाजी मोऱ्यांनी हणमंतरावाला आपले सैन्य वाढवून गप्प बसावयास लावले व तो मूग गिळून स्वस्थ होता. त्याने एक गोष्ट केली ती ही की शिवाजी हा कालचा राजा झालेला आहे. तुम्ही परंपरागत मुस्तेद राज आहात. असा गर्व त्यांच्या मनांत उभा केला आणि मग मात्र शिवाजी व या मोऱ्यांचे बिनसू लागले. पत्रसार संग्रहातील अफजलखान व मोरे यांच्या बाबतची पत्रे जिज्ञासूंनी अवश्य वाचावी. ही फार बोलकी असून त्या काळच्या परिस्थितीबाबत आपल्याला योग्य तो बोध देणारी आहेत. हणमंतराव मोरे लढवय्या होता. त्याने सैन्य जमा केले व कुलाबा जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील जोर नावाचे सबंध खोरे तो बळकावून बसला. पुढे शिवाजीच्या सैनिकांनी जोर खोऱ्यावर स्वारी करून ते जिंकले, त्यावेळी हणमंतराव मोरे धारातीर्थी पडला.

♣ ♣ ♣



**श्रीतुळजाभवानी माता, प्रतापगड**

।। नितांत श्रद्धास्थान छत्रपति शिवभूपाचे पावनहे ।।
।। दर्शन देते, जागृत करिते, संकट वारित, मंगलहे ।।



## रामवरदाइनी देवी

**फापडे खुर्द, ता. पोलादपूर**

# ३ प्रतापगडची तुळजा भवानी

पौष वद्य १४ शके १५७७ ता. १५ जानेवारी १६५६ रोजी शिवाजी महाराजांनी जावळी सर केली. ( शि. प्र. १७, १८ ) मार्च महिन्याच्या ३० तारखेपर्यंत त्यांचा मुक्काम जावळीस होता. ( शि. प्र. ५० ) या काळात त्यांनी जावळी राज्याचा कानाकोपरा जातीने हिंडून पाहिला. रामदासस्वामी शिवथर घळीच्या सभोवारच्या प्रांतात होते. शिवथर घळीत असून श्रीमद् दासबोध लिहिण्याचा संकल्प मार्गशीर्ष वद्य ५ शके १५७७ म्हणजे ता. ८ डिसेंबर १६५५ रोजी त्यांनी केला. याला जे कारण होते ते जावळीच्या गादीवर बसवलेले मोरे शिवाजीवरच उलटले हे असावे. राजे जावळीहून निघाले ते ६ एप्रिलला रायगडासमोर येऊन बसले. रायगडावर स्वतःला कोंडून घेतलेल्या चंद्रराव मोऱ्यांना ताब्यात घेण्यासाठीच ते आले होते. सिलीमकर वगैरे सर्व मंडळी ससैन्य अगोदरच येऊन बसली होती. सन १६५६ मध्ये बाजी चंद्रराव, कृष्णाजी चंद्रराव व त्याचा जनक बाप त्याचे मामा सिलीमकर यांच्या उपदेशाप्रमाणे शिवाजी महाराजांच्या गोटात आले. चैत्र वद्य ७ ला रायगड ताब्यात घेऊन शिवाजी महाराज रायगडावर चढले. ( शिवापूर दप्तर ) २७ ऑगस्टला शिवाजी महाराजांच्या गोटातून चंद्ररावांचा जनक बाप पळून गेला आणि महाराजांनी दोन मोऱ्यांना पुण्यास शेख सल्यात नेऊन ठेवले या जनक बापाला पदाजी असेही म्हणत.

याच वर्षी जावळी व पार या गावांच्यावरती असलेल्या गुडघ्या किंवा ढोपऱ्याच्या डोंगरावर मुळात असलेली गढी महाराजांनी बांधून तेथे बळकट किल्ला करण्याचे ठरविले. या गढीत बहोळेकर या नावाचे मेटकरी होते. त्यांना काढून टाकून दुसरे मेटकरी महाराजांनी नेमलेले दिसतात. ( प्र. सा. सं. २५९९ ) या गढीत जननी व वरदायिनी या दोन देवता होत्या.

आपल्या आनंदवन भुवनाचे वर्णन करताना या गढीबद्दल रामदास लिहितात —

॥ अंतरदृष्टी अखंड ध्यानी सन्निध रामवरदायिनी ॥
॥ विश्वमाता त्रैलोक्य जननी मूळ माया ॥

श्रीरामदासस्वामींना शिक्यांची जननी व मोऱ्यांची श्रीरामवरदायिनी अशा दोन देवी ढोपऱ्याच्या डोंगरावर आहेत इतकेच सांगावयाचे आहे.

या ठिकाणी प्रतापगड बांधण्याची आज्ञा श्रीशिवरायांनी मोरो त्रिंबक पिंगळे या आपल्या तरुण पेशव्यांना दिली. कारण राजगड, रोहिडा व पुरंदर या किल्यांची बांधकामे याच पिंगळ्यांनी नुकतीच सुंदररीतीने पुरी केली होती. अफझलखानाच्या वधानंतर हा गड बांधला हे ग्रँड डफचे विधान चुकीचे आहे.

मोरोपंतांनी जुना गड तसाच ठेवला. त्याला बालेकिल्ला केला. बालेकिल्याची खालची मोकळी जागा नव्या गडात सामावून घेतली. अब्दुल बुरूजाकडील जागा खोल खणून उंच कड्याची केली व त्याच्या उलट बाजूला पश्चिमेकडे तोंड करून मुख्य दरवाजा बांधला. ४००० फूट उंचीच्या कड्यावर अत्यंत बिकट जागी शत्रूसैन्याला गडाशी भिडणेही कठीण अशा जागी ह्या दोन दरवाजांचा दरबाजा आहे. हा प्रतापगडाचा मुख्य दरवाजा होय. या दरवाज्याच्या तोंडासमोरचा कातळकडा खणून टाकून १००–२०० सैनिक उभे रहातील एवढी जागा बाहेरून आलेल्या लोकांना विसाव्यासाठी निवाऱ्याची अशी तयार केली आहे.

सन १६५७ साली एका वर्षाच्या आत हा प्रतापगड बांधून पुरा केला गेला आणि नंतर या गडावर राजवाड्यात असलेल्या दोन देवी एक पार या गावी व दुसरी कापडे या गावी नेऊन पाणसरे व चित्रे यांना त्या त्या जागी या दोन्ही देवींची देवळे बांधून उत्सव व पूजाअर्चा करण्याची आज्ञा दिली.

॥ आकार नामक यवनासी मारविले ॥
॥ मग चाफळक्षेत्र उभे केले ॥
॥ श्री तुळजाभवानीसी संस्थापिले ॥
॥ जावळी पर्वती प्रतापगढी ॥

ता. ७–१०–१६५९ रोजी अफझलखानाशी युद्ध झाले. त्या अगोदर १३ फेब्रुवारी सन १६५९ रोजी चाफळचा उत्सव सुरू झाला. आणि मग प्रतापगडावर तुळजाभवानीची त्यांनी स्थापना केली. यांत विसंगती आहे.

महाराज दरसाल तुळजापूरला जाऊन भवानीची भक्ती करीत असत. त्यांच्या अंगात तुळजाभवानीचा संचार होत असे व ते तिच्या आज्ञेप्रमाणे वागत असत. अफझलखानाच्या वधापूर्वी कल्याण, भिवंडी प्रांत सर करण्याने व नंतर पन्हाळ्याच्या स्वारीत सर्व काळ गेल्यामुळे महाराजांना तुळजापूरला जाता आले नाही. तुळजामाता एकवेळ अंगात संचारली व तिच्या आज्ञेप्रमाणेच सध्याचे देवीचे देऊळ प्रतापगडावर बांधण्यात आले.

मोरोपंतांनी गडाचे कडे तासून काढून दगड जमविले. सध्याच्या देवीच्या देवळाच्या मागे गडाच्या नैऋत्य कोपऱ्यात एक फार मोठे तळे बांधून काढले व या तळ्याच्या वर एक मोठा तट दक्षिणेकडून पश्चिमेकडे व नंतर उत्तरेकडे बांधून वळविलेला लांबवरून आपण पहातो. यामुळे जनीच्या टेपापलीकडे जाणाऱ्या दरवाज्याच्या ओहोळाकडे जाणारा आणि ताम्हण्या घाटाचा मार्ग बंद केला. ही तटबंदी बळकट व अजस्त्र असून चार किंवा पाच हजार फुटांचे उंचीवर किनेश्वर खोऱ्याच्या पूर्व बाजूवर उंच कड्याच्या शिखरावर बळकटीसाठी उभारलेली आहे. ही तटबंदी उंच बांधली गेली. जुन्या राजवाड्यात देवीच्या दोन मूर्ती असताना मुद्दाम तुळजाभवानीची स्थापना का केली, याचे उत्तर भोसल्यांचे परंपरागत दैवत तुळजापूरची भवानी हे आहे. जननी किंवा रामवरदायिनी यांच्या मूर्ती गडावरून उठवून मानाने त्यांची स्थापना करण्याचा आदेश तुळजापूरच्या भवानीकडून महाराजांच्या अंगात तिचा संचार झाला असताना खुद्द देवीने दिला, असे सांगितले जाते. म्हणूनच तुळजापूरची भवानी देवीची स्थापना प्रतापगडावर केली गेली.

नवी मूर्ती घडवून आणतानाही फार मोठा विचार महाराजांनी केलेला दिसतो. आपले विश्वासातले लोक त्यांनी तुळजापूरला मुद्दाम पाठविले. त्या देवीची बरोबर प्रतिकृतीची एक लहान मूर्ती त्या स्वरूपात त्यांनी घडवून

आणविली. ही प्रतिकृती घेऊन श्री. मंबाजी पानसरे व इतर विद्वान लोक महाराजांच्या हुकुमाने श्वेतगंडकी व त्रिशूलगंडकी या दोन नद्यांच्या संगमावर गेले. सध्याच्या बिहार व बंगाल प्रांताच्या सिमेवर हा गंडकीसंगम आहे. त्यांनी तेथे जाऊन महाराजांनी दिलेल्या मोजमापाची एकसंध शाळीग्राम शिळा हुडकून काढली. अशा मूर्ती घडविणारे निष्णात कारागीर नेपाळ देशातून मुद्दाम बोलावून आणून त्यांच्याकरवी सुंदर मूर्ती प्रतिकृतीच्या बरहुकूम घडविली. मूर्तीचा दगड काळा तुळतुळीत असून त्यावर सुवर्णरेषा उमटलेल्या दिसतात.

सहा महिने प्रवास करून साहसाने व श्रमाने संकटे सोशीत ही मंडळी सुखरूप परत आली. नेपाळी पाथरवाटांची देवांच्या प्रतिमा घडविण्याची मोठी ख्याती आजही आहे. त्यांनी दक्षतेने प्रतापगडावरची ही सुंदर मूर्ती घडवून दिली व तिला जिवापलीकडे जपून मंबाजीबुवा पानसरे यांनी फारच दूरचा प्रवास करून महाराष्ट्रात आणली. हे लोक पायाने चालत खांद्यावर मूर्ती घेऊन अत्यंत चातुर्याने प्रतापगडावर आले. तेव्हा महाराजांनी मूर्ती पाहून खुषी दाखविली व त्या सर्वांना योग्य मेहनताना दिला.

देऊळ पुरे होत आले होतेच. देवीची प्रतिकृती व मूर्ती धर्म भावनेने व श्रद्धापूर्वक व विधीवत् अशी मोरोपंत पिंगळे यांच्या हस्ते आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १५७९ या दिवशी संस्थापून समारंभाने व अमाप खर्चाने हा मूर्ती स्थापनेचा सोहळा महाराजांनी पुरा केला.

अशा रितीने छत्रपतींच्या घराण्याचे हे कुलदैवत प्रतापगडावर संस्थापिले गेले. एक नवे अधिष्ठान नवे पुण्यक्षेत्र उत्पन्न केले गेले. देवीच्या सोपस्कारासाठी व पूजाअर्चेसाठी अनेक लोकांच्या नेमणूका केल्या गेल्या. पुजारी, पुराणिक, गुरव व चौघडेवाले यांच्या नेमणूका झाल्या. ८००० चे वार्षिक उत्पन्न यासाठी महाराजांनी कायम लावून दिले. रोज त्रिकाळ चौघडा, पूजा, पुराण, पाठ, नैवेद्य सुरू झाले. नवरात्राचा उत्सव फार मोठ्या थाटामाटात होऊ लागला. रोज पुराणे व कथाकीर्तने होऊ लागली.

सेवेकरी व इतर लोक यांना गडावर घरे बांधून देण्यात आली. त्यांना नक्त नेमणूका करून देण्यात आल्या. सनदा व शिक्काबद्ध अशी ही व्यवस्था सनदांप्रमाणे आजपर्यंत चालू आहे.

या अष्टभुजा मूर्तीला सालंकृत करून उंची रेशमी-जरीची वस्त्रे, नाना तऱ्हेचे अलकार, घंघाळासह चांदीची पूजेसाठी अनेक उपकरणी व ५ फूट उंचीच्या दोन चांदीच्या समया यावेळी देण्यात आल्या. अलंकार, वस्त्रे, पुजेची उपकरणी यावर देखरेख ठेवणारा देवीचा व्यवस्थापक नेमण्यात आला. देवीचा छबीना, वळी व देकार ही यथावेळी दिले जातात की नाही हे पाहिले जाई व देवीची अतिशय सुंदर व्यवस्था करून हे एक लहानसे संस्थान महाराजांनी धर्मवुद्धीने व आत्मीयतेने निर्माण केले. आज देवालयांत मुख्य देवीच्या पूजेच्या अगोदर प्रतीकृतीची त्रिकाल पूजा होते.

सभासदी बखरीत खालील उतारा पान २२ वर आहे. ––

" आपण अफजल या हस्ते मारविला व कित्येक पुढेही आले. त्यास पराभवात नेले. पुढेही कर्तव्य उदंड कारण करणे आहे. आपण तुझ्या राज्यात वास्तव्य करावे असे आहे." आपली स्थापना करून पूजा पूजन प्रकार चालविणे अशी आज्ञा तुळजापूरच्या भवानीची झाल्यावर त्या उपरी राजे यांनी गंडकी नदीस द्रव्य, गाडीयावरी घालून गंडकी पाषाण आणून श्रीभवानी सिद्ध करून प्रतापगडी देवीची स्थापना केली. धर्मादाय उदंड केला. देवीस रत्नखचीत अलंकार, आभूषणे नानाप्रकारे करून दिली महाल मोकासे देवून संचतर (पुष्कळ) हवालदार, मुजुमदार व पेशवे देवीचेकडून महोत्सव देवीचा चालविला. नवस याचा सर्वदा तुळजापूरच्या प्रमाणे येथे चालती झाली आणि तुळजापूरच्या यात्रेस लोक जातात त्यास दृष्टांत स्वप्ने होतात की आपण प्रतापगडास आहे. तेथे तुम्ही जावून दर्शन घेणे व नवस फेडणे असे बोलू लागली, मोठे जागृत स्थान झाले."

देवीच्या देवळातील घंटा, उपकरणी वगैरेवर असलेले लेख वाचताना मोठी माहिती मिळते. अद्याप देवीचे संस्थान चालू आहे. गुरव, पुजारी,

पुराणिक, व्यवस्थापक व इतर कामगार यांची घरे गडावरच आहेत. एकूण ७० लोकांची वस्ती आजही गडावर आहे. ( सातारा गॅझेटिअर)

मोऱ्यांच्या रामवरदायिनी देवीला जे उत्पन्न जावळीच्या उत्पन्नातून चंद्रराव मोऱ्यांनी पूर्वीपासून लावून दिलेले होते तोच भाग छत्रपतींनी या नव्या देवीला दिला. त्या देणगीचे स्पष्टीकरण म्हणजे पारघाटातून जाणाऱ्या व येणाऱ्या मालावर घेण्यात येणाऱ्या जकातीपैकी दर बैलास १ रुक्का या देवीला मिळू लागला. (पत्रसार संग्रह २५९९) शिवाय फार मोठ्या उत्पन्नाचा भाग तोडून देण्यात आलेला होता तो वेगळाच.

ही देवी नवसाला पावते अशी प्रचीती येऊ लागल्याने प्रतापगडाच्या देवीचे भक्तही वाढत होते. सातारा व कोल्हापूरच्या राजघराण्याचे हे कुलदैवत असल्याने भक्तही वाढले. हे दैवत सातारा छत्रपतींचे खाजगीतील देवस्थान आहे. या देवीच्या दर्शन व पूजनाच्या निमित्ताने महाराज वारंवार प्रतापगडावर येत. देवीच्या गर्भागाराचे दरवाजे लावून तासन् तास देवीसमोर ध्यानस्थ बसत. ही तुळजामाता त्यांच्या अंगात संचार करून त्यांना संकटकाळी योग्य मार्ग दाखवीत असे.

रायगडावर सिंहासनावर बसण्याच्या अगोदर मे महिन्याच्या १६ तारखेस महाराज प्रतापगडावर गेले. ते २१ मे १६७४ पर्यंत प्रतापगडावर होते. (इ. फॅ. रेकॉर्ड नं. ४७८ पान ३६९) यावेळी शिवाजी महाराजांनी १। मण सोन्याचे छत्र देवीला अर्पण केले. जॉन फायर हा, इंग्रजी L च्या आकाराचा तो कळस होता, असे म्हणतो. याबद्दलचा उहापोह शिवराज्याभिषेक प्रयोग या पुस्तकाच्या पान २० वर श्री. बेंद्रे यांनी केला आहे. हा कळस अगर मुखवटा अगर छत्र ५६००० रुपये किंमतीचे १। मण वजनाच्या सोन्याचे होते. (प. सा. १६४२–४५) ही देणगी व पूजाविधी करून महाराज रायगडावर गेले. धर्मवीर संभाजी महाराज यांनी २३ ऑगस्ट १६८० रोजी भवानीच्या प्रसादाने राज्य मिळाले म्हणून दर साल १०,००० होन देण्याची सनद व पत्र दिलेले आहे.

रायगडाला झुलपुकारखान याने वेढा दिल्यावर छत्रपती राजाराम युक्तीने रायगडावरून निसटले व प्रतापगडावर ५ एप्रिल १६८९ रोजी आले. तेथून कर्नाटककडे जाण्याचा विचार ठरवून राजाराम जींजीकडे गेले.

देवीच्या समोर एक स्फटीकाचे शिवलिंग ठेवलेले आहे. ते लिंग पुरातन असून शिर्क्यांच्या राजवटीपासून ते गडावर आहे असे सांगितले जाते. हे लिंग ३ ते ४ इंच लांब व तेवढेच उंच आहे. मोरोपंत पिंगळ्यांना प्रतापगडाचे बांधकाम करीत असताना अचानक ते मिळाले. राजाज्ञेने नित्यपूजेत ते ठेवण्यात आले. या लिंगाच्या खालच्या बाजूचा एक कोपरा उडालेला आहे. त्याबद्दल एक दंतकथा सांगितली जाते. संभाजी शाक्यपंथीय झाले होते. वंशावतरण या काव्यात संभाजीच्या छांदोगामात्य कलुषा श्री. शिवयोगी, श्री. गणेश भट्ट जांभेकर, या सर्वांची नावे शाक्यपंथी म्हणून येतात. संभाजीचा गुरु शिवयोगी हा होता. बनारस बंगालकडून तो शाक्यपंथाची माहिती व आचार घेऊन तरबेज होऊन आला होता. गोव्यातील गौड व सारस्वत लोकांनी हा शाक्यपंथ शिवयोगी यांचेकडून स्वीकारला होता. याची मठी रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील शृंगारपूर या गावी होती. श्री. गणेश अनंत जांभेकर व केशव भट्ट उपाध्याय हे दोन त्याचे पट्टशिष्य झाले. शृंगारपूर पूर्वी राजे सुर्वे यांची राजधानी होती. शिवाजीच्या वतीने तानाजी मालुसऱ्यांनी सूर्यराव सुर्वे याला जिंकून तिवरे घाटाचा मार्ग प्रचीतगडासह ताब्यात घेतला. संभाजीने हे शिवलिंग रागाने एकवेळ भिरकावून दिले. त्यामुळे ते फरसावर पडून त्याचा कपचा उडाला अशी दंतकथा शिवलिंगाबाबतची सांगितली जाते. परंतु ती खरी नसावी.

राजसिंहासनारोहण विधीनंतर शिवाजी महाराजांनी निश्चल किंवा अचलपुरी गोसावी यांच्याकडून पुन्हा मंचकारोहण करून घेतले. हा निश्चलपुरी शाक्य होता शैव व वैष्णव मताचा शिवाजी त्या निश्चल-पुरीच्या मताप्रमाणे मंचकारोहण समारंभ करून गादीवर बसला. याला कारण या गोसाव्याच्याच शापाची मालिका कारणीभूत झाली पुन्हा मंचकारोहण केले नाही तर एक शाप परंपरा निश्चलपुरीने दिलेली होती. त्याची शापवाणी राज्यारोहणानंतर १४ व्या दिवशी मातोश्री जिजाबाईच्या

मृत्यूने खरी झाली. प्रतापगडावरील एक घोड्याची पागा वीज पडल्याने जळून गेली. या प्रचीतीनंतर महाराजांनी पुन्हा मंचकारोहण केले होते.

शिवाजी महाराजांनी बांधलेल्या देवीच्या देवळावर एकवेळा वीज पडल्याची नोंद आहे. यावेळी देवीचा गाभारा मोडतोड न होता सलामत राहिला अलिकडेच पुन्हा एकवार वीज पडून देऊळ जळाल्यामुळे सातारच्या महाराजांनी व फलटणच्या निबाळकरांनी सन १९२७ मध्ये सीमेंट काँक्रिटचे जुने देऊळ होते तसेच आज बांधले आहे.

छत्रपती शाहू महाराजांची या देवीची उपासना चालूच होती. त्यांनी अनेक देणग्या देवीला दिलेल्या आहेत. बहुसंख्य मराठे सरदार छत्रपतींच्या या कुलस्वामीनीला भजणारे भक्त झाले होते. शाहू महाराजांच्या राण्यांची तर नितांत श्रद्धा या देवीवर होती. एकेकाळी शाहू महाराज आजारी पडले असताना त्यांची राणी विरुबाई हिने आपली कंकणे देवीसमोर ठेवून राजांची प्रकृती क्षेम करण्याची याचना व प्रार्थना केलेली होती सुदैवाने महाराज बरे झाल्यावर तिने आपली कंकणे परत नेली. श्री. यमाजी शिवदेव व प्रतिनिधींचे घराणे या देवीवर अपार श्रद्धा ठेवून असे. संकटात अद्यापही लोक या देवीला नवस करीत असतात. त्याची करुणा ऐकून देवी त्यांचे मनोरथ पूर्ण करीत असते. संभाजीची आई सईबाई आजारी असताना मला प्रतापगडावर देवीच्या सान्निध्यात ठेवा असा भक्तिभावाचा हट्ट तिने धरला होता. शेवटी प्रतापगडावरच ती निधन पावली. मिर्झा राजा जयसिंगाच्या स्वारीत फक्त ४० दिवस हा गड मोगलांच्या ताब्यात होता. मिर्झाराजा जयसिंगाने प्रतापगडावर शिवाजीचा एक चुलतभाऊ याला पाठविले होते. शेवटी तो गड मराठ्यांच्या युद्ध मंडळाने आपल्या ताब्यात घेतला. शिवाजीच्या ह्या चुलत भावाचे नाव खेळोजी भोसले असे होते. ४० दिवसांनंतर हा गड पुन्हा मराठ्यांच्या ताब्यात आला. तो रामचंद्र निळकंठ यांनी युक्तीने घेतला. छत्रपती राजारामाची बायको ताराबाई हिनेही प्रतापगडच्या देवीला भक्तिभावाने वारंवार देणग्या दिलेल्या दिसतात. पेशवाईमधे सातारच्या राजांनी देवीला

काहीही कमतरता पडू दिली नाही. सातारचे राजे यांची नितांत श्रद्धा या देवीवर आहे. सखाराम बापू बोकील हा पेशवाईतील मुत्सद्दी एक वर्षपर्यंत गडावर कैदेत होता. पुढे त्याला रायगडावर नेले व तेथे ते मेले. दुसऱ्या बाजीरावाने २५ जून सन १८०० या दिवशी श्री. नारोपंत चक्रदेव, श्री. बजाबा शिराळेकर, श्री. राघोपंत गोडबोले या भवानीच्या भक्तांना येथे कैदेत ठेवले होते. दुसऱ्या बाजीरावाच्या स्वैरपणाला या लोकांनी अडथळा केला असा आरोप बाजीरावाने या थोर लोकांवर ठेवला होता. वरील लोक या देवीचे भक्त आहेत हे समजून आल्यावर दुसऱ्या गडावर, रायगडावर त्यांची रवानगी करण्यात आली.

अद्यापही पूजा अर्चा सातारच्या छत्रपतींच्या वतीने चालते. देवीची पूजा दोन निरनिराळ्या रितीने केली जात असते. मध्यंतरीच्या काही काळात शतचंडीसारखे काही विधी बंद करण्याचा विचार चालू होता. परंतु विद्यमान सातारच्या राणीसाहेबांनी नवरात्र उत्सव व इतर उत्सव जसे पूर्वी चालत आले होते तसे स्वखर्चाने चालविण्याचा निश्चय केला व आजही ते उत्सव महाराणी सुमित्रादेवी भोसले, सातारा यांनी चालू ठेवले आहेत. राणीसाहेब स्वत: या नवरात्र उत्सवात युवराजांसह हजर राहतात व काहीएक कमी पडू न देता शिवकालापासून जसे चालत आले आहेत तसेच सर्व धर्मविधी त्यांनी आत्मीयतेने धर्मबुद्धीने चालूच ठेवले आहेत. हे त्यांचे कृत्य धार्मिक आणि थोर मनाच्या बुद्धीचेच स्पष्ट असे उदाहरण आहे.

प्रतापगडची ही देवी संस्थापित करून शिवाजी महाराजांनी शैव, वैष्णव व शाक्य पंथाचा एकीकरणाचा महान प्रयोग केला आणि उभ्या महाराष्ट्राने तो आत्मीय म्हणून मानला. श्रीरामदासस्वामींनी या देवीच्या बाबतीत श्रीवरदायिनीचा शोध प्रतापगडावर ती असल्याचा लावून एक मोठी कामगिरी केली. स्वतः रामभक्त असूनही श्रीरामदासांनी काही अंशाने शाक्य पंथाला उचलून धरले. मात्र त्यांनी अघोर कृत्ये दूर सारून त्या पंथाला सोज्वळ स्वरूप दिले.

शिवाजी व रामदासस्वामी यांची भेट अतिशय उशीरा झाली असे म्हणणाऱ्या लोकांनी प्रकटरित्या हे दोन राष्ट्रपुरुष एकमेकांना भेटले नाहीत असे म्हटले तरी अफझुलखान वधाच्या अगोदरच्या काळापासून हे दोघेही एकमेकांना भेटत असत ही गोष्ट खरी मानावी लागते. अफझुलखान वधाच्यावेळी बोलाविल्या गेलेल्या मुत्सद्यात नारायण ब्राह्मण असे एक नाव आहे. तो ब्राह्मण दुसरा तिसरा कोणी नसून श्रीरामदास स्वामी होते, हे लक्षात यावयास उशीर लागत नाही. पांच हजार पायदळासह या नारायण ब्राह्मणाने शत्रु सैन्याला हैराण केले होते. हा नारायण ब्राह्मण रामदास स्वामी नव्हता असा पक्का पुरावा पुढे येईपर्यंत नारायण ब्राह्मण म्हणजेच श्रीरामदास असे म्हणणे आम्हास तरी योग्य वाटते.

♣ ♣ ♣

# ४ प्रतापगडाचे मार्ग

प्रतापगडावर जाणाऱ्या प्रवाशाला वाई अगर महाड या गावावरून जावे लागते. पुणे–महाबळेश्वर, मुंबई–महाबळेश्वर अशा स्टेट ट्रान्सपोर्टच्या गाड्या मुंबई व पुणे स्थानकावरून रोज सुटत असतात. महाडवरून मुंबई–महाबळेश्वर ही गाडी महाड, पोलादपूर या गावावरून जाते. याशिवाय मुंबईहून पुणे, वाई पाचगणी, महाबळेश्वर अशाही गाड्या सुटतात. पुण्याकडून येणाऱ्या लोकांना महाबळेश्वर–प्रतापगड अशी गाडी सकाळ-संध्याकाळ थेट गडावर घेऊन जाते. तर मुंबई–महाड–महाबळेश्वर ही गाडी वाडे या गावाजवळ आली म्हणजे तेथे प्रवाशांना उतरावे लागते. वाड्याला सरकारी डाकबंगला आहे. त्यात प्रवाशांची सोय होते. गडाच्या पायथ्याला लहानशी वस्ती आहे. तेथून पायाने प्रवास केला तरी १–१॥ मैलाचा चढाव चढून गेल्यावर प्रवासी गडावर जातो. सध्या कोल्हापूरहून पुणेमार्गे मुंबईस जाणारी गाडी व महाडमार्गे मुंबईला जाणारी गाडी अशा गाड्या येत असतात कोठूनही महाबळेश्वरला जाणारी गाडी पकडून प्रवाशाने महाबळेश्वरला प्रथम जावे व नंतर महाबळेश्वर–प्रतापगड गाडीतूनच गडावर जावे. गडाच्या पायथ्याला असलेले गांव महाड महाबळेश्वर रस्त्यावर कुंभरोशी या नावाचे आहे ते वाड्याच्या डाकबंगल्याच्या पूर्वेस २ फर्लांगावर आहे.

मुंबई प्रतापगड, महाड मार्गे अंतर १२७ मैल आहे. महाड कुंभरोशी हे अंतर ३२ मैल आहे. फिटझिराल्ड किंवा आंबेनळी असे या रस्त्यावरच्या घाटाचे नाव आहे. पुणे महाबळेश्वर अंतर ७५ मैलांचे आहे. महाबळेश्वराहून पश्चिमेस ८ मैल अंतरावर प्रतापगड आहे. कुंभरोशी गावात साधारण हॉटेले आहेत व ओझ्यासाठी मजूर व वाटाडेही मिळू शकतात. खाजगी गाड्याने कुंभरोशीहून गडाच्या दरवाज्यापर्यंत जाणे सोईचे झाले आहे. मुख्य दरवाज्याच्या थोड्या पायऱ्या चढल्या म्हणजे प्रवासी गडात जातो.

कुंभरोशी येथे जुजबी शेरशिधा मिळतो. खाद्यवस्तू मनासारख्या पाहिजे असल्यास त्या बरोबर आणणेच इष्ट आहे. गडावर कायमची राहणारी साधारण ८ ते १० कुटुंबे आहेत. योग्य पैसे दिल्यावर त्यांच्याकडे भोजनाची व्यवस्था होऊ शकते व वस्तीला जागाही मिळू शकते. आता गडावर प्रवाशां-साठी सुसज्ज असे विश्रामधाम बांधले आहे. सातारा जिल्ह्याच्या बांधकाम खात्याकडे पत्रव्यवहार करून जागा राखून ठेवण्याची सोय आहे. गडावर कायमची वस्ती असल्यामुळे सर्वसाधारण प्रवाशांना रहिवासाची अडचण तसेच भोजनाची अडचण पडत नाही. वाडे येथील बंगल्यात राहून गडावर जाऊन येण्यासारखे आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम खाते सातारा यांचेकडून रहिवासाचा दाखला अगोदर मिळवावा लागतो. तेथे रखवालदार वगैरे असतो. एकूण प्रतापगडाच्या प्रवासाला जाताना खाद्यपेयांची सोय आवडी निवडीप्रमाणे जरूर बरोबर घ्यावी. परंतु गडावर जुजबी हॉटेल, दुकाने आज झालेली आहेत. एस. टी. ची गाडी कुंभरोशीहून वळणावळणानें प्रथम अफझुलखानाच्या दर्ग्याजवळ जाते. एका सुंदर व स्वच्छ इमारतीच्या मध्यभागी अफझुलखान व त्याचा शरीररक्षक सय्यद बंदा यांच्या तुर्बती एकालाएक लागून बांधलेल्या आहेत. इमारत सारख्या लांबी रुंदीची आहे. उदबत्त्या व धूप यांचा घमघमाट सदैव या इमारतीत असतो. फार दूरदूरचे मुस्लीम व इतर लोकही नवस फेडण्याकरता याठिकाणी बहुसंख्येने येतात. हा दर्गा हैद्राबादच्या निजामाने नवस फेडण्यासाठी १ लाख रुपये खर्च करून ७५ वर्षांपूर्वी बांधला व रोज खर्चाची व्यवस्था कायमची करून देऊन दर्ग्याची देखभाल करणारे लोक नेमले. या दर्ग्याच्या जरा अलिकडे २० पावलावर ज्या ठिकाणी प्रथमच या दोन लोकांची प्रेते पुरली गेली होती, ती जागाही दाखविली जाते.

संधीवाताने जर्जर झालेले रोगी संधीवात बरा होण्यासाठी खानाची करुणा भाकून नवस करतात व बरे झाल्यावर तेथे नवस फेडण्यासाठी येतात. यामुळे या दर्ग्याकडे दिवसभर लोकांची रीघ लागलेली असते. प्रतापगडाच्या अफझुलबुरूजासमोर ही जागा आहे. दर्ग्याच्या पश्चिमेस गड व त्यावरील देवीच्या देवळाचे उंच कळस दिसतात. दर्ग्याच्या दक्षिणेस खोल व प्रचंड

अशी मोठी दरी आहे. तेथे पार या नावाचे गाव वसलेले आहे. जावळीकडून येणारी कोयना नदी येथे कुमठ्याच्या ओढ्याला मिळते. याच दरीत खानाचे सैन्य उतरले होते दर्ग्याच्या पूर्वेस रडतोंडीचा जुना घाट आज समूळ नाहीसा झालेला आहे. पारगावजवळूनच पूर्वीचा पारघाट कोकणात उतरतो. रडतोंडीच्या घाटापलिकडे महाबळेश्वरचे उंच उंच पठार आपणाला दिसते. या ठिकाणच्या उत्तरेस महाड–महाबळेश्वर रस्ता व त्याच्या पलिकडे खोल दरीत जावळी गांव आहे. जावळी गावाचे वर सह्याद्रीच्या उंच कड्यावर आपण चंद्रगड पहातो. महाबळेश्वरच्या स्थानकावरून जावळी व पारकडे जाऊन येणारी एस्. टी. ची गाडी आता सुरू झालेली आहे.

या दर्ग्याचा आसमंत अत्यंत स्वच्छ असा नेहमीच असतो. त्यामुळे प्रवाशाचे मन तेथील व्यवस्था, टापटीप, स्वच्छता पाहून नेहमी प्रसन्न होते. या दर्ग्याच्या उत्तर बाजूला प्रतापगडाच्या वाटेवर शिवाजीमहाराज व अफझुलखान यांची ज्या ठिकाणी भेट झाली ती जागाही दाखविली जाते. येथून निघाल्यावर पश्चिमेकडे समोर साधारण ३ फर्लांग अंतरावर प्रतापगड आहे. अफझुल बुरुजाच्या तळाला प्रवासी आला म्हणजे वर उत्तरेला गडाचा कडा आणि दक्षिणेला दरवाज्याचा ओहोळ यांच्यामधून पूर्वी ३ फुटाची एक पायवाट होती ती फर्लांगभर अंतराची असावी. ती चालून गेल्यावर गडाचा मुख्य दरवाजा पश्चिमाभिमुख असलेला लहानसाच पण पक्का बांधलेला प्रवाशाला दिसतो. या दरवाजाचा समोरचा भाग वर्तुळाकृती खोल असा खणून काढलेला आहे. तेथे साधारण १०० ते १५० सैनिक उभे राहू शकतील. या दरवाजाच्या आत पायऱ्यांचे तीन टप्पे मध्ये रमणे टाकून बांधले आहेत व प्रत्येक रमण्याजवळ पहारेकऱ्यांसाठी विश्रांतीच्या ओवऱ्या बांधलेल्या आहेत. हे तीनही टप्पे प्रवासी वर चढून गेला म्हणजे एका दरवाज्यातून गडाच्या मुख्यभूमीवरती पाय ठेवतो. समोरच पूर्वेला पुढे पुढे अरूद होत गेलेली तटबंदी फर्लांग लांबीची आहे व शेवट अफझलखानाचे शीर ज्या ठिकाणी पुरले ती जागा आहे. या ठिकाणाहून समोरच पश्चिमेस प्रतापगडाच्या भवानीचे देऊळ उंचावर असलेले आपणास दिसते.

अफझुल बुरूजापासून गडाचा दरवाजा डाव्या हाताला टाकून प्रवासी गडावर जाऊ लागला म्हणजे डाव्या हाताला जुन्या कमानीचे बांधकाम दिसते. आदिलशहांच्या व मोऱ्यांच्या काळात हा गडाचा मुख्य दरवाजा असला पाहिजे. थोडीशी चढण लागल्यावर देवळाच्या लांबच लांब पायऱ्या दिसू लागतात. गडाच्या पूर्वेची सर्व तटबंदी या पायऱ्यां-वरून स्पष्टपणे दिसते. खाली ४००–५०० फूट उंचीचे काळे पत्थर कडे व त्यावर बांधलेली ही तटबंदी शिवाजीचे पेशवे मोरोपंत पिंगळे यांनी आपल्या कल्पना चातुर्याने बांधलेली आहे. बंदुकांचा मारा करण्याकरता तटाच्या सफेळीला उतरती भोके ठेवलेली आहेत. गडाचे उंच असे ३ टप्पे स्पष्ट दिसतात. एका टप्यावर अफझुल बुरुज तर दुसऱ्या टप्प्यावर भवानीचे देवालय येते, तर तिसऱ्या टप्प्यावर बाले-किल्ला येतो.

गडाच्या मुख्य दरवाजाला आज झडपा नाहीत. ठिकठिकाणी नादुरुस्तीमुळे तटाचे दगड कोसळत आहेत. देवीचे देऊळ प्रशस्त व मोठे आहे. त्याच्या गाभाऱ्याचा भाग जुना शिवकालीन आहे. बाकीचे सर्व देऊळ आधुनिक पद्धतीचे सिमेंट काँक्रिटचे बांधलेले आहे. देवळात शिरल्याबरोबर पूर्व बाजूला नगारखाना दिसतो, त्यात अतिशय मोठे नगारे ठेवलेले असून तेथे त्रिकाळ चौघडा झडतो. सनया, नगारे, पडघम् संबळ तेथे आपणाला दिसतात. ही सर्व हत्यारे तांब्याची असून त्यावरचे लेख व नावे जुनी व वाचण्यालायक आहेत. नव्या बांधकामाचे दुसऱ्या गाळ्याचे आत डोक्यावर अनेक घंटा लावलेल्या आहेत. त्याच्या आत मुख्य गाभारा आहे व ४–४॥ फूट उंच व तेवढ्याच रुंदीच्या सिंहासनावर देवीची अष्टभुजामूर्ती गंडकी शिलेची विराजमान आहे. शिवाजी महाराजांनी आपली कुलदेवता म्हणून ही मूर्ती तेथे संस्थापित केली. गाभारा ऐसपैस असून त्यात थोडासा काळोखच आहे. देवीचे दर्शन घ्यावयाचे असेल तर नगरखान्याच्या खालच्या भागात मोठा आरसा धरून त्याचा कवडसा थेट मूर्तीवर पाडून देवीचे सम्यक दर्शन प्रवासी घेऊ शकतो. जवळच डाव्या हाताला सिंहासनावर देवीची प्रतिकृती ठेवलेली आहे. सिंहासनाच्या दोन्ही

बाजूला दोन ५ फूट उंचीच्या समया असून पूजेचे वेळी सर्व वाती लावल्यावर देवीची शोभा अवर्णनीय दिसते. देवी पुढेच स्फटिकाचे शिवलिंग ठेवलेले असते. चांदीची उपकरणी, घंगाळापासून निरांजनापर्यंतची आहेत. एकेकाळी देवीच्या अंगावर रत्नजडीत हार, रेशमी वस्त्रे व रत्नांनी मढविलेला मुगूट होता. तो चोरी होऊन पळवून नेला गेला. लाखो रुपयांचे दागिने व दुर्मिळ रत्ने अशा रितीने साधारणतः ३०–३५ वर्षांपूर्वी चोरीला गेली. या देवालयात पुराण कथन, कीर्तन, त्रिकाल पूजा, नैवेद्य हे आजपर्यंत होतात. नवरात्रात देवी घटी बसल्यावर हजारो भक्त उभ्या महाराष्ट्रातून आपले नवस फेडण्यासाठी देवालयात येतात. पूर्वी ब्राह्मण भोजने व भक्त भोजने होत असत. मध्यंतरीच्या आपसातील काही तंटयांमुळे जाती जातींचा संघर्ष वाढू लागला व परिस्थितीही सर्व बदलली म्हणून हा भोजनाचा कार्यक्रम बंद ठेवावा लागला. तरीही नऊ दिवस भक्त भोजने व ब्राम्हण भोजने कमी प्रमाणात होतातच. या नऊ दिवसात गडावर भक्तांची रहदारी प्रचंड अशी असते.

♣ ♣ ♣

# ५ बालेकिल्ला

जगदंबेच्या देवळात जगदंबेकडे तोंड करून पहिल्या विभागात उभे राहिले असता डाव्या हाताकडे एक वाट फुटते. ३॥–४ फुटाचा हा वोळ वाकडा तिकडा तटाजवळून आत आत जातो. शेवटी गडाच्या नैऋत्य कोपऱ्यात उंच तटबंदीच्याखाली एक विस्तीर्ण तळे आहे. याच तळ्याचे पाणी सर्व गडाला पुरते. येथील तळ्याच्या भोवतालची तटबंदी ३०–४० फूट उंचीची असून पक्की व मोठमोठ्या दगडांची बांधलेली आहे. भवानीच्या देवळाच्या पायऱ्यावर उत्तरेकडे तोंड करून उभे राहिले म्हणजे पूर्वेकडे उतरता उतार आपण पहातो. त्या उतारावर एक लहानसा तलाव आहे. या विभागाचा कोट वाकडा तिकडा तुटलेल्या कड्यांवर बांधलेला आहे. तट कमी उंच व रुंद असा दिसतो याला कारण तटाखालच्या कड्यांची उंची फार मोठी आहे. कडा जेथे कमी उंचीचा वाटला तेथे मोरोपंतांनी उंच तटही बांधलेले दिसतात. उत्तम सेनापतीला ज्याप्रमाणे प्रतिकाराचे साधन जरूर वाटते, तसे तो बांधीत असतो. अशा तऱ्हेने हे बांधकाम अभेद्य केलेले आहे. देवीच्या देवळापासून बालेकिल्ल्याची वाट वायव्येकडे उंच उंच गेलेली दिसते. बालेकिल्लाही सर्वत्र कड्यांचा आहे. देवीच्या देवळाचा कळस व बालेकिल्ल्याची सपाटीही सम उंचीवर येते.

या रस्त्यावरून गेल्यावर बालेकिल्ल्याचा पूर्वाभिमुख दरवाजा आपण पाहतो. या दरवाजाच्या बाहेर पायऱ्यांच्याखाली एक हनुमान मंदिर बांधलेले आहे. लहानशा घुमटीतच या हनुमानाची स्थापना बहुधा श्रीरामदासस्वामींनी शिवथरचे मोरे त्या गादीवर बसविल्यावर केलेली असावी. पिंगळ्यांनी गड बांधल्यावर हा मारुती बसवला गेला असता तर मुख्य दरवाजाच्या आत दरवाज्याच्या किंवा बाहेर बसविला असता. हा मारुती वीर मारुती आहे. मारुतीचे प्रकार निरनिराळे आहेत. हात जोडलेला, हातात गदा घेतलेला, पायाखाली राक्षस तुडविणारा, हातावर डोंगर घेऊन

उड्डाण करीत जाणारा व आकाशात झेप घेणारा असे मारुतीचे प्रकार दिसतात. त्यांना दास मारुती, वीर मारुती, महाबळी, सेवक आणि लंकाउड्डाण मारुती असे म्हणतात.

मारुतीच्या देवळाकडे पाठ करून उभे राहिले म्हणजे समोरच बालेकिल्ल्याचा दरवाजा दिसतो. उंच व रुंद असा तो आहे. त्याला बुरुज नाहीत. म्हणजे मोरेकालीन गुढेगड चौकीवजाच होता. याला बुरुज नसण्याचे कारण मुख्य सत्ता मोऱ्यांना सांभाळणारी होती व शत्रू येथपर्यंत येईल व गडावर हल्ला करील असे सत्तेला वाटले नसावे. या दरवाजातून आत गेल्यावर प्रवासी बालेकिल्ल्यात जातो. तेथे सपाटी आहे. दरवाजातून आत शिरल्यावर उजव्या हाताला शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा आपण पहातो. त्याच जागी पूर्वीचा राजवाडा होता. शिवस्मारक समितीने हा पुतळा उभारलेला असून सन १९६० साली त्या भोवती सुंदर पद्धतीचा बगीचा केला आहे. भारताचे भूतपूर्व प्रधानमंत्री व सुपुत्र स्वर्गीय पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी या पुतळ्याचे उद्‌घाटन झाले. शिवस्मारक समितीने योग्य ठिकाणी हा पुतळा उभारला असून त्यांत पुतळा करणाऱ्या कलावंतांच्या कला अत्यंत वरच्या दर्जाच्या प्रतीत होतात. खाली एक उंच चौथरा २० फूट उंचीचा व त्यावर १७ फूट उंचीचा अश्वारूढ पुतळा पूर्णाकृती व भव्य असा उभारला आहे. पुतळ्याची दृष्टीची झेप महाबळेश्वर व अफझुलखानाच्या दर्ग्याकडे आहे.

या पुतळ्याच्या मागील बाजूला सायंकाळी दिवा लावला जातो. पूर्वीच्या राजवाड्यातील एकतर तेथे देवघर असावे अगर कसलेतरी देवस्थान त्या जागी असले पाहिजे. बालेकिल्ल्याच्या दरवाजासमोरच केदारेश्वराचे देऊळ आहे. हे देवालय आज पत्रे ठोकून शाकारलेले दिसते. प्रतापगडावरची प्रायमरी शाळा या देवालयात भरते. गाभारा १० एक माणसे बसतील असा व प्राचीन दिसतो. शिर्के राजवटीपासून हे देवालय असावे. याचे नाव केदारेश्वर ठेवण्याचे कारण कोणातरी केदारजी या नावाच्या माणसाच्या स्मारकासाठी हे देवालय बांधले असावे. शिवाजी महाराजांनी नवे नाव ठेवलेला रायगडावरचा जगदीशेश्वर पूर्वीचा वाडेश्वर होता. केदारजी

या नावाचे शिर्के पूर्वी होऊन गेलेले होते. या शिवालयाचा गाभारा पुरातन व सभामंडप नवा आहे.

शंकराची नावे अनेक ठिकाणी अनेक ठेवलेली आढळतात. देवालयातूनही फरक दिसतात. काहीं पुढे नंदी असतात तर काहीं पुढे नंदी नसतात. पन्हाळगडावर संभाजी राजांचे मंदिरासमोर अशी ४–५ लहान लहान शंकराची देवळे बांधलेली आहेत. या शंकराच्या पिंडीवर लुगडे पांघरून ठेवलेले असते. त्या सर्व राजस्त्रियांच्या समाध्या आहेत. अशाच तऱ्हेने शंकर मंदिरात कुठे शिंदेशाही पगड्या, उपरणी तर कुठे भगवी वस्त्रेही पांघरून ठेवलेली दिसतात. प्रार्थना, पूजा करण्यासाठी बांधलेली शंकर मंदिरे व स्मारकरूपी शंकराची मंदिरे बांधण्याचा प्रघात होता. अनेक गावातून नदीकाठी स्मशानात शंकरची लिंगे स्थापन केलेली आपण पहातो. वाराणशीच्या घाटावर असेच समाधी शिवमंदिरांचे प्रकार आजही दिसतात. या केदारेश्वर मंदिरासमोर वरच्या दरवाजाजवळ एक घरटा दाखविला जातो. ती किल्लेदाराची कचेरीची जागा आहे–पूर्वी होती असे सांगितले जाते. त्याजागेला कचेरी म्हणतात.

देवीच्या देवळापासून बालेकिल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत पश्चिमेच्या बाजूला पुजाऱ्यांची घरे आहेत. तसेच केदारेश्वराच्या देवळापासून दक्षिणेस भवानीच्या सेवेकऱ्यांची ८—१० घरे आहेत. ती गडावरची मुख्य वस्ती होय. पुतळ्याच्या उत्तरेस खोलगट भागावर एक अर्धवर्तुळाकृती बांधकाम केलेला विभाग, हवा खाण्याची जागा म्हणून संबोधला जातो. या बालेकिल्ल्याच्या पश्चिम तटावर चढले असता किनेश्वरचे प्रचंड खोरे दिसते. प्रतापगडाच्या पश्चिम बाजूला पैठणचे खोरे, किनेश्वर खोरे व देवळे खोरे हे विभाग येतात. सह्याद्रीची उंच उंच शिखरे सभोवार दिसतात. गडाच्या पूर्व बाजूला जावळीचे प्रचंड खोरे, पारचे खोरे आणि महाबळेश्वरचा उंच पठारी विभाग दिसतो.

हा किल्ला फुलपांखराच्या आकाराचा आहे व मोठ्या मोक्याच्या नाक्याच्या जागी उभा आहे. देशावरून मालाची ने आण करणारा पारघाट हा पुरातन घाट गडाच्या दक्षिणेला आहे. ताम्हणा या नावाचा एक घाट

जवळच असला तरी तो वाहतुकीला सुखाचा नव्हता. प्रतापगडाच्या उत्तरेला जावळीच्यावर कारंजा घाट व त्याच्यापलीकडे ढवळचा घाट आहे. ते घाटही वाहतुकीला उपयोगी पडण्यासारखे नव्हते. त्या काळचे प्रसिद्ध बंदर दाभोळ याला पारघाट हा निकटचा व खुष्कीचा होता. त्यामुळे पारघाटाचे नाके ज्याच्या हाती त्याच्या हातात व्यापाराच्या नाड्या येत. शिवाजीने जावळी घेतल्या बरोबर पारघाट त्याच्या ताब्यात गेला व अशा रितीने आदीलशाही मुलखातला व्यापार थंडावत चालला. याच कारणामुळे विजापूरच्या आदिलशाहीला वाई येथे आपला सुभेदार म्हणून कर्नाटकचा सुभेदार अफझुलखान याला आणणे भाग पडले. तो पूर्वी वाईच्या सुभ्यावर सुभेदार म्हणून होता. त्याला मावळी मुलखाची व मावळ्यांच्या स्थितीची पूर्ण जाणीव होती. विजापूरच्या आदिलशाहीपुढे जीवन मरणाचा प्रश्न शिवाजीने उभा केला होता. शिवाजीच्याही कसोटीची ही वेळ होती. आदीलशाहीचा पक्ष बलाढ्य, सर्व तरतूदींनी पूर्ण असलेला, सर्व मावळांवर. आधिसत्ता असलेला असा होता. तर शिवाजीची सत्ता वर्धिष्णू अशी होती. बलाबलाचा विचार करता एका जुनाट प्रचंड सत्तेशी शिवाजीला टक्कर द्यावयाची होती. ते काम तितकेसे सोपे नव्हते. मूठभर मावळ्यांच्या एकवटलेल्या शक्तिच्या बळावर शिवाजी लढणार होता. मावळातील देशमुख ह्या दोन्ही सत्तांपुढे झुकून वागत असत. शिवाजीला मदत केलीच पाहिजे असे ताठर मनाने सांगणारे जेधे, सिलीमकर वगैरे देशमुखही हक्क संबंध मिळविण्याचा व नवी इनामे मिळविण्याच्या नादात होते. अशा वेळी सर्व तरतूदी पूर्णपणे घेऊन व सर्वाधिकार सत्तेकडून घेऊन आलेला, अफझलखान दरबारात विडा उचलून तयारीनिशी निघाला होता.

हे आणीबाणीचे युद्ध कोठे खेळले जावे याचा विचार अनेक दिवस शिवाजी महाराज करीत होते. आणि त्यांनी पुणे विभागाकडे हे युद्ध न खेळता प्रतापगडासारख्या बिकट जागी हे युद्ध खेळावे असे ठरविले आणि ते प्रतापगडावर येऊन दाखल झाले. यावेळी प्रतापगडाच्या आसपास १०–३५ मैलांच्या टापूत ५–७ लढाया झाल्या. जनीच्या डोंगराची लढाई, कोयना-काठी पार या गावी झालेली लढाई व वाई येथील घनघोर लढाई, जावळीची

लढाई अशा लहान-मोठ्या निर्णायक लढाया झाल्या आणि त्या सर्व लढायात शिवाजी महाराज विजयी झाले. याच पारघाटामध्ये पूर्वी बाजी शामराज दहा हजार फौजेनिशी शिवाजीवर आला असता त्याचेवर अचानक हल्ला करून शिवाजीने नाहीसा केला होता. खान अफझुलखान महाराजांना जिवंत किंवा मेलेला विजापूरास नेण्यासाठी आला होता. या वेळी शिवाजी महाराजांच्या हेरांनी अचूक बातम्या देऊन खानाकडील इत्यंभूत बातमी महाराजांना दिली होती, म्हणूनच शिवाजी महाराज या युद्धात विजयी झाले. मराठ्यांच्या गनिमीकाव्याचा हा विजय होता.

प्रतापगडचे युद्ध हा एकच मोठा घडलेला इतिहास प्रतापगडाला अजरामर करून गेला. हे युद्धही महाराष्ट्राची जीवन मरणाची घटका होती. सर्व शक्ती एकवटून कडवट सेनापतीच्या अधिपत्याखाली आदिलशाहीने त्याच्या राज्याच्या सीमेत त्याच्या एका थोर दरबाऱ्याच्या मुलाने आरंभलेले बंड मोडून टाकण्यासाठी अफझुलखानाला पाठविले होते.

इ. स. १६३६ मध्ये निजामशाही टिकवून धरणारा सरलष्कर शहाजीराजे भोसले, मोगल सेनापती खानजमान व विजापूरचा सेनापती रणदुल्लाखान यांच्या करवी माहुलीच्या किल्ल्यात कोंडला गेल्यावर निजामशहाला त्यांच्या ताब्यात देऊन शहाजी विजापूरच्या नोकरीत राहिला. ( शि. प्र. स. ५५ ) होता.

शहाजीला पुणे परगण्याचा मोकासा आदिलशाहीने २५-२-१६३८ या दिवशी दिला. सन १६३८ साली बाल शिवाजी व जिजाबाई ही प्रथम पुणे येथे व नंतर खेडेबारे किंवा शिवापूर येथे जाऊन राहिली. (प. स. २५३७) येथे वाडा बांधून शिवाजीच्या नावाने शिवापूर पेठ नवी वसविण्यात आली. सन १६४१ मध्ये शिवाजीला पुणे परगण्याचा कोट मोकासा बापाकडून मिळाला. ( शिवभारत १०-दा. २८ ) शिवाजी वाढत होता. विजापूरच्या राज्यात होणारा धर्मछळ तो मावळामावळांतून हिंडून पहात होता. त्या मावळात जिवाचे मित्रमंडळ त्याने गोळा केले. सर्वनाश, चिंता, दारिद्र्य आणि सत्तेच्या चाकरांकडून होणारा धर्म व कर्म छळ

थांबवायचा असेल तर स्वातंत्र्य मिळविलेच पाहिजे असे शिवाजीच्या मनाने घेतले आणि मराठी सर्वसाधारण जनताही त्यासाठी तयार होती.

यावेळी दादाजी कोंडदेव मलठणकर हा शहाजी राजाचा जुना कारभारी राजांवर देखरेख ठेवण्याकरता होता. शिवाय पेशवा, मजुमदार, डबीर, सबनीस, वगैरे अधिकारीही नेमून दिलेले होते. दादाजी कोंडदेव १५ जुलै १६४७ रोजी वारले. त्यांच्या अगोदर सन १६४५ मध्ये शिवाजीने रोहीर खोऱ्यातील रोहिडेश्वर महादेवासमोर हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची शपथ या दादाजीपंतांच्या विद्यमाने शिवाजी व त्यांचे मित्र यांनी घेतली होती. त्या शपथा घेणाऱ्यांपैकी अनेक वीर पुढे जीवन–मरणाच्या लढ्यात आत्मीयतेने वागले. परंतु बांदलांसारखे लोक दुटप्पी वर्तन करीत होते. खंडोजी खोपडे व केदारजी खोपडे हे शिवाजीच्या विरुद्ध गेले. शिवाय अनेक देशमुख व सरदार अफझुलखानाच्या फौजेत दाखल होत होते. अशा रितीने शिवाजी महाराजांच्या सभोवार जमलेले लोक व खानासभोवार जमलेले लोक यांची तुलना करता खानाचे पारडे जड होत होते. ४–११–१६५६ रोजी विजापूरचा बादशहा मुहंमद शहा मरण पावला आणि दुसरा अल्ली विजापूरकरच्या गादीवर बसला. यावेळी मावळे देशमुखांना व इतर लढवय्यांना गावे इनाम देण्याचा सपाटा आदिलशहाने चालविला होता. शिवाजीला काही सनदातून स्पष्ट शिव्या दिलेल्या आहेत. "जावळीवर गैरी लोकांनीं कबजा केला आहे" असे शिवप्रणीत मोऱ्यांबद्दल त्या पत्रातून लिहिलेले आहे. त्यांचा फडशा करण्याकरता व शिवाजीचे बंड स्पष्टपणे मोडून शिवाजीचा निर्मूळ फडशा करण्याचे फर्मान १६–६–१६५९ ला कारीचे कान्होजी जेधे यांना आलेले प्रसिद्ध आहे.

शिवाजीचा धुमाकूळ वाढत होता. आदिलशहा अज्ञान होता. त्याचे पालन करणारी पालनकर्ती बडीसाहेबा बेचैन झाली होती. सर्व सुभेदारांना एकत्र बोलावून दरबारात व पृथक पृथक असा विचार विनिमय तिने केला होता. विजापूरचा दिवाण आणि इतर युद्ध मंडळातील सभासदांनी अनेक दिवस विचार विनिमय केले. या स्वारीचा सर सेनापती म्हणून अफझुलखानाला नेमल्यावर त्याला पोशाख वगैरे देऊन सत्कार करण्यात

आला होता. अफझलखानाने मोगली फौजांवर नुकताच विजय मिळविला होता.

पर्णाली पर्वताख्यान या काव्यात कवी जयराम पिंडे याने अफझुलखान हा मोठा बुद्धीमान, बलवान व महाबाहू होता, असे अध्याय २ श्लोक ३० मध्ये लिहिले आहे. तवारिखे आली या लिखाणात अफझुलखान व पन्हाळा या प्रकरणांत शिवाजीला तंबी देण्याकरता व उखडून टाकण्याकरता १०,००० स्वारांसह खानाची नेमणूक विजापूर दरबारने केली आहे असे लिहिलेले आहे. ( पान ३५ ) शिवाजीने वाटेल ते सांगितले तरीही न ऐकता " त्याच्या जीविताच्या हंगामावर अग्नी टाकल्याशिवाय व त्याच्या जीवित भीतिचा नाश करण्याशिवाय इतर काही करू नकोस " असा स्पष्ट आदेश बडीसाहेबा हिने खानाला दिलेला होता. त्याचा अर्थ सुस्पष्ट आहे की शिवाजीला ठार मारण्यासाठीच खान स्वारीवर निघाला होता. विजापूरच्या बादशहाच्या भटारखान्यातील एका दासीचा हा मुलगा अबदल्ला अफझुल-खान या पदवीने विभूषित केला गेला. त्याने सैन्य जमा केले व मोठ्या योग्य तरतूदीने सन १६५९ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस तो विजापूरहून निघाला. १२,००० घोडदळ, १०,००० पायदळ, ९० मोठ्या व ४०० लहान तोफा ५५,००० खलाशी घेऊन ऐन पावसाळ्यात खान आषाढ महिन्यात वाईला येऊन पोहोचला.

खान विजापूरजवळ तोरगल या गावी रहात असे. स्वारीला निघण्यापूर्वी तो गुरूच्या दर्शनाकरिता गेला असता त्याच्या गुरूला फक्त त्याचे धडच दिसले ही गोष्ट त्याच्या गुरूने त्याच्या कानी घातली व खान मनात वर्मून गेला. आपल्या वाड्यात आल्यावर त्याने आपल्या ६० बिब्या आपल्या हाताने मारल्या. त्यांची थडगी अद्याप तोरगल या गावी दाखविली जातात, असे परदेशी प्रवाशांच्या लिखाणात लिहिलेले आहे. चिडलेल्या खानाने आपला मार्ग तुळजापूर, पंढरपूर यावरून आखला होता. त्याचा पुणे, राजगड इकडे जाण्याचा रोख होता. पुणे प्रांतातून शिवाजी प्रतापगडावर जाऊन राहिला आहे हे समजल्यावर तो तुळजापूरकडे गेला नाही. त्याने तुळजापूरला आपले काही सैनिक पाठवून त्या देवस्थानची लूट केली असे

सांगितले जाते. तुळजापूर व पंढरपूर येथे त्याने देवाची विटंबना केली किंवा नाही, याबद्दल दंतकथा सोडून दिल्या तर कागदपत्रातून या देवस्थानांना "तसवीस" दिली असे लिहिलेले आहे. याचा अर्थ खानाने देवळांचे पावित्र्य राखण्यासाठी म्हणून बराच पैसा उकळलेला दिसतो. याचे प्रत्यंतर मायणीच्या मैदानावर आलेले दिसते. तेथे फलटणचा निंबाळकर या स्वारीत सामील झाला नाही म्हणून त्याच्या गळचात तोफ अडकवून त्याची निर्भत्सना खानाने केली. बजाजी निंबाळकरांचा मुलगा महादजी हा शिवाजीचा जावई होता. खानाने निंबाळकरांना पुन्हा सुन्ता करवून मुसलमान करण्याचा धाक घातला. यापूर्वी बाटलेला बजाजी शिवाजी महाराजांनी शुद्ध करून घेतलेला होता. बजाजीकडून साठ हजार होन घेऊन इतर मराठ्यांच्या मध्यस्थीन खानाने त्याला सोडला. या एका गोष्टीवरून खान या ना त्या मार्गाने पैसा गोळा करीत होता हे समजून येते. वाईला आल्यावर खानाने सर्व मावळातून डांगोरे पिटले व यावेळी मदत करील त्याचे उर्जीत होईल, व मदत करणार नाही त्याचा निर्मूळ फडशा पाडण्यात येईल असे स्पष्टपणे फर्मानाने बजाविले होते.

खान वाईला आल्यावर त्याने नवे ३००० मावळे प्रादेशिक माहिती असलेले व डोंगराळ भागात संचार करण्याची संवय असलेले लढवय्ये असे नवे नोकरीत घेतले. खानाच्या फौजेत इंगळे, घाटगे, खऱ्हाटे, घाटमे, पांढरे, जाधवराव, प्रतापराव मोरे, घोरपडे, काटे, भोसले ही मंडळी सामील झाली होती.

प्रतापगडाच्या युद्धाचे पोवाडे १–२ प्रसिद्ध आहेत. फतनजी या अज्ञात शाहीराचा बिरमल (पोवाडा) भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वर्ष ४४ अंक १ ते ४ या पुस्तकांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तो इकवी सन १७०० चे आसपासचा आहे. या युद्धावरच्या काही गोष्टी या बिरमलमध्ये सत्यप्रकाश टाकणाऱ्या आहेत. अगिनदासाच्या पोवाड्यापेक्षा हा पोवाडा विश्वसनीय वाटतो. त्या पोवाड्यात खानाच्या बाजूला असलेल्या मराठी व मुस्लीम सरदारांची नावे पुढीलप्रमाणे दिली आहेत.

बाजी घोरपडे, नाईकजी पांढरे, मंबाजी भोसले, अंकुशखान, सिद्दी समे, सिद्दी हिलाल, मुसेखान रोहिला ही नावे दिलेली असून १४००० घोडा खानाजवळ होता असे पोवाडेकार म्हणतो.

वाईला खान आल्यावर पांडवगडचा डोंगर आणि बावधनचा डोंगर यामध्ये खानाने आपले सैन्य पसरून ठेवले. पांडवगड किल्ल्याखाली पांढऱ्याचे घोडदळ व पायदळ होते. त्याचे पुढे मेणवली गावाजवळ बोंदरे हे होते. कृष्णा नदीच्या दक्षिणेस वायव्य कोपऱ्यात काटे व भोसले, त्याच्या पश्चिमेस जगताप व घोरपडे हे होते. अंबरखान, मुसेखान, हसमखान हे वाईच्या उत्तरेला आपला तोफखाना घेऊन वसलेले होते. घोरपडे वाई शहराच्या पश्चिमेस आपला तळ देऊन होता. झुंझारराव घाटगे कृष्णेचे काठावर पश्चिमेस बसला होता. याचा अर्थ वाई शहराच्या सर्व दिशांना या सैन्याचा तळ पडला होता.

खान विजापूरहून निघाला तो तोरव्यावरून पंढरपूरला आला. नंतर म्हसवड, शिंगणापूरमधून त्याने आपला तळ दहीवडीस दिला आणि माहुली-वरून तो वाईला आला. फतनजीच्या या पोवाड्यात तुळजापूरची भवानी अगर पंढरपूरचा विठोबा यांस जात्यात घालून दळल्याचे नाही. सभासदी बखरीत तुळजापूरच्या भवानीला फोडल्याबरोबर आकाशवाणी झाली व पंढरपूरचा विठोबा त्याने जात्यात घालून दळला असे लिहिले आहे. खानाने आपल्या बिव्या ठार केल्या, त्याचा हत्ती आंधळा झाला, त्याचे निशाण मोडून पडले व गुरुने अपयश येईल असे सांगितले असे त्या काळचे युरोपियन प्रवासी अबेकॅरे लिहितात. पण त्या सर्व अफवाच वाटतात.

खानाने वाईस आल्यावर अनेक लोकांना अनेक वचने दिली. चिंचवडचे संत मोरया गोसावी यांना देणगीदाखल चौलवर अनेक दस्तबाबपैकी देकार देण्याचे पत्र २७ जून १६४९ चे आहे. अशा रीतीने हिंदु संत, देवालये व मठ यांना तो धर्मादाय देत होता. त्याने कितीतरी हिंदू लोकांचे पूर्वापारचे हुकूम त्यांना दिल्याची फर्माने दिलेली आहेत.

मलवडीचा जहागीरदार नाईकजी पांढरे हा होता. त्याने खानाची भेट घेऊन व पत्र लिहून मराठ्यांची मने बिघडवू नका असे खानाला बजाविले. शिवाजी महाराजांची आजी जगपाळराव निंबाळकर यांची बहिण होती. शिवाजीची मुलगी सखूबाई ही निंबाळकरांची सून होती. आणि निंबाळकर घराण्याचे सोयरे सर्व मावळ प्रांतात पसरले असल्याने तोफ गळ्यात अडकवून त्याची सुनता करून त्याला हत्तीच्या पायी देण्याची भाषा खान साहेबांनी बोलू नये असे नाईकजी पांढऱ्याने खानाला बजावले व म्हणूनच ६०,००० होन देऊन बजाजीची सुटका झाली. उतरोळीचे केदारजी व खंडोजी खोपडे ५,००० मावळ्यांच्या जमावासह खानाला मिळाले. यावेळी केदारजी व खंडूजी खोपडे यांचे भांडण होते. खंडोजीबद्दल केदारजीला ताकीद देऊन केदारजीला खानाने मौजे मेटिये या गावची सनद कूलबाब कूलकानू करून दिली. ( पत्रसार संग्रह २६२९–२६४१ ) केदारजीला शिवाजीच्या सैन्याची लूट केल्यास ती बक्षीसी म्हणून दिली जाईल असे सांगितले आहे. खोपड्यांना अशा रीतीने कळविल्यामुळे वतनाच्या आशेने अनेक मराठें खानाला येऊन मिळत होते. गुंजन मावळचा देशमुख विठोजी सिलीमकर अशा तऱ्हेने खानाने वळविला. त्याचा भाऊ बाळाजी सिलीमकर हा शिवाजी महाराजांकडे होता. अशी उदाहरणे आणखीही होती. भोसले बंधू एक खानाकडे तर एक शिवाजीकडे होता. म्हसवडकर, राणोजी माने, भिलवडीचे नाईकजी पांढरे, रविराव झोणे, जाधवराव, दौलताबादकर, धुलाजी रोडगे, देवजी धायगुडे, तानाजी राजे, कोकरे, हे सर्व खानाला मिळाले होते.

खानाचा वाईला तळ पडल्यावर एकूण ४०,००० फौज त्याच्याभोवती जमली व त्यात दिवसेंदिवस भर पडत होती.

अशा रीतीने अनेक मराठे घराण्यातील सख्खे व चुलत भाऊ खान व शिवाजीकडे मिळालेले होते. खान निश्चित विजयी होणार व शिवाजीचा काटा समूळ काढून टाकणार अशा अफवा उठवून शिवाजीच्या सैन्यात घबराट निर्माण करण्याचे खानाचे तंत्र चालू होते. वतनाची आशा, स्वार्थ व स्वतःचा बडेजाव वाढविणारे लोक सत्तेपुढे शहाणपण नाही असे म्हणत;

म्हणत शिवाजीला कसपटाप्रमाणे लेखीत होते. शिवाजीशी मूलतः शत्रुत्त्व संपादून राहिलेले लोक शिवाजीच्या विरुद्ध गेले यात नवल नाही. परंतु इनाम, सन्मान, हक्कदाऱ्या, जहागिऱ्या व मोठमोठे हुद्दे या आशेने खानाला मिळालेले सर्वच मराठे शिवाजीचे शत्रू होते असे म्हणवत नाही. त्याचा फायदा शिवाजीला झाला असला पाहिजे.

शिवाजी महाराज व शहाजीराजे यांचे कट्टे शत्रू खानाबरोबर प्रतापगडाच्या युद्धासाठी आले होते. त्यात शहाजीराजांचे जिवाभावाचे मित्र होते. कट्टे शत्रूही होते. हे खान जाणून होता. म्हणून खानाने आघाडीवर संशयित लढवैय्यांना आणले नव्हते. त्यांना वाईलाच मुख्य तळावर ठेवून खान पारला आला होता. त्या शत्रू-मित्रांचा परिचय पुढील एका प्रकरणात दिलेला वाचकांस मोठा मनोरंजकच वाटेल.

♣ ♣ ♣

# ६ मराठी सैन्याची तयारी

खानाचे प्रचंड सैन्य हा एक आगतिकेतून निर्माण झालेला मेळावा होता. वतन जतन करण्यासाठी व अधिकारांची आशा धरणारे सर्व लोक शिवाजी आणि आदिलशहा यांच्या झगडयात पुढे काय होणार याची कल्पनाही करीत नव्हते. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारा शिवाजी युक्ति, बुद्धी, साहस याने श्रेष्ठ आहे हे पुरेपूर कळलेले असूनही ते जुन्या सत्तेला चिकटून राहिलेले होते. शिवाजी भीम पराक्रमी आहे, तो विजयी होणार याची ज्यांना ज्यांना खात्री होती ते सर्व शिवाजीकडे आले. त्यात कान्होजी जेधे हा सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी होय. त्याला ६ जुलै १६३७ या तारखेला महंमद आदिलशहाने फर्मान पाठविले होते. त्यात हे "फर्मान पोहचताच किल्ला रोहिडा घेणे व हरामखोरांना दफे करणे" असा हुकूम दिलेला आहे. याच पत्रात आदिलशहाने "कान्होजी याने सद्हेतू व निष्ठा यायोगे प्राणार्पण करण्याचे कष्ट तो करीत आहे. त्याने निमकहलाली व चाकरी करावी म्हणजे इनामाचे व उत्कर्षाचे हुकूम होतील" असे लिहिले आहे. (प. सा. सं २४५५). याचवेळी अल्ली आदिलशहा लिहितो, "मेहनत करावयाची कोताई न केली, दृष्टांधान केले. याकरता बहूत कृपा करून मौजे चिखलगाव हा इनाम दिला." हे पत्र १५ ऑक्टोबर १६४३ चे आहे. १६४० च्या जून २२ तारखेला जेध्यांना वेन्हवडी या गावचे मालकीची ६ टाक जिराइत जमीन बक्षीस दिलेली आहे. एकूण कान्होजी जेध्याला सांभाळण्यासाठी आदिलशहा अतिशय खटपट करीत होता असे दिसते. याबाबतची आणखी काही पत्रे वाचण्यासारखी आहेत. ३ ऑगस्ट १६४४ रोजी त्याने कान्होजी जेध्याला, "दादोजी कोंडदेव यांना पकडण्यासाठी खंडोजी व बाजी घोरपडे यांस तुमच्यासह नेमले आहे" असे लिहिले आहे. इतके करूनही कान्होजीने शिवाजीची बाजू सोडली नाही. २ सप्टेंबर १६६० रोजी शिवाजी राजाने कान्होजीला पत्र लिहिले आहे, "तुमचा आजार कळला औषध घेऊन आरोग्य होई ते करणे. पहिलेचपासून तुम्हा आम्हास घरोबा आहे." या पत्रावरून शिवाजी व कान्होजी यांचे किती घनिष्ट संबंध होते हे दिसून येते. यावेळी तर तुम्ही

आपला कबिला ढमढेरे यांचे तळेगावास ठेवून आम्हास येऊन मिळावे. असे स्पष्टपणे कळविले आहे. त्याप्रमाणे कान्होजी शिवाजीला येऊन मिळाला.

मुधोळचे बाजी घोरपडे हे तर मूळचे भोसले. शिवाजीच्या घरातील दाहीज. परंतु वतनाच्या भानगडीत शहाजी व त्यांचेमध्ये अतिशय भांडणे चालू होती आणि ते भांडण अनेक वर्षे चालू होते. याबाबतीतला शहाजी व अल्ली आदिलशहा यांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. शहाजीला कर्नाटकात पकडण्यात बाजी घोरपडे व अफझुलखान हे प्रमुख होते. म्हणूनच आकसाने यावेळी बाजी महाराजांवर आलेला होता. झुंझारराव सर्जेराव घाटगे हा मलवडीचा सरदार शहाजी राजांचा जिवलग दोस्त होता. पार येथील सैन्याच्या आघाडीवर त्याला खानाने ठेवलेला होता. असे कित्येक सरदार शिवाजी महाराजांच्या व शहाजी राजांच्या बाजूस असलेले मुद्दामच आलेले होते.

शिवाजी महाराजांच्या बाजूला असलेले लोक शिवाजीचे उजवे हात नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे हे होत. कडेसरच्या पठारावर नेताजी पालकर आपले घोडदळ घेऊन तयार होता. तर किनेश्वराच्या खोऱ्यात मोरोपंत पिंगळे व पद्मनाभी हे आपले पायदळ घेऊन होते. कान्होजी जेधे, बाळाजी सिलीमकर, बाबाजी भोसले वगैरे मंडळी शिवाजी महाराजांकडे होती. त्या मानाने शिवाजी महाराजांकडे थोडेच लोक असले तरी त्यांची निष्ठा आपल्या वतनावर पाणी सोडून शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभी रहाण्याची होती. महाराजांकडून कोणत्याही तऱ्हेचा फायदा होणार नाही उलट खानाने लढाई जिकली तर आपण सर्वस्वाला मुकू ही कल्पना त्यांना होती. तरीही ते सर्व लोक शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभे राहिले होते आणि म्हणूनच संख्याबळाने कमी, परंतु मनीच्या पिळाने, निष्ठेने आणि देशभक्तीने प्रखर असे होते. महाराजांच्या घोडदळात १० घोडेस्वारांवर एक हवालदार, अशा ५ हवालदारांवर १ जुमलेदार व १० जुमलेदारांवर १ हजारी, असे पाच हजाऱ्यांवर १ पंच हजारी व सर्व घोडदळावर एक सरनोबत असे. महाराजांच्या सैन्यात कडक शिस्त असे. तर मुसलमानी सैन्य बेशिस्त होते. खानाच्या सैन्यात जे मावळे जमले

होते, त्यात इतरेजनांचा फार मोठा भरणा होता. खानाने आपल्या सैन्याबरोबरच ३ वर्ष पुरेल इतका रसदेचा बंदोबस्त करून ठेवला होता. महाराजांचे हेर खाते चलाख होते. तसे खानाचे नव्हते. अनेक बाबतीत खान चुकत होता. शिगणापूर येथे त्याने देवांना भ्रष्ट करण्याचा प्रकार केला. खान वाईला आल्यावर त्याने महाबळेश्वरपर्यंत प्रतापगडाकडे तोंड करून आपली फौज पसरून ठेवली होती. खान वाई येथे कृष्णेपलीकडे रहात्या वाड्यात रहात होता. हा वाडा वाई गावच्या दक्षिणेस होता. तो वाडा तिन्ही बाजूने पाण्याने वेढलेला होता. श्रीसमर्थरामदास यांच्या मठाधिपतीकडून व त्यांच्या हजारो शिष्यांकडून महाराजांना सारख्या बातम्या मिळत होत्या. महाराजांचे युद्ध मंडळ खालील प्रमाणे होते. (१) नारोपंत हणमंते (२) शामराजपंत (३) सोनाजीपंत डबीर (४) निळोपंत मजुमदार (५) मोरोपंत पिंगळे (६) नेताजी सरनौबत पालकर (७) रघुनाथपंत सबनीस (८) गोमाजी पानसंबळ (९) गंगा मंगाजी वाकनीस (१०) अण्णाजीपंत (११) सुभानजी नाईक (१२) कृष्णाजी पानसंबळ (१३) जिवाजी देवकान्ते (१४) माणकोजी दहातोंडे (१५) सुभानजी इंगळे (१६) सेनापती (१७) उपाध्ये (१८) नारायण ब्राह्मण.

दोन दिवस या युद्ध मंडळाने वाटाघाटी केल्या आणि चढाईचे धोरण न ठेवता बचावाची लढाई करावी लागली तर गनिमीकाव्याने लढावे असे सर्वानुमते ठरले. याला जबरदस्त कारण असे होते की, वाडीचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे, दाभोळचे दळवी व जंजीऱ्याचा सिद्धी हे कोकणातील सत्ताधारी महाराजांच्या विरुद्ध होते. मोगल दूर होता. तरी तो विजापूरकरांना मिळण्याची शक्यता होती. या सर्व शत्रूंना अडवून धरण्याकरता सह्याद्रीतील सारे घाट, किल्ले व मोक्याची ठिकाणे यांचा बंदोबस्त महाराजांनी केला होता. सिद्दीचा मार्ग तळे–घोसाळेवरून खुष्कीचा होता आणि कदाचित सावित्री नदीमार्गे सिद्दी महाडपर्यंत केव्हा येईल याचा भरवसा नव्हता. म्हणून महाराजांनी सुर्वे व दळवी यांच्याशी तात्पुरता तह केला. पारघाटात मोरोपंत पिंगळयांना ठेवण्यात हाच एक हेतू महाराजांनी ठेवला होता.

ढवळा घाट, मढचा घाट, करंजे, कडेसरी घाट, या घाटातून जावळी जवळ पडते व ताम्हणा घाट व पारघाट हे पारगावाला जवळ पडतात. म्हणूनच महाराजांनी नेताजी व मोरोपंत यांना त्या बाजूला ठेवले होते. महाबळेश्वराखाली जेधे, बांदल व मालुसरे भोसले हे होते. ७०० पठाणांची एक तुकडी १०,००० घोडदळ, १०–१२ हजार पायदळ, काही लहान तोफा मराठ्यांजवळ होत्या. तोफांच्या बाबतीत खानाचे सैन्य वरचढ होते. खानाच्या अवघड तोफा व पठाणी सैन्याचा डोंगरी मुलखात काही उपयोग होण्यासारखा नव्हता.

खान वाईला आल्यावर मी शरणागती पत्करीत असल्याची अनेक पत्रे महाराजांनी खानाला लिहिली. मी माझे सर्व काही बादशहाच्या हाती देण्यास तयार आहे, असे वारंवार लिहिले. या पत्रावरून खानाने कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या वाईच्या कुलकर्ण्याला आपला वकील म्हणून महाराजांकडे पाठविले. त्यांच्या विचार विनिमयाने खानाची भेट घेण्याचे महाराजांनी ठरविले. सुर्वे व दळवी ह्यांनी शिवाजीशी तह केला हे ऐकून खान सर्दच झाला. त्याचा आधार जंजीऱ्याचा सिद्दी हा एकाकी राहिला. परंतु तो मोगलांचा ताबेदार होता. शिवाजीने त्याचे सर्व मार्ग रोखले होते. त्याच्या मार्गातील घाट अतिशय बिकट होते. शिवाजीच्या चौक्या महाड, बिरवाडी व साखर खोऱ्यात ठाम बसलेल्या होत्या. नेताजीबरोबर त्या मुलुखातील माहीतगार रघुनाथ बल्लाळ कोरडे यांना शिवाजीने दिले होते. त्रिबक भास्कर, मोरोपंत पिंगळे व शामराजपंत, कोपीच्या टोकाखाली, कुमठे, पार, शिबाचे टोक अडवून बसले होते. अशा रीतीने कोणीही शत्रूला कोकणातून घाटावर येण्याकरिता निर्वेध असा मार्ग राहिला नव्हता. शिवाय पार गावाच्या पश्चिमेस चंद्रगड व जावळी यामध्ये व बोचेघोळीत शिवाजीचे लोक दबा धरून बसले होते. प्रतापगडाला अशा रीतीने मराठे सैन्याचा वेढा ठेऊन महाराज डोळ्यात तेल घालून सर्व परिस्थितीकडे काळजीपूर्वक पहात होते.

♣ ♣ ♣

# ७ अफझलखान पारचे खोरे उतरला

खानाने शिवाजीच्या शरणागतीच्या लाघवी पत्रव्यवहाराने आपला वकील कृष्णाजी भास्कर प्रतापगडावर राजाकडे प्रथम पाठविला. यात मोठा अर्थ आहे. खानाला कोठून तरी शिवाजीला प्रत्यक्ष गाठावयाचा होता व अशा भेटीत कपट बुद्धीने त्याला ठार करावयाचा होता. हे निश्चितच त्याला माहित होते की आपल्या मोठ्या तोफा पार खोऱ्यात नेण्याकरता कोयना नदीला फारच थोडे उतार होते. सभोवार उच डोंगर उतराच्या दरडी यातून कोयना तेथे वाहात आहे. अपाटयाच्या उतारामुळे पाण्याला ओढ फार मोठी आहे. त्याचा सर्वभार मावळी सैन्यावर होता, त्याची संख्याही फार मोठी होती. परंतु त्याच्यावर सर्वस्वी भरवसा टाकून चालण्यासारखे नाही हे तो जाणून होता. गडाच्या सर्व बाजू उंच उंच आकाशाला भिडलेल्या पक्क्या कातळ कड्याच्या होत्या. गडावरही जबरदस्त बंदोबस्त होता. या उत्तुंग पर्वतामुळे गडावर लगट करणे शक्यच नव्हते ही सर्व परिस्थिती पाहून कोणत्याही परिस्थितीत खान आपल्या बाहुबळावर व चातुर्यावर विश्वास ठेवून शिवाजीला भेटावयास पहात होता.

खानाचा हेजीब हा खानाचा खाजगी कारभारीही होता. अत्यंत विश्वासातील म्हणून अनेक दिवसाचा भरवसा वकिलावर होता. तो एक जुना नोकर व धन्याशी इमान राखणारा असा खानाने शोधला होता. बहाल मर्जीचा हा कृष्णाजी भास्कर आपल्याकडे भेटीला येत आहे हे कळल्यावर महाराजांनी त्याची उत्तम बडदास्त ठेवली. महाराजांनी पाठविलेल्या पालखीतून तो गडावर येऊन उतरला. रात्री अचानक महाराज त्याच्या उतरण्याच्या ठिकाणी गेले. त्याच्या मनाचा ठाव घेण्याकरता महाराजांनी धार्मिक गोष्टीबरोबर मुसलमानांच्याकडून धर्माचा व प्रजेच्या होणाऱ्या छळाबद्दल अनेक रितीने विचार विनिमय केला. त्यात कृष्णाजी भास्करचे मन मुसलमानांचा धर्मछळ व प्रजेचे हाल याबद्दल द्रवून गेलेले दिसले.

वा. क. ५४६ दिनांक ......
विषय ५१ किशोर क्र. ४९३.

व भेट घेण्याचा आपला विचार मनोमन कायम केला. शिवाजीचा वकील प्रतापगडावर आल्यावर व एक दोन वेळा खानाचा वकील व शिवाजी महाराजांचा वकील यांनी वाई प्रतापगड व प्रतापगड वाई अशा खेपा मारल्या-वर खानाने आपले सैन्य प्रतापगडाखाली जावळी व पार या गावी नेण्याचे ठरविले. शिवाजी आपणहून इतमानाने व सर्व व्यवस्था करून आपले लक्ष असलेल्या किल्ल्यासमोर ससैन्य येण्याची विनंती करतो, ही आपल्या दृष्टीने चांगलीच गोष्ट आहे, असे खानाच्या मनाने घेतले. गडाच्या खाली गडाच्या आग्नेय कोपऱ्यात ते सैन्य कोयनेच्या दक्षिण तीरावर उतरविण्याची व्यवस्था तळ साफ करून बाजारहाट वसवून कोणतीही उणीव पडणार नाही अशी व्यवस्था शिवाजीने केली. महाबळेश्वराच्या पठारावरून रड-तोंडीच्या घाटाने खानाचे सैन्य यावे असे ठरल्याने तो घाट साफ करण्यात आला. ठिकठिकाणी पाणपोया, वाणी, उदीम, दुकाने असा बाजार बसवि-ण्यात आला. बकऱ्याच्या मांसाबरोबर बैलाच्या मांसाची दुकाने कसायाकडून शिवाजी महाराजांनी घालविली होती. (शि. दि. ६४) आपल्या इतमाना-इतका सरंजाम भेटीच्या वेळी खानाने आणावा व तो सर्व कोयनेकाठी रहावा असे ठरले होते. एक शरीररक्षक व दोन हुद्देदार खानाने भेटीच्या जागी आणावे, इतकेच लोक महाराजांनी आणावेत असा ठराव खान व वकीलद्वय यांच्यात ठरला होता. खान आपल्या बरोबरीच्या सैनिकांपैकी निवडक १०–१२ हजार फौज घेऊन कोयनेच्या काठी यावयास निघाला. रडतोंडीच्या घाटाचे चढ तोडून व उतारावर भर टाकून जंगल साफ ठेवले होते. त्या घाटातही खाद्यपेय मिळण्याची सोय केलेली होती.

खानाचे सैन्य वाईहून निघाले ते पसरणी, कासेगाव, चिखली, गुरेघर या गावावरून डोंगराचा चढ चढत महाबळेश्वराच्या पठारावर आले. मेटल्याच्या डोंगराच्या उत्तर बाजूने ते घाटाच्या उतारावर लागले आणि शेवटी पार गावाच्या पूर्वेस कुमठ्याचा ओढा व कोयना नदी यांच्या संगमावर दोन्ही तीरांवर येऊन पसरले. या सैन्याच्या पूर्वेस मेटल्याचा उंच डोंगर व त्या पलीकडे महाबळेश्वरचे उंच पठार, दक्षिणेस बिरमणीचा डोंगर आणि पश्चिमेस कुमठ्याचे डोंगर होते. ती जागा फार अडचणीची

खऱ्या परिस्थितिवर आधारित अशी अनेक प्रकरणे त्याने वकिलासमोर मांडली आणि शंभू महादेवाच्या व आई जगदंबेच्या वरप्रदानाने मी हे स्वराज्य स्थापन करण्याची इच्छा धरून आहे. म्हणून या कामी या वेळी ब्राह्मण म्हणून मला मदत करावी अशी विनंती मोठ्या आर्जवी भाषेने महाराजांनी वकिलाला केली. दुसऱ्या दिवशी वकिलाने खानाचा अंतस्थ हेतू तुम्हाला पकडून अगर ठार करून जिवंत अगर मेलेल्या परिस्थितीत विजापूरच्या दरबारात नेऊन सुपूर्द करण्याचा आहे असे सांगितले व आपण त्याप्रमाणे वागावे अशीही सूचना कृष्णाजी भास्कराने महाराजांना दिली. "आम्ही खानाची भेट घेण्यास तयार आहोत, विजापूरकरांचा मुलूख सोडून देऊन मी दरबारला शरण जाणार आहे" असे शिवाजीने प्रकट सभेत सांगितले. पुन्हा झालेल्या एका भेटीत वकिलाने "तुमच्या या सत्कार्यात ईश्वर तुम्हाला सहाय्य करो. मी तुम्हाला अंतस्थ असे सर्व प्रकारे साह्य करीन" असे वचन देऊन वकील खानाकडे परतला.

पंताजी गोपीनाथ बोकील हा महाराजांचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी वकिलावरोबरच वाईला खानाच्या गोटात गेला. हा पंताजीकाका गोड मिठ्ठास बोलण्यात पट्टीचा मुरब्बी होता. आपल्या लाघवी वाणीने व विचारसरणीने त्याने खानाच्या मनाला शिवाजी खरोखरच शरण येणार आहे असे पुरेपूर पटविले. खानाला त्याच्या भाषणात लपंडाव असा काहीच वाटला नाही. "आमचे वडिल शहाजी राजे त्यांच्या जागीच तुम्ही मला आहात" वगैरे भाषणावर खान बेहद्द खूष झाला. शिवाजी आपल्या अवाढव्य सैन्य तयारीला, मुत्सद्देगिरीच्या डावपेचांना पूर्णपणे भिऊन गेला आहे असे खानाला वाटले. खानाच्या मनाने आपला विजय आता आपल्याच हातातले खेळणे आहे असे पूर्णपणे घेतले आणि खान थोडा गैरसावध व गाफील राहिला.

खानाचा वकील आणि महाराजांचा वकील यांचेजवळ एकएकटा आणि पृथक पृथक अशी बोलणी खानाने केली व शिवाजी शरण येतो ही गोष्ट खरी असल्याची खात्री त्याच्या मनाला झाली. आपला वकील आपल्या जवळ खरे तेच बोलेल ही खानाची खात्री झाल्यामुळे त्याने सल्ला करण्याचा

होती. खानाकडील मावळे सैन्यास अशा प्रदेशाची संवय होती. परंतु विजापूरच्या मैदानी सैन्याला हे सर्व मृत्यूचा जबडाच वाटे व ते या एकंदर प्रदेशाच्या स्वरूपाकडे पाहून भयचकितच होत. खानाने निवडक १०-१२ हजार सैन्य व बेतावेताचा तोफखाना बरोबर घेतला व बाकीचे सर्व सैन्य वाईच्या तळावरच ठेवले.

मेटल्याच्या डोंगराखाली कोयनानदी पूर्ववाहिनी होते तेथपर्यंत पेठपारच्या डोंगराखाली झुंझारराव घाटगे व अफझुलखानांचा मुलगा फाजलखान, कुमठ्याच्या ओहोळाच्या उत्तरेला कोयनेच्या पूर्व बाजूला तळ देऊन वसले होते. कुमठ्याच्या ओढ्यापलिकडे दक्षिणेस कोलदूर्ग नावाचा एक किल्ला आहे. त्याच्या पायथ्याला जगदाळ्याचे घोडदळ व पायदळ होते. पूर्वेस कोयना नदीपलिकडे तोफखाना, फाजलखान व खंडोजी घोरपडे व घाटगे यांचे सैन्य होते. या सैन्याच्या पलिकडे उत्तरेस मुसेखान व अंबरखान हे घोडदळासह होते. पार मुऱ्याचा डोंगर व पलिकडे गौप्याचा डोंगर व त्याच्या पलिकडे सोनपारचे टेप व त्यापलिकडे उंच जागी गड अशी प्रादेशिक व्यवस्था होती. महाराजांचे घोडदळ वरून खाली आले तर अंबरखान व मुसेखान यांना त्यांना रोखता यावे असा खानाचा हेतू असावा. कारण मुसेखानाजवळ तोफखाना होता.

भेटीच्या मंडपाची जागा खानाचे प्रमुख सरदार व वकील यांना दाखविण्यात आली. त्यांची अनुमती मिळाल्यावर भेटीच्या जागेवर येण्याची एकच एक वाट नीट ठेवून बाकी सर्व वाटा महाराजांनी बंद करून टाकल्या. खानाच्या फौजेसभोवार व अगदी गडाच्या दरवाज्यापर्यंत टेहळणी करणारे असंख्य गुप्तहेर महाराजांनी ठेवले. सर्व सह्याद्रीभर गडासभोवार सर्व ठिकाणी गुप्तहेर ठेवले होते. बातम्या वारंवार व जलद मिळविण्याची सर्व व्यवस्था महाराजांनी स्वतः पाहून मगच सर्वांना चोख कामगिरी करण्याची ताकीद व सल्ला देत देत गडाचा सर्व परिसर महाराजांनी पाहिला होता.

भेटीला आल्यावर खानाने दगा केला तर करावयाच्या तरतुदी महाराजांनी केल्या. मातोश्री जिजाबाई ह्यावेळी राजगडावर होत्या. त्यांच्या

अधिपत्याखाली सर्व काही चालले होते. कर्नाटकातील शिऱ्याचा राजा कस्तूरीरंग ह्याला भेटीत खानाने ठार केले होते. हे महाराजांना माहिती होते. खान सर्व कबूल करून आपल्या कह्यात येत आहे, याचे कारण त्याला आपल्या ताकतीचा भलताच गर्व आहे हे महाराजांनी जाणले होते. म्हणूनच भेटीची वेळ व तिथी निश्चित करताना सर्व काही विचारपूर्वक महाराजांनी केलेले होते.

पार येथे छावणी देऊन ३ दिवस खान बसला होता. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी शके १५८१ तारीख १० नोव्हेंबर १६५९ रोजी भेट घेण्याची तिथी महाराजांनी विचारपूर्वक ठरविली होती. त्या दिवशी गुरुवार होता. तिसऱ्या प्रहरात भेट व्हावी असे ठरले होते. यातही महाराजांचा धूर्तपणा व मुत्सद्देगिरी स्पष्ट दिसून येते. वद्य सप्तमीला गुरुवार असल्यामुळे हिंदू व मुस्लीम ह्या दोघांनाही तो वार उपवासाचा होता. तिसऱ्या प्रहरानंतर वद्य पक्षामुळे पडणाऱ्या काळोखाचा फायदा मराठी सैन्याला मिळणार होता. भेटीच्या जागेवर काय घडले अगर घडत आहे याची शासावार्ता खानाच्या सैन्याला मिळू नये असा बंदोबस्त व कोणीही माणूस वरून खाली व खालून वर न जाऊ देण्याचा कटाक्ष महाराजांनी पाळला होता. त्यामुळे भेटीच्या जागेवर असणाऱ्या लोकांनाच सत्य परिस्थिती कळत होती. खानाचे पार व जावळी येथील सैन्य स्वस्थ होते. तर कडेसर येथील नेताजी पालकर आणि पाराघाटामधेही मोरोपंत पिंगळे इशारा मिळताच हल्ला करण्याच्या तयारीत होते. जावळी ते पार खानाचे सैन्य एकमेकाला मिळू नये म्हणून कान्होजी जेधे, बाबाजी भोसले आणि बाजी देशपांडे, बोचेघळीचा मार्ग बंद करण्याकरता त्या खिंडीत दबा धरून बसले होते. भेटीच्या जागेच्या पश्चिमेस भेटीच्या तंबूचा दरवाजा दिसेल अशा जागी हिरोजी फर्जंद व तानाजी मालुसरे कडे–कपारात दबा धरून बसले होते.

अंगात जिऱ्याचे कुडते म्हणजे अगदी बारीक लोखंडी तारांचे विणलेले जाकीट, त्यावर झगा, डोक्यावर पागोट्याच्या खाली जिरेटोप त्यावर मंदील, कमरपट्ट्यात न दिसेल असा बिचवा व डाव्या हाताच्या बोटांत

आतून वाकलेली वाघनखे महाराजांनी घातली होती. हातात पट्टा व समशेरही होती हे संभवनीय नाही. समशेर जिऊ महाला याचे जवळ, तर पट्टा संभाजी कावजी जवळ दिलेला होता व त्यांना इशारा मिळताच तो त्यांच्याकडून मिळावा असे ठरलेले असावे. तानाजी मालुसरे सर्व प्रथम निघताना खास वारदार म्हणजे शरीररक्षक म्हणून महाराजांचे बरोबर होता. जिऊ महाला व संभाजी कावजी ही दोनच माणसे शिवाजीबरोबर होती असे अनेक बखरकर म्हणतात. कॅप्टन मोडकांच्या प्रतापगडाचे युद्ध ह्या पुस्तकात पान १७८ वर तानाजीचे नाव आहे. सभासदांच्या बखरीत १७ वर तानाजीचे नाव नसून जिऊ महाला व संभाजी कावजी अशी दोनच नावे आहेत.

खान आपला शरीररक्षक सय्यद बंडा व पालखीचे ११ भोयी यांसह आला होता. दोघे हुद्देकरी खानाबरोबर होते असे काही ठिकाणी लिहिले आहे. पण ते खरे वाटत नाही. खानाची पालखी तंबूजवळ आल्यावर तो शामीयान्यात शिरला आणि इकडे तिकडे पाहून त्याने आश्चर्योद्गारे काढले. भेटीची जागा आणि शामीयानाच्या आत कंबरभर उंचीची चौकोनी असावी. हिरे, माणिक मोती यांच्या झालरी तंबूत लावलेल्या होत्या. बादशहालाही लाजवील असा थाट शहाजीचा मुलगा शिवाजी याने केला आहे असे उद्गार खानाच्या तोंडून निघाले. खानाचा वकील व महाराजांचा वकील शामीयान्यात होते. या शामीयान्याची शोभा पहात सय्यद बंडा शामीयान्यात आहे असे कळल्यावर प्रतापगडाच्या दरवाज्यातून निघालेली महाराजांची पालखी अब्दुल बुरुजाच्या थोडी पुढे उभी राहिली व सय्यदबंडाला ठरावाप्रमाणे लांब उभे करण्याची विनंती खानाला करण्यात आली. सय्यदबंडा हा खानाचा पुतण्या होता असे सभासद लिहितो (पान १७) दोन हुद्देकरी होते असेही सभासद लिहितो. ही सर्व मंडळी महाराजांच्या विनंतीप्रमाणे थोड्याच वेळात लांब जाऊन उभी राहिली. दोन वकील, खान आणि शिवाजी असे चौघे या शामीयान्यात राहिले. तानाजी भेटीच्या जागेपासून जवळच शामीयान्याचा दरवाजा दिसेल अशा ठिकाणी बसलेला असावा व तो खानाने " दगा दगा " असे ओरडल्यावर आपल्या लपण्याच्या

जागेतून तंबूकडे धावत गेला असावा. सय्यदबंडाच्या मागे संभाजी कावजी उभा होता. घोडा सहज उचली आणि मोठी पहार लिलेने हाताने वाकवून दुसऱ्याच्या गळयात अडकवी अशा अचाट शक्तीचा हा होता. जिऊ महाला हा साधारण ऊंचीचा पण तलवार बहाद्दर होता. भेटीची जागा हातघाईच्या लढाईला जास्त योग्य होती. आपल्याबरोबर बंदूकवाले व तलवारवाले मिळून १५०० शिपाई त्याने घेतले होते. हे शिपाई बरोबर घेतलेले पाहून पंताजीने जनीच्या टेपाजवळ आल्यावर खानास सांगितले की ठरलेल्या अटीप्रमाणे फक्त दोन हुद्देकरी व खास बारदार ह्या शिवाय जास्त लोक बरोबर नेले तर महाराज भेटीला येणार नाहीत. पंताजी गोपिनाथाच्या ह्या तक्रारीला खानाचा वकील कृष्णाजीपंत ह्यानेही संमती दिली व खानाने त्या लोकांना जनीच्या टेपाच्या पायथ्याशी ठेवले. सय्यदबंडा हा नावाजलेला शक्तिशाली पुरुष होता. त्याला मर्दाना असे म्हणत. तो पंचहत्यारी होता व सराईत लढवय्याही होता. शिवाजीला आपण सहज पकडू अशा खुपीत खान असल्याने त्याने ह्या १५०० लोकांना जनीच्या टेपापाशी ठेवले. त्याची दहा-बारा हजार फौज कोयनाकाठी होती. शिवाजीला ठार मारल्यावर अगर पकडल्यावर आपल्या फौजेला बातमी कळून ताबडतोब गडावर हल्ला करण्यासाठी हे लोज खानाने बरोबर घेतले होते. खान मांडवात येऊन दाखल झाला. शिवाजीची पालखी दूर उभी राहिल्यावर पंताजी पुढे आला व शिवाजीशी काही बोलणी करून तंबूत येऊन त्याने खानाला सांगितले की सय्यद बंडा खास बारदार यांना दूर करावे. खानाने शिवाजीचेही कोणी असता कामा नये असे सांगितल्यावर दोन वकील, खान व शिवाजी एवढीच मंडळी मंडपात राहिली होती. खान धिप्पाड होता तर शिवाजी बुटका होता. शिवाजी आत आल्याबरोबर खान उभा राहिला व समोर आला. " शिवाजीराजे हेच काय " असे त्याने पंताजीस विचारले. पंताजीने होय असे म्हटल्यावर महाराजांनी कृष्णाजीपंतास विचारले " खान हेच काय " त्याने होय असे उत्तर दिले. (शि. दि. १६८) त्यावेळच्या शिरस्त्याप्रमाणे छाती छाती मिळवून भेट घेण्याची होती. खानाने हात पसरले व महाराजांस आपल्या छातीशी

भिडविले. दोघांचे हात एकमेकांच्या पाठीवर भिडले गेले. त्याने महाराजांस जखमी किंवा ठार करावे व ताबडतोब कोयनापारच्या आपल्या फौजेत मिळून जावे असा विचार केलेला होता. झटकन् महाराजांचे मस्तक आपल्या डाव्या बगलेत घालून ते खानाने दाबून धरले, उजव्या हाताने कमरेच्या डाव्या बाजूस असलेली समशेर म्यानातून बाहेर काढून महाराजांच्या डाव्या कुशीत खोचण्याचा प्रयत्न केला. चिलखतामुळे महाराजांच्या शरीराला इजा झाली नाही. महाराजांच्या डाव्या हातात वाघनख होते. तो डावा हात खानाच्या उजव्या बाजूस होता. तो काढून घेऊन खानाचे पोटांत वाघनखे खुपसली. खानाने नुसताच झगा घातला होता. कमरेतील विचवा बाहेर काढला. खानाच्या डाव्या कुशीत दोन वार केल्यावर मानेवरील दाब लटका पडला. हे पाहून आपली मान हिसडून घेऊन महाराजांनी भेटीच्या चौथऱ्यावरून खाली उडी टाकली. इतक्यात खानाने आपला कोथळा दाबून धरून त्यावर आपला शेला घट्ट बांधून खान शिवाजीच्या अंगावर धावला व एक-दोन वार शिवाजीचे डोक्यावर आपल्या तलवारीने खानाने केले. चिलखत व शिरस्त्राण ह्यामुळे ते वार फुकट गेले. महाराजांनी जिऊ महालापाशी असलेली आपली तलवार घेतली व दोघांचे द्वंद्वयुद्ध सुरू झाले. खान तलवारीचे वार करीत असताना “ दगा दगा ” असे ओरडत होता. ती हाक ऐकून खानाचा सय्यदबंडा तंबूच्या तोंडाशी धावत आला. बंडा धावत सदरेवर चाललेला पाहून जिऊ महाला व तानाजी धावत तेथे आले. संभाजी कावजी व जिऊ महाला यांनी दुसऱ्या दोघांचा फडशा उडवलेला होता. जिऊ महाला तसाच पुढे धावत येऊन सय्यदबंडा शिवाजीशी दोन हात करीत असताना पाठीमागून येऊन त्याने असा जोराचा फटका सय्यदबंडाच्या खांद्यावर मारला की, त्याचा उजवा हात तुटून पडला. अर्थात खानाचे बाजूचे सर्व लढवय्ये लोक ठार झाले होते. खानाची आरडाओरडा चालूच होती. भयंकर रक्तस्त्रावामुळे तो अर्धमेला झाला होता. इतक्यात पालखीचे भोई पालखी घेऊन खानाजवळ आले त्याने खानाला पालखीत घालून ती पालखी झपाझप चालविली. संभाजी कावजीने हे सर्व पाहिल्यावर तो तीरासारखा धावत आला व मागील भोयाच्या पायांच्या पोटऱ्यावर वार

करून त्यांना त्याने आडवे पाडले व पुढच्या भोयांची अवस्था तीच करून त्याने पालखी खाली पाडली व खानाचे डोके कापून घेऊन आपल्या शेल्यात बांधून घेऊन तो मंडपाकडे धावतच आला. कर्णेवाल्याला कर्णा फुंका अशी आरोळी मारून ते सर्व गडावर निघून गेले. हा सारा प्रकार १५-२० मिनिटातील होता. या वेळपर्यंत संध्याकाळचे पाच वाजले होते. कर्णा ऐकल्याबरोबर गडावरून ठरलेले संकेताचे तोफांचे बार झाले. वर काय चालले आहे याची कल्पना खानाच्या सैन्याला नव्हती. कृष्णाजी भास्कर यास बरोबर घेऊन महाराज प्रतापगडावर आले. कर्ण्याच्या आवाजाने गडावरील तोफांच्या गोलंदाजाना ठराविक संकेताच्या तोफा डागण्याचा इशारा दिला गेला. बाबाजी भोसले, नेताजी पालकर हे जवळ नव्हते. त्यांनी तोफांचे आवाज ऐकल्यावर सत्यपरिस्थिती त्यांना कळली व त्यानी ठरल्याप्रणे आपली सैन्ये सज्ज करून ठेवलेली होती. त्यांच्यासह खानाच्या सैन्याकडे झेप करण्यास सुरुवात केली.

♣ ♣ ♣

# ८ लढाईंची धुमश्चक्री

खानाचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी शिवाजी महाराजांवरोबर प्रतापगडावर गेला. खान वाईचा सुभेदार असताना पूर्वी खानाच्या तो मोठ्या मर्जीतला होता. ज्यावेळी खानाने वाडा बांधला. तेव्हा तो बांधण्याकरता वाईतील विद्वान ब्राह्मणांना वेठीस धरून त्यांच्याकडून सक्तीने वाडा बांधण्याचे काम तो करवून घेत असे. ह्या जाचातून ब्राह्मणांची बाजू खानापुढे मांडून त्यांना कृष्णाजी पंतांनी वाचविले होते असे म्हणतात. वाईचे कुलकर्णी व खानाची खाजगी नोकरीही कृष्णाजीपंत करी. तरीही औरंगजेवाचे सिंहासना रोहण प्रसंगी म्हणजे ५ जून १६५९ रोजी औरंगजेब तक्तावर बसला त्यावेळी शिवाजीचा वकील म्हणून हा कृष्णाजीपंत दिल्लीपर्यंत गेला होता. त्याने औरंगजेबाने दिलेला पोषाख शिवाजी महाराजांना आणून दिला. रामचंद्रपंत अमात्य यांच्या आग्रहावरून सन १७०९ मध्ये पंत यांनी वाडीकर सावंतावर स्वारी केली होती. हा शूर, मुत्सद्दी व सर्वमान्य असा माणूस होता. विशालगड परत घेताना उदीतसिंग किल्लेदाराला वश करून त्यानेच तो किल्ला मराठ्यांना मिळवून दिला. त्याच वेळी ह्या कामाबद्दल रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील कलवस्ते हा गाव याला इनाम मिळाला होता. (तारीख २४–४–१७७२ ची कलहस्ते गावची सनद पत्रे व यादी नंबर ५ )

अफझुलखानाच्या वेळच्या कमगिरीबद्दल शिवाजी महाराजांनी याला इनाम दिलेले होते. याचे नाव पंडीत किंवा सबनीस असेही असलेले दिसते. शिवाजी महाराजांच्या पूर्वीपासून हा मावळचा अधिकारी होता.

अफझुलखान हा आदिलशहाचा दासीपुत्र असावा. तो अब्दुल भटारी म्हणून लोकांना माहित होता. त्याचा डाव आदिलशहाच्या मुदपाकखान्यात देखरेख करणारा अधिकारी होता. वाई येथील काही हुकूमनाम्यात असे

लिहिलेले आढळते. शरीराने धिप्पाड व पहिल्या प्रतीचा हा आदिलशाही सरदार होता. शिऱ्याच्या किल्ल्यावरच्या राजाचा वध याने कपटाने सन १६३८ साली केला होता. (शहाजी चरित्र पान ६४.)

अफझुलखानाचे व शहाजीराजांचे आणि अफझुलखानाबरोबर आलेल्या बाजी घोरपड्याचे एकमेकांशी फार मोठे वितुष्ट होते. बाजी घोरपडे अफझुलखानाला पुढे करून शहाजीचा व त्याच्या मुलाचा नायनाट करू पहात होता. ता. २५ नोव्हेंबर १६३७ चे एकपत्र पत्रसारसंग्रह भाग ३ रा, यातील २४५८ नंबरचे या बाबतीत मोठा प्रकाश टाकणारे आहे. शहाजी राजांनी दरबाराकडे एक तक्रार नोंदविली आहे की मुधोळची जहागीरी वाई व कऱ्हाड परगण्यातील इनाम गावे पैकी निम्मा हिस्सा माझा असताना चोल राजाचा नातू प्रतापराव घोरपडे याने आपणाकडे जबरदस्तीने घेतलेले आहेत. ते माझे ताब्यात द्यावे. यावर दरबारने निकाल दिला की प्रताप. रावाने शहाजी भोसले यास वाई परगण्यापैकी गावे कऱ्हाड पैकी २६ गावे, अर्धा कर्नाटक व ५००० मनसब द्यावी. हा डूक अनेक दिवस मुधोळकरांच्या मनात होता. परंतु शहाजी व त्याचे जमले नव्हते. उलट महंमद आदिलशहाने ११ जानेवारी १६४८ रोजी एक फर्मान काढून महाराजफर्जंद शहाजी भोसले यांच्याशी एकरूप होण्याबद्दल मुधोळकरांना कळविले होते. शहाजी तो कुतुबशहाकडे नोकरीला जाणार हे कळल्यावर व २३–१२–१६४७ रोजी कुतुबशहाकडे नोकरीस ठेवा असा अर्ज शहाजीने केल्याचे पूर्णपणे कळल्यावर २५–७–१६४८ रोजी आदिलशहाने रणदुल्लाखान, घोरपडे, मुस्तफाखान यांनी शहाजीला कैद करावा असा हुकूम सोडला. या तिघांनी एका भल्यापहाटे शहाजीच्या गोटात जाऊन त्याला कैद केले व अबदुल्लाखान त्याला विजापूरला घेऊन आला. कनकगिरीच्या वेढ्यात शिवाजीचा मोठा भाऊ संभाजी व अब्दुल्लाखान विजापूरच्यावतीने चालून गेले असताना संभाजीला पुढे पाठऊन अब्दुल्लाखानाने कपटाने तोफेचा गोळा मारून संभाजीला ठार केला होता. विजापूर दरबारात स्वारीचा विडा उचलताना 'शिवाजीला उंदरासारखा धरून आणतो.' असे गर्वाने बोलून त्याने विडा उचलला होता.

रेडयाच्या वळाचा सय्यदबंडा शरीररक्षक होता. बंडा म्हणजे आजन्म चाकर, पट्टयाच्या डावपेचात मोठा वाकबगार व धिप्पाड शरीराचा असा होता. अत्यत विश्वासू म्हणून खान त्याला नेहमी बरोबर घेई. खानाचा शरीररक्षक म्हणूनच तो होता. अफाट शक्ती, तलवार व भालाफेकीत हा मोठा प्रसिद्ध होता.

शिवाजी महाराजांकडे कुस्ती, तलवार व पट्टा यात पटाईत असलेला संभाजी कावजी हा एक मराठा भालदार होता. बळकट योध्यांना तो दाद देत नसे. प्रतापगडाच्या या युद्धात हा मोठा चलाख योद्धा होता. पुढे हा मोगलांना मिळाला. चाकण हे गाव सर करताना मोगलांच्यावतीने तो लढत होता, तेव्हा डिसेंबर १६६९ मध्ये हा मारला गेला.

"होता जिवा म्हणून वाचला शिवा" अशी एक म्हण आजही मराठी भाषेत आहे. जिऊ महाला हा कोंडीवलीचा रहिवाशी. हा अनेक वर्षे शिवाजीचा शरीररक्षक होता. याचे आडनाव सकपाळ असे होते. सय्यद बंडाने शिवाजीवर ५ वार केले. ते सर्व वार शिवाजीने चुकविले. ५ व्या वाराच्या वेळी याने हत्यारांच्या हातासह सय्यद बंडाला जानव्याप्रमाणे वार करून तोडून ठार मारले.

शिवाजीचा वकील पंताजी गोपीनाथ बोकील किंवा गोपीनाथपंत बोकील हा शिवाजीच्या अत्यंत घरोब्यातील होता. मातोश्री जिजाबाई व हा सोंगटया खेळत असत. ग्रँडडकच्या इतिहासात चुकीने त्याला खानाचा वकील म्हणून लिहिले आहे. (ग्रँडडक १ पान १३८–१४१) शिवाजीने याला हिवरे हे गाव इनाम दिले होते. परंतु प्रतापगडाच्या लढाईपासून हा शिवाजीचा खाजगी चिटणीस होता. हे हिवरे गाव यापूर्वीच त्याला इनाम मिळाले होते. प्रतापगडाच्या युद्धानंतर मुक्काम भोळी, मुक्काम मांडकी या गावात एक एकराच्यावर जमिन व मांडकीचे शेटेपणाचे वतन शिवाजीने त्याला दिले. शाहूछत्रपतींनी ते कागदपत्र पाहून नव्या सनदा करून दिल्या होत्या. पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी सखाराम बापू बोकील हे ह्याच घराण्यातील होत.

प्रतापगडाच्या युद्धात भेटीच्या झटापटीत किती लोक मेले, हे कळत नाही. खानाच्या सैन्याला वर काय प्रकार चालू आहे. हे कळण्याच्या आतच बेसावध असताना मराठ्यांच्या अचानक हल्ल्याला तोंड द्यावे लागले. रात्र काळोखी व मुलूख दऱ्या डोंगरांचा यामुळे त्यांना पळण्याशिवाय मार्ग राहिला नाही. सर्व दिशांनी हरहर महादेवाच्या गर्जना येऊन हल्ल्यावर हल्ले येऊ लागल्यामुळे बेसावध असलेले खानाचे सैन्य पटापट बळी पडले. जनीच्या टेंदावरील १५०० लोकांवर अण्णाजी रंगनाथ याने गडाच्या उत्तरेकडून हल्ला चढविला. धावणीच्या टेपाच्या खाली फासलकर, कान्होजी जेधे, बांदल हे लोक १५०० लोकांवर तुटून पडले व मोरोपंत पिंगळे व दरवाजाच्या वहाळातील हैबतराव सिलीमकर तीन टोळ्या करून त्याच्यावर तुटून पडले व त्यांनी त्याचा फडशा उडविला. मोरोपंत पिंगळ्यांनी तोफ ऐकताच पार गावच्या आसपास असलेल्या सैन्यावर एकदम हल्ला केला. त्यांनी आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या केल्या होत्या यामुळे खानाच्या तोफा निकामी झाल्या. खानाच्या फौजेने काही तोफा तशाही अवस्थेत झाडल्या. त्यावेळी शत्रू कोण व मित्र कोण हे कळणे शक्य नव्हते. मराठ्यांचे सैन्य सर्व बाजूंनी आपणावर येत आहे. हे पाहिल्यावर खानाचे सैन्य पळू लागले. त्यांना हत्यारे घेण्यासही किंवा घोड्यावर चढण्यासही वेळ मिळाला नाही. १–१॥ तासाच्या आत ही लढाई संपली. खानाचे कित्येक लोक मेले, तर कित्येक कैद झाले. खानाचे दोन मुलगे, झुंझारराव घाटगे वगैरे मोठे सेनापती आणि १८०० घोडे, ९५ हत्ती १२०० उंट, अनेक बैल व तोफा, तलवारी, बंदुका पट्टे, हत्यारे १२ हजाराचे जडजवाहीर, खजीना व धान्य, तोफांचा दारुगोळा, युद्धोपयोगी बरेच सामान महाराजांना मिळाले. रणतोंडीचा घाट बंद करून टाकण्यात आला होता. बाबाजी भोसल्याने ४० स्वारांनिशी वाईकडे पळणाऱ्या खानाच्या सैन्याला कापून काढले. सर्व घाट बंद केले होते. मोरोपंतांनी आपल्या सैन्यातील मरळ, ढमाले वगैरे सरदारांना सिलीमकरांच्या मदतीला पाठविले होते. या झटापटीत मोरोपंतांच्या हाताखालचा एक सेनापती पदमनाभी हा मारला गेला. नेताजी पालकराने कुडेश्वराच्या पठारावरून

एक घोडदळाची तुकडी रघुनाथ बल्लाळ कोरडयाच्या हाताखाली जावळीवर पाठविली. कुडेसर जावळी हे अंतर तीन मैलांचे असून कुडेसर जावळीच्या वायव्येस तीन मैलांवर आहे.


बावाजी भोसले बोचेघोळीमध्ये घोडेस्वारांसह असल्यामुळे पारच्या खानाच्या सैन्याला वाईला जाण्यासाठी मार्गच राहिला नाही. त्यामुळे जावळी व पार येथील खानाचे सैन्य वेगवेगळी पडली होती. महाराज गडावर पोहोचलेले पाहिल्यावर हिरोजी फर्जंद आपल्या सैनिकांसह मोरोपंतांच्या सैन्याला येऊन मिळाला. पारच्या सैन्याला जनीच्या टेपावरच्या १५०० लोकांचे काय झाले हे कळले नाही. खानाकडूनही निरोप वगैरे काही नव्हता. खानाने माझ्याकडून बातमी येताच माझ्या मदतीसाठी गडावर काही जणांनी चालून यावे, असा हुकूम देऊन ठेवला होता. खानाकडून निरोपच न आल्याने सर्वच गोंधळ उडाला. कोयना नदीला वाईकडे जाणारा फक्त एकच पाय उतार होता, तोही मराठयांनी अडविला होता. पंतांचा हल्ला अचानक व जोराचा होता. म्हणून तो पूर्णपणे यशस्वी झाला. खानाच्या फौजेत अंधार व सर्व दिशाने अचानक हल्ला झाल्याने गोंधळ उडाला व ते सर्व कापून टाकले गेले. जावळीला रघुनाथ बल्लाळ याने एकदम हल्ला चढविला. तेथेही मोठा गोंधळ उडाला. बावाजी भोसल्याने जावळी व पार यातील सैन्याची सरमिसळ होऊ दिली नाही व वाईकडे कोणालाही जाऊ दिले नसल्याने प्रतापगडाला काय झाले हे कोणालाही कळले नाही. तो जर तेथे नसता तर पारची फौज वाईला गेली असती व घोटाळा झाला असता, त्यामुळे पारच्या लढाईत खानाचे ३ हजार लोक मेले व आगणीत जखमी झाले. मराठयांचे १७३४ लोक मेले व ४२७ जखमी झाले. महाराजांचे दोन सेनापती शामराजपंत व त्रिंबक भास्कर हे या लढाईत पडले. जावळी गडाच्या ईशान्येस कोयनेच्या उत्तरेला साधारण दोन मैलांवर आहे. तेथे सपाटी मोठी होती. नेताजीने आपल्या घोडदळासह त्या लोकांवर एकदम हल्ला केला. रघुनाथ बल्लाळ सबनीसाने आपल्या घोडेस्वारांना अचानक हल्ला करण्याचा हुकून दिला व त्याची वाताहात लावली.

रघुनाथपंताने खानाचा वाईकडील जाण्याचा मार्ग बंद केला. त्यामुळे वाईकडे पळणाऱ्या खानाच्या सैन्याला मुळीच जाता आले नाही व खानाची तीन्ही सैन्ये अलग अलग पडली.

नेताजी जवळ ५००० घोडदळ होते. जनीच्या टेपावर हल्ला झाला त्याचवेळी नेताजी जावळीची लढाई रघुनाथ बल्लाळ सबनीसाने जिंकली आहे असे कळल्यावर नेताजी आपल्या सर्व घोडदळासह सरळ वाईकडे निघाला. बोचेघोळीतून जाताना बाबाजी भोसल्याजवळ पुरेसे सैन्य आहे, हे पाहून तो एकदम वाईकडे निघाला. खान ज्या मार्गाने आला होता त्याच मार्गाने जरा वळसा घेऊन तो अचानक वाईवर आला ते खानाचे सैन्य स्वस्थ होते. नेताजीने आपल्या घोडेस्वारांच्या टोळ्या केल्या व दक्षिणेकडील घोडदळाने प्रथम दोन टोळ्या व नंतर चार टोळ्या करून वाईच्या पश्चिमेचे कृष्णेच्या उत्तर तटावरचे पांढरे व बेंद्रे यांना मेणवली गावाच्या पूर्वेस साफ धुळीला मिळवले. कृष्णेचे दक्षिणेकडील घोडदळाने एक टोळी घोरपड्यावर, दुसरी जगतापच्या तळावर पाठवली. पसरणी गावाच्या ओढ्याच्या पलीकडे बावधनच्या डोंगरापर्यंत सर्व फौज त्याने मारून काढली आणि सर्व बाजूने वाई शहराच्या पूर्वेकडून तसाच निकराचा हल्ला करून अंबरखान व इसमखान याच्या सैन्याची त्याने धूळदाण उडविली. हा हल्ला अचानक होता. वाईची कोणतीच फौज नेताजीवर हल्ला करण्याकरता तयार झाली नाही. वाईचे खानाचे सैन्य ख्याली-खुशालीत होते गुरुवारी संध्याकाळी खान व शिवाजी यांची भेट होणार, खान शिवाजीला पकडणार ह्या आनंदात ते होते. खानाने वाईला २०-२२ हजार फौज ठेवली होती. वाई हीं खानाची आघाडी होती. जड तोफा हलक्या तोफा वाई येथे होत्या. दारूगोळा खजीना तेथेच होता. मुसलमान सेनापतीच्या हाताखाली दहा-बारा मराठी सरदार होते. त्यांचा साफ धुव्वा उडाला. कडेसरपासून ४ तासात रात्री ९ च्या दरम्यान 'नेताजी अचानक आलेला पहाताच खानाचे सैन्य गर्भगळीतच झाले. नेताजी आला ही बातमी कळते न कळते तोच नेताजीची धडक प्रथम खानाच्या डाव्या बगलेवर पडली व नंतर पूर्वेकडून सर्व सैन्याला एकदम

वेढा पडला. गुरुवारचा दिवस असल्यामुळे सर्व लोक स्वस्थ होते. त्यांना एकत्र येण्याची व विचार विनिमय करायला सवडही मिळाली नाही. खानाचे सैन्य साताऱ्याच्या बाजूला पळू लागले. याच मार्गाने अफझुलखानाचा मुलगा फाजलखान खण्डोजी खोपडयाच्या मदतीने साताऱ्यात पोचला व सर्व सैन्याची दाणादाण उडाली. दुसऱ्या दिवशी मोठ्या तोफा, हत्ती, घोडे, दारुगोळा धान्य व खजीना मराठ्यांच्या हाती लागला. वाईचा कबजा घेऊन व तेथील सर्व सामान घेऊन नेताजी प्रतापगडावर आला. यावेळी १४ हजार डेरे, असंख्य राहुटया, १० हजाराचे कापड, तीन लाखांच्यावर मोहरा, होन सर्व खजिन्यासह मिळाले. रानोमाळ टाककेल्या समशेरी, भटकणारी घोडी, ७ लाखाचा खजिना महाराजांना मिळाला. हे सर्व गोळा करून प्रतापगडावर नेण्यात आले.

♣ ♣ ♣



बालेकिल्ला प्रतापगड




**श्रीछत्रपती शिवाजी महाराज**

( एका डच प्रवाशाने काढलेले श्रीशिवाजी महाराजांचे प्रत्यक्ष चित्र )



आदिलशाही सरदार अफझुलखान



प्रतापगड व अफझुलखानाची कबर

# १ शिवभारतातील अफझलखान प्रसंग

शिवभारत किंवा कविंद्र किंवा परमानंदाचे अनुपुराण या ग्रंथांत अफझलखानाच्या शिवाजीवरच्या स्वारीचा उल्लेख विस्ताराने आला आहे. सतराव्या अध्यायापासून तेवीसाव्या अध्यायापर्यंत कविने या प्रतापगड युद्धाचे वर्णन रसाळपणे विस्तृत व काव्यात्मक भाषेत केलेले आहे. हा कविंद्र या वेळी कोकणात सध्याच्या कुलाबा जिल्ह्यातील पौलखपूर किंवा प्रतापगडाखालील पोलादपुरात होता. त्याचा तेथे लहानसा वाडा, विहीरही होती. आज त्या जागी कविंद्र परमानंदांची समाधी आहे.

शिवाजीचा वाढता विरोध पाहून अलिल आदिलशहाने अफझलखानाला दरबारात बोलावून त्याची स्तुती केली व त्याला शिवाजीवर पाठविण्याची नियुक्ती केली. अलिल आदिलशहा म्हणाला ‘ तू शूर आहेस. रामराज्याच्या वंशातील राज्यांना श्रीरंगपट्टणच्या राजांना तू शरण आणलेस. कर्णपूरचा राजा ताब्यात आणलास. मदुरा व कांचीपुरी लुटून तू अपार सोने आणले होतेस.’ अफझलखान आपल्या बरोबर सिद्धि अंबर, अकूशखान, याकुबखान मुसेखान, हसन पठाण, रणदुल्ला व बर्बर सिद्धि हिलाल हे मुस्लिम सरदार व मराठ्यातील बाजी घोरपडे, पांढरे व खराटे नाईक, कल्याण यादव; जाधवराव मंबाजी भोसले, सर्जेराव घाटगे, काटे वगैरे सरदार घेऊन निघाला. परंतु त्याला अपशकून होत होते. शिवाजीने जावळी जिंकली तेव्हा तेथील प्रतापराव मोरे विजापूरच्या दरबारात गेला होता. त्याने पुण्याकडे जाणाऱ्या खानाला जावळीकडे आणले. त्याला जावळी जिंकून घ्यावयाची होती. शिवाजी जावळीत ठाणे देऊन बसला होता म्हणून त्याला अब्दूलखानाने निरोप पाठविला की, ‘आपण पावलो पावली आदिलशहाच्या अन्तःकरणाला शल्यासारखा टोचणारा उद्धटपणा करीता. निजामशाही गेल्यावर विजापूरकडे आलेला मुलुख लहान मोगलांना दिला तो तू ताब्यात आणला आहेस. दंडाराजपुरचा सिद्धि जळफळत आहे. चंद्रावाची जावळी बलाने

हरण केली आहेस. कल्याण व भिवपुरी (भिवंडी) घेऊन मशीदी जमीनदोस्त केल्या आहेस. मुसलमानांचे सर्वस्व हरण व विटंबना केल्याने ते तुझ्यावर खवळले आहेत. काजी, मुल्लांना कैद केले आहेस. म्हणून व अन्यायाने सुवर्ण सिंहासनावर तू बसतोस म्हणून आदिलशहाचे सहा प्रकारचे सैन्य घेऊन मुसेखान वगैरे सरदार तुझ्याबरोबर युद्ध करण्याचे मला प्रोत्साहन देत आहेत. निरा आणि भिमा यामधील प्रदेश, सिंहगड, लोहगड, पुरंदर, जावळी जबरदस्तीने हिसकून घेतली आहेस. हे अफझलखानाचे आलेले पत्र एकांतात ऐकून एक मसलत मनामध्ये योजून शिवाजीने या पत्राला उत्तर दिले. त्याने आपल्या दूताला बोलावून अफझलखानाला मोठे मायावी पत्र लिहिले, 'अग्नितुल्य पराक्रम, अतूल बाहूबल आपल्याजवळ आहे तरी आपण मजवर दया दाखविली हे फार चांगले केले. आपल्या ठिकाणी कपट मुळीच नाही. आपण जावळीला येणे मला योग्य वाटते, त्यामुळे माझे वैभवही वाढेल व मी निर्भय होईन. उन्मत्त मोगली सैन्य व आदिलशाहीचे कस्पटासमान सैन्य भयंकर पराक्रमी अशा आपणा शिवाय मला कस्पटासमान वाटते. जावळीस येताना मार्गाने दक्षतेने यावे. जावळीसह आपण मागाल ते किल्ले मी आपणांस देईन व माझ्या हातातील कटचार मी तुमच्यापुढे ठेवन.' हा निरोप ऐकून आपले स्वामिकार्य झाले असे खानाला वाटले. त्याला वाईपासून तीन योजने असलेली जावळी आपल्या हातात आली असे वाटले. त्याने दरबार भरवून आपल्या दरबाऱ्यांना हकीकत सांगितली. तो म्हणाला, 'आपणांस तेथे जाण्याची भीति वाटत नाही. कारण आपले सैन्य उमदे, सज्ज व जागृत आहे. तेंथे वाघ व हत्ती आहेत म्हणून तुम्हांला त्यांची टेहळणी क्षणोक्षणी केली पाहिजे. माझा बेत वीज कडाडली किंवा आकाश कोसळले तरीही मी बदलणार नाही. बने जाळून टाकीन, पृथ्वी खणून टाकीन व पर्वत जमीनदोस्त करीन, पण माझे योग्य बोलणे शिवाजी कबूल करणार नाही तर मी देवता भ्रष्ट करीन' अफझलखानाला विरोध त्याच्या कोणत्याही सैनिकाने केला नाही. सरदार म्हणाले, 'त्याच्या हृदयात काहीतरी साहस आहे. दाट जंगलांची ती भूमी घोडयांना जाण्यासाठी सुखकर नाही. चढण्या उतारण्याच्या वाटा अकुंचित आहे. तेथे हत्ती

कसे जाणार! तूं अल्लीआदिलशहाचा प्राण दिल्लीच्या बादशहाचे हृदयशल्य आहेस. तू खड्डयांत शिरू नकोस. शिवाजीला तुळजादेवी साहाय्य आहे. तो योग्यप्रमाणे आहारविहार करतो. सर्व लोकांचे गुप्त वेष जाणतो. किल्ल्याच्या माथ्यावर तटाच्या आत उडी मारून शत्रूचा निःपात करतो. न कळता अगणीक दूर जातो. त्याचे जवळ पुष्कळ सैन्य आहे.' अफझलखान म्हणाला, 'तो अपराधी व स्वभावाचा गर्विष्ठ आहे. तो अमानुष कृत्ये करणारा आहे असे तुम्ही म्हणता. माझा पराक्रम न ओळखल्यामुळे तुम्ही हे म्हणता. मी कर्नाटकातील राजांचे निर्दालन केले. गड किल्ले फोडले. देवांना भ्रष्ट केले. यमसुद्धा भीतिने माझ्याशी आज तह करील. मी ते दुर्लक्ष अरण्य तत्काळ जमिनदोस्त करीन.'

इकडे भक्तवत्सल भगवती तुळजादेवीने शिवाजीला दर्शन दिले.

प्रणाम करणाऱ्या शिवाजीला देवीने आपल्या हाताने वर उठविले. ती म्हणाली, 'तुझ्याजवळ युद्ध करण्याकरिता कपटी अफझलखान येत आहे तो उन्मत्त दानवच समज. त्याला सर्व देवांना अवध्य असा रावण समज. तो मेलेलाच आहे असे समज व तरवारीच्या जोराच्या वाराने त्याला भूमिवर पाड. तो छिन्नविछीन्न झालेला भूमिवर पडलेला सर्व देवांना पाहू दे. मी तुळजापूर सोडून तुझ्या सहाय्यार्थ आले आहे. कृष्णाच्या वेळी मी नंदाच्या घरी जन्म घेतला. कंसाने माझा अपमान केला. तसाच याने माझा अपमान केलेला आहे. तुझ्या हाताते तो मरावा हे ब्रम्हलिखीत आहे. मी तुझी तरवार धरलेली आहे. इतके बोलून शिवाजीच्या तलवारीत शिरून भवानी गुप्त झाली. त्याने आपल्या सैनिकांना बोलवून विचार विमिमय केला. तुम्ही शत्रूंना न कळत अरण्यात दडून राहा व दुंदुभिचा ध्वनी होताच त्यांची सेना कापून काढा. त्या रस्त्याने हत्तींना आपली शरीरे भारभूत वाटली. स्वार उतरले असताही घोडे कष्टाने चढले. कितीक सैन्य तोंडघशी पडले. घोडे व हत्ती यांच्या पायाने उखळलेल्या धोंड्यांनी अनेक सैनिक मारले. सैनिकांची निशाणे व छत्र्या फाटल्या. काही कड्यावरून पडून मेले. तशाही अवस्थेत सूर्याच्या किरणांच्या गर्द छायेने स्पर्श न झालेली जावळी अफझलखानाने गाठली.

कुमुदवतीच्या तळावर (कोयना) शत्रूने तळ दिला. सर्व सैनिक घाबरून गेले. विक्रीच्या पदार्थांने भरलेल्या दुकानांनी व लोकांच्या गलबल्याने सर्व रान भरून गेले. अफझलखान व शिवाजी यांनी आपले वकील एकमेकांकडे पाठविले. लोकांना तह होत आहे असे समजले. सर्वांना देणग्या देण्यासाठी अनेक व्यापाऱ्यांना शिवाजीने बोलाविले. रत्नांच्या व्यापाऱ्यांनी रत्ने दाखविली. रत्ने काढून घेऊन सर्व व्यापाऱ्यांना शिवाजीने आपल्या जवळच ठेवले. विश्वास ठेवलेल्या शिवाजीजवळ कपट करून सख्य करण्यासाठी भेटताना आपली गुप्त कटचार स्वत: त्याच्या पोटात खोल खुपसून देईन असे अफझलखान मनाशी म्हणाला.

आपले सैन्य जसे आहे तसेच ठेवून अफझलखानाने सशस्त्र पालखीत बसून सेवेसाठी दोन तीन सेवक बरोबर घेऊन प्रतापगडाच्या पायथ्याजवळ स्वत: मंडपात वाट पहात राहावे. शिवाजीने सशस्त्र येऊन यथाविधी आदर सत्कार करावा व दोघांच्याही रक्षणासाठी दहा दहा सैनिक आणावे व ते बाणाच्या टप्प्यावर उभे करावे व दोघांनीही भेटल्यावर गुप्त खलबत करावे असा करार करून प्रतापगडाच्या पायथ्यावरील मैदानाकडे अफझलखान येत आहे असे कळल्यावर शंकराची पुजा, नित्याचे दान केल्यावर शिवाजी थोडेसे जेवला. त्याने तुळजादेवीचे चिंतन केले. आचमनाप्रमाणे वारंवार तो पाणी पीत होता. वेश करून आरशात तोंड पाहून पुरोहित ब्राम्हण यांना नमस्कार करून व त्यांचा आशीर्वाद घेऊन दही, दुर्वा, अक्षता, यांना स्पर्श करून शिवाजीने सूर्यबिंब पाहिले. सुवर्णासह सवत्सधेनू दान दिली व सर्व बंदोबस्त करून उत्तम कवच घातलेला शिवाजी शुभ्र पागोट्यात तुरा खोवलेला, केशराचा शिडकाव मारलेल्या आंगरख्याने शोभत होता. एका हातात तरवार व दुसऱ्या हातात पट्टा नंदक खड:ग कौमोदकी गदा घेतलेला श्रीविष्णुप्रमाणे शोभत होता. झपझप पावले टाकीत गडाच्या कडेवरून अंकुशाग्राप्रमाणे सुंदर भौव्य आणि लांब दाढीचा भिषण दिसणारा धैर्यवान अशा वीर शिवाजीला अफझलखानाने पाहिले. किंचित गालातल्या गालात हसून शिवाजीने त्या क्रूद्ध यमाप्रमाणे दिसणाऱ्या अफझलखानाकडे पाहिले. आपल्या हातातील म्यानासह असलेली तरवार शिवाजीचा विश्वास

आपल्यावर बसवून घेण्यासाठी आपल्या सेवकाच्या हातात दिली. खोटा स्नेह दाखवीत खान शिवाजीला म्हणाला, 'अरे युद्धाचा उत्साह फुकट धारण करणाऱ्या–खैर असा तू नितिमार्ग सोडून कुमार्ग का करतोस? आदिलशाह, कुतुबशाह किंवा महाबलाढ्य दिल्लीपती यांना मनात गर्व धरून मानीत नाहीस, त्यांची सेवा करीत नाहीस म्हणून मी आज तुला उद्धटाला शिक्षा लावण्यासाठी आलो आहे. मला शरण ये हे गड दे आणि लोभीपणा सोड. मी तुला आदिलशहापुढे स्वहस्ताने धरून नमवावयास लावीन. अरे पोरा, शहाजीच्या मुला घमेंड सोडून, आपला हात माझ्या हातात दे. ये मला आलिंगन दे.' असे बोलल्यावर खानाने शिवाजींची मान डावे हाताने धरून शिवाजीचे कुशीत कटचार खुपसली. शिवाजीने बाहुयुद्ध निपुणतेने त्याच्या हातातून मान सोडवून घेऊन गंभीर ध्वनी केला आणि अंग आकुंचित करून पोटात घुसणारी कटचार चुकविली. हा वार तुला करितो तो घे मला धर असे शिवाजी म्हणाला व दोन्ही हातांनी फिरविलेल्या नागव्या तलवारीने (पट्टा) घेऊन त्याने त्याचे टोक खानाच्या पोटात पाठीपर्यंत खुपसून त्याची आतडी बाहेर काढली. झिंगलेल्या माणसा-प्रमाणे मुर्च्छेने झोकांड्या खात विव्हळत पोटातून बाहेर पडलेली आतडी हाताने धरून याने मला येथे ठार केले या शत्रूस वेगाने ठार करा असे खान ओरडला.

खानाने याने मला ठार केले असे म्हणताच त्याचा पार्श्ववर्ती सेवक अफझलखानाची तरवार उपसून शिवाजीवर धाऊन आला. अफझलखानाने त्या ब्राम्हण योध्यास ब्राम्हणास शिवाजी ठार मारणार नाही असे जाणून खानाने मुद्दाम त्यास तेथे आणले होते. त्याने ती तलवार शिवाजीवर हाणली. पट्टयाने त्याची तलवार अडून खानाच्या डोक्याचे दोन तुकडे केले. एकी-कडे पटका, धड, मस्तक, आतडी, छत्री, चवरी, रत्न व मोत्यांचा शिरपेच सर्व इकडे तिकडे पडलेले होते. इतक्यात अबदूल सय्यद बंडा अफझुल-खानाचा पुतण्या रहिमखान, पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते व आणखी चार मुसल्मान रक्षक शस्त्रे पराजीत शिवाजीवर धाऊन आले. शिवाजीने दोन्ही शस्त्रांची जोडी म्हणजे दोन्ही हातांतील पट्टे फिरवीत आपल्या

भोवती जणू दीर्घ तटच निर्माण केला. ते शत्रू शिवाजीने अडविले तेव्हा संभाजी कावजी, काताजी इंगळे, कोंडाजी व येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूर्याजी काटके, जिवा महाला, विसाजी मुरुंबक, संभाजी करवर, इब्राईम सिद्धि (बरवर) अशा दहा महा वीरांनी त्यांच्यावर हल्ला केला. बंडा सय्यद प्रचंड गर्जना करून पुन्हा धावून गेला. तेव्हा शिवाजी नको म्हणत असताही मीच याला ठार करतो हा माझ्या जवळ येऊ दे असे म्हणून सय्यदाने शिवाजीच्या अंगावर उगारलेली ती तरवार आपल्या अंगावर घेतली आणि त्या विराने आपल्या तरवारीने सय्यदाचे दोन तुकडे केले. संभाजी, कावजी, येसाजी व कोंडाजी कंक, काताजी इंगळे, विसाजी मुरंबक, संभाजी करवर, सूरजी काटके, कृष्णाजी गायकवाड, इब्राईम सिद्धि यांनी दुसऱ्या शत्रूंना पटापट पाडले. शके १५८१ विकारी नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवारी मध्यान्ही अफझलखानाला शिवाजीने ठार मारले (अध्याय २१ श्लोक ८३–८४).

विजय झाल्यावर सूचक व गंभीर असा दुंदुभी ध्वनी गडावर झाला.

शिवरायाच्या सैनिकांना दुंदुभिने सूचना दिली. लगेच कमळोजी सोळंखे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल, रामजी पांगारकर हे आपल्या एकेक हजार पायदळासह व नारायण ब्राम्हण पांच हजार पायदळासह वेगाने येऊन अरण्याच्या मध्यभागी असलेल्या शत्रू सेनेस चोहो-कडून घेरले. ते शत्रू सैनिक तयार होत असताना ते सर्व आकाश कोसळून पडावे तसे अफझलखान पडलेला ऐकून ते व खानाचे तिघे पुत्र गोंधळून गेले. मुसेखान पठाण त्यांना पळू लागलेले पाहून अफझुलखानाचा भक्त, युद्धामध्ये शक्तिमान सशाप्रमाणे विस्तीर्ण डोळे असलेला व भयंकर आवाजाचा, हत्तीच्या सोंडेप्रमाणे हात असलेला नाक वर चढवून अतिशय क्रोधाने तोंड फुरफुरत त्यांना म्हणाला, 'अफझलखान जरी मेला तरी आम्ही सर्वच मेलो की काय?' चोहोकडून पर्वतावरील मार्ग कोंडलेले आहेत. तुम्ही कोठे जाल ? अरे, उभे रहा आणि सभोवतालच्या शत्रूस मारा. पळून जाऊन ते आपला प्राण वाचवितील. त्यांच्या जिण्याला धिक्कार असो.' मुसेखान घोड्यावर बसून

आपल्या सैन्यासह शिबीरातून वेगाने बाहेर पडला व शत्रू सैनिकांवर त्याने बाणांचा मारा केला. हसन वगैरे रागावलेल्या धनुर्धरांनी शत्रू सैन्याला बाणांनी जर्जर केले. शिवाजीच्या पायदळाने तरवारीने हल्ला केला तेव्हा शत्रू सैन्य चळचळा कापू लागले. मुसेखानाचा पराभव झाला. त्याने युद्धातून पाय काढला. याकुबाचा उद्धटपणा जिरविण्यात आला. त्यानेही पलायन केले. हसनखान, अंकूशखान अनवाणी पळाले. अफझुलखानाचा वडील मुलगा फाजलखान आपल्या दोघा भावांना सोडून वेषांतर करून पळून गेला. शिवाजीचा भाऊ मुंबाजी ठार केला गेला. फरादखानाचा नातू रणदुल्ला कैद झाला. अंबरखान, राजाजी घाडगे, अफझलखानाचे दोन मुलगे व अनेक सेनानायक शिवाजीच्या सैन्याने कैद केले.

भाले, तरवारी, पट्टे, परशु, मुद्गल, परिघ, त्रिशूळ, तोमर, गदा, धनुष्ये, बाण, भाते, ढाली, चक्रे, सुऱ्या, कटचारी, कवचे, शिरस्त्राणे, सोन्याचे कमरपट्टे, चामड्याचे हातमोजे व पंजे, तोफा, दुंदुभी वगैरे वाद्ये, पताका ध्वज, बिरुदे, छत्र्या, चवऱ्या, छते, कनाति अनेक रंगी रेश्मी तंबू, हांडे, कळशा, पेले, पिकदाण्या, चौरंग, चांदीसोन्याचे पलंग अनेक तऱ्हेची वस्त्रे तुटलेल्या हातांतील रत्नाच्या आंगठ्या, पगड्या या सर्वत्र पडलेल्या मिळाल्या. गिधाडे प्रेते खात होती. सर्व सैन्य गडावर आले. शत्रू योद्धे बंदीत टाकले गेले.

पटक्याने दोन्ही हात बांधलेले, बोडके, खाली मान घातलेले शत्रूचे सरदार शिवाजीने पाहिले. शत्रूच्या सैन्यामधून आणलेली सोन्याची व चांदीची नाणी, पेटयांमध्ये ठेवलेल्या रत्नराशी, मोत्यांचे हार शिवाजीने ढिगार, सोन्याचे ढिग आपल्या कोशागारात ठेऊन दिले.

यापूर्वी अफझलखानाने सुपे प्रांतात जाधव, शिरवळ प्रांतात पांढरे, सासवडच्या बाजूला खराटे, पुणे बाजूला हिलाल आणि तळ कोकणात सेफे खानाने शिवाजीचा मुलूख जिंकला होता. अफझलखान तह करण्याकरिता आला आहे तू सज्ज राहा पण युद्ध करू नको असा शिवाजीचा निरोप सेनापती (नेताजी पालकर) यास शिवाजीने दिला होता. प्रतापगडाच्या

प्रकारानंतर दुसऱ्या दिवशीच नेताजी वाईला आला व त्याने तिसऱ्या प्रहरी मोठा रणसंग्राम केला. त्यात यवनांचा मोड झाला.

जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा भाऊ प्रतापराव मोरे याने आडमार्गाने शत्रू सैन्याला त्या प्रांतातून बाहेर काढले. अफझुलखानाचा पुत्र असाच पळून गेला. नेताजीने पळणाऱ्यांचा पाठलाग केला पण त्यांची गाठ पडली नाही. नेताजी व शिवाजी वाईस आले.

नायक नावाचे दोन राजे, जाधवराव, सिद्धि हिलाल हे शिवाजीला नजराणे अर्पण करून त्यास शरण आले. शिवाजी तसाच सैन्यासह खटाव मायणी, रामापूर, कलेढोण, वाळवे, हलजयंतिका, अष्टी, अष्टे, वडगाव, बेलापूर, औदुंबर, मसूर, कऱ्हाड, सुपे, तांबे, पाली, नेरले कामेरी, विसापूर, सावे, कोळे, उरुण, कोल्हापूर या गावांना जाऊन तेथून शिवाजीने खंडणी घेतली व पन्हाळगडाला वेढा दिला व पन्हाळगड जिंकून घेतला.

कविंद्र परमानंदाच्या अनुपुराण किंवा शिवभारतातील अबदूलखानाच्या वध प्रसंगाचा हा भाग मुद्दाम विस्ताराने काव्याचा भाग सोडून देऊन येथे दिला आहे. या सर्व भागात शिवाजीची वाघनखे किंवा खानाचा वकील, त्याची वागणूक आज इतिहासाला माहित असलेल्या माहितीपेक्षा वेगळी आहे. मंबाजी भोसले मारला गेला असे या काव्यात लिहिलेले खरे नाही. मोरोपंत पिंगळे किंवा पद्मनाभि यांची नावे या वृत्तांतात येत नाहीत. तानाजी मालुसरे भेटीच्या ठिकाणी नव्हता. अनेक नव्या वीरांची नावे या काव्यात आलेली आहेत. बाकी सर्व मजकूर आपल्याला माहीत असलेल्या मजकुरा प्रमाणेच आहे. खान प्रथम जावळीला आला असे या पुराणात लिहीलेले आहे. परंतु तो रणकोंडीच्या घाटाने घर येथे आला असे लिहीलेले नाही. वाचकांना त्या वेळचा खरा प्रकार काय झाला हे या काव्यावरून स्पष्टपणे कळून येईल.

♣ ♣ ♣

# १० युद्धातील नफा तोटा

प्रतापगडचे युद्ध शिवाजी महाराजांनी अल्पकाळात जिंकले व जिंकलेल्या शत्रू सैन्याला व त्यातील नामवंत नेत्यांना प्रेमाने वागविण्याचा व त्यांना क्षमा करण्याचा नवा पायंडा शिवाजी महाराजांनी यावेळी पाडला होता. श्री. मंबाजी भोसले, जगताप, झुंझारराव, सर्जेराव घाटगे, अफझुलखानाचे दोन मुलगे यांना प्रवासासाठी सर्व सोई, पुरेसा पैसा व काही सैनिक देऊन गोड शब्दांनी सांत्वन करून त्या सर्वांची पाठवणी त्यांच्या मर्जीप्रमाणे इष्टस्थळी करण्यात आली. इतर सैनिकांनाही अशीच वागणूक देण्यात आली. अनेक मराठे व काही पठाण सैनिक आपण होऊन महाराजांच्या नोकरीत राहिले.

फाजलखान व त्याची मुले माणसे व इतर ३०० लोकांना खंडोजी खोपड्याने वाट दाखवून सातारा व कऱ्हाडपर्यंत सुरक्षित पोहोचविले त्याची शिक्षा त्याला मिळाली. महाराजांचा विजय झाल्यावर त्याला सरळ महाराजांसमोर जाणे मोठे कठीण वाटू लागले, म्हणून आपला जावई श्री. हैबतराव सिलीमकर यांचेकडे जावळीस त्याने आपला मुलगा प्रथम पाठविला व मग तो जावयाकडे आला. कान्होजी जेधे हे तेथेच होते. त्या दोघांनी त्याला माफी देण्याबाबत महाराजांकडे रदबदली केली. परंतु महाराज मृत्युदंडाशिवाय दुसरी शिक्षा देण्याला तयारच होईनात. शेवटी जेधे व सिलीमकरांनी अजीजी करून भीड घातल्यावर ज्या हाताने हत्यार धरले तो हात व ज्या पायाने तो चालून आला व फाजलखानाला त्याने पोहोचविले ते दोन्ही म्हणजे उजवा हात व डावा पाय छाटून टाकून त्याला शिक्षा दिली. मात्र देशमुखी त्याच्याकडे मोठ्या मिनतवारीने ठेवून देऊन त्याला क्षमा केली. या खोपड्यांपैकी केदारजी खोपडा व खंडोजी याचा भाऊबंदकीचा तंटा फार काळ चालू होता. त्यात खंडोजी, आदिलशहा व शिवाजी यांचा निश्चित असा एक पक्ष न घेता दोन्हीही सत्तांना त्यांच्या

आश्रयाखाली तो आहे, अशी बतावणी करी. दोन्ही दगडावर पाय ठेवणारा हा दगेबाज शेवटी शरीराचा लोळागोळा होऊन आमरणात राहिला व त्याला त्याच्या नीच कृत्याचे, राष्ट्रदोहाचे यथायोग्य प्रायश्चित्त मिळाले.

नेताजीबरोबर असलेला रघुनाथ बल्लाळ मेंडजोगी आणि शामराज निळकंठ, पद्मनाभी, रोझेकर हे या युद्धात ठार झाले. रघुनाथ बल्लाळाने जावळीच्या मसलतीत फार मोठी कामगिरी केलेली होती. हा पायदळाचा अधिकार सबनीस पदावर होता. (मध्य पु. चरित्रकोश) पद्मनाभीबद्दल निश्चित असे लिहिता येत नाही, तरी ते एक पायदळाचे अधिकारी होते व अगदी प्रथमच्या जनीच्या डोंगरातील लढाईतच ते ठार झाले होते. शामराज निळकंठ रोझेकर हा या प्रकरणानंतरही जिवंत होता असे दिसते. ( म. क. चरित्रकोष )

खान व सय्यदबंडा यांचे दफनविधी भेटीचे मंडपाशेजारीच धर्मविधी-प्रमाणे व मोठ्या इतमामाने करण्यात आले व त्यांच्यासाठी पूजाअर्चा व इतर करण्यासाठी वर्षासनांची नेमणूकही महाराजांनी करून दिली. लढाईत पडलेल्या असंख्य शत्रूमित्र वीरांची दफने विधीवत् करण्यात आली. मेलेली जनावरे पुरून टाकण्यात आली व निरवानिरव करण्यात आली.

स्वतःच्या सैन्यातील जखमींची व्यवस्था ज्या रीतीने केली तितक्याच आत्मियतेने आपपर भाव न ठेवता अगर धर्म न पाहता सर्व जखमींच्या जखमा बांधून त्यांची प्रकृती उत्तम कशी होईल याची काळजी महाराजांनी घेतली. आपल्या सैनिकांच्या अंगावरील जखमा पाहून त्याप्रमाणे त्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. ती २५ पासून २०० रुपयांपर्यंतची होती. जे सैनिक यापुढे काहीच काम करायला असमर्थ होते, त्यांना तहहयात नक्त नेमणूका सरकारकडून देण्यात आल्या. युद्धात मेलेल्यांच्या बायका-मुलांना देणग्या देण्यात आल्या. मोठमोठ्या सेनापतींना हत्ती, पोशाख, पालखी वगैरे मान देण्यात आला. सोन्याची कडी, तोडे, अलंकार, मोत्याचे तुरे व समशेरी देण्यात आल्या. ही बक्षीसांची रक्कम एक लाख होनांपर्यंत वाटण्यात आली. बडे बडे मुत्सद्दी वकील यांना इनामे देण्यात आली.

दुसरे दिवशी खानाचे शीर देवीच्या देवळासमोरच्या बुरुजात समारंभाने पुरण्यात आले व त्या बुरुजाला अफझुल बुरुज हे नाव देण्यात आले. प्रतापगडाच्या मुख्य दरवाजातून आत गेल्यावर चिचोळ्या होत गेलेल्या पूर्वेकडील तटबंदीचे शेवटी हा अफझुल बुरूज आहे.

आज आपण खानाची कबर म्हणून पाहातो ती अलीकडेच बांधलेली असून या कबरीच्या उत्तरेस महाराजांनी खान व सय्यदबंडा यांचे दफन केले होते ती जागा अद्यापही दाखविली जाते.

या कबरीचा उरूस करण्यात येतो व त्यावेळी एक कृत्रिम शीर वाजत-गाजत आणण्यात येते व खानाच्या दर्ग्यात ठेवण्यात येते.

या प्रतापगडाच्या युद्धानंतर महाराजांनी वाई सुभ्यातील आदिलशाही नोकर हाकलून दिले व आपले नवे अधिकारी तेथे नेमले. प्रजेसाठी एक जाहीरनामाही काढण्यात आला. तो युद्धानंतर एका आठवड्यात काढण्यात आला. मुसलमानी राज्यातील वागणुकीपेक्षा आमच्या राज्यात अधिक चांगल्या तऱ्हेने वागविण्यात येईल, कोणत्याही धर्मीयांना निव्वळ धर्मामुळे जाच-यातना होणार नाहीत. योग्यतेप्रमाणे प्रत्येकाला नोकऱ्या दिल्या जातील. हिंदूदेवस्थानाप्रमाणेच मुसलमानी देवस्थानांची वतने, देणग्या कायम ठेवून नव्या देण्यात येतील, कोणाच्याही धर्मात अडथळा आणण्यात येणार नाही. या जाहीरनाम्याप्रमाणे आपले अधिकारी वागतात किंवा नाही याकडे महाराजांचे सदैव लक्ष होते.

या जाहीरनाम्यात वाई प्रांतात व इतरत्रही मोठे समाधान पसरले.

आदिलशहा (स. १६५७ ते १६७२) मुहंमद आदिलशहाचा हा मुलगा सन १६३८ साली जन्मला; वयाच्या १९ व्या वर्षी १६५७ मध्ये हा तक्तावर बसला. प्रतापगडाची स्वारी याच्या कारकीर्दीत झाली.

♣ ♣ ♣

# ११ फतनदासाचा पोवाडा

प्रतापगडाचे युद्ध सायंकाळी ५। वाजता सुरू झाले व रात्री १२ च्या आत मराठ्यांना विजय मिळाला. या विजयाच्या नंतर रणक्षेत्रावर पडलेली हत्यारे, दारुगोळा, तोफा, मेलेली माणसे, धान्य वगैरेची व्यवस्था झटपट लावण्यात आली. तो काल ३६ तासांच्यावर नव्हता. ३६ तासात या जीवन-मरणाच्या प्रसंगातून महाराज वाचले. या लढाईत खानाचा विजय निश्चित आहे असे म्हणत म्हणत फुशारक्या मारणारे लोक व विजय मिळतो की नाही ह्या महाराजांकडील साशंक झालेले लोक महाराजांच्या विजयाने पूर्ण खजील झाले. असे म्हणतात की विजापूरचा दरबार त्यातल्या त्यात पादशहाची वडी साहेबीण जयाची बातमी ऐकण्याकरता उत्सुक होती. खान मारला जाईल व त्यानंतर खानाच्या सर्व सैन्याची लांडगे तोड होईल ही कल्पनाही कोणाच्या मनाला शिवली नव्हती. वाईला खानाचे सैन्य प्रचंड म्हणजे ४०–४५ हजारांपर्यंत होते. मराठ्यांच्या मूठभर घोडदळाने नेसलेल्या कपड्यानिशी त्याला पळणे भाग पाडले. हे सर्व विचित्रच असे लोक म्हणत. खानाच्या बाजूला असलेले मावळे तर घाबरून गेले. आता शिवाजी आपला काटा काढल्याशिवाय राहणार नाही अशी भीति त्यांना जाळीत होती. वडी साहेबीणीने तर काही दिवस अन्न सोडले होते असे म्हणतात !

आतापर्यंत मोंगल काय किंवा विजापूरकर काय शिवाजी भुरटा बंडखोर असे म्हणत. पण त्यांची पाचावर धारण बसली. करारी, निश्चयी, थोड्या सैन्याला आशेने आणि पगारी म्हणून जमविलेल्या हजारो लोकांना युक्तीने नाहीसे करण्याची अजब किमया सर्व सत्तांना आश्चर्याचा धक्काच देत होती. यावेळी शिवाजीने लढाईत हाती सापडलेल्या सरदारांशी व सैनिकांशी अत्यंत वरच्या दर्जाची वागणूक केली. त्याचे एकच मोठे उदाहरण म्हणजे अफझुलखानाचे २ मुलगे व शहाजीचा जिवश्च कंठश्च मित्र मलवडीचा सर्जेराव घाटगे आणि इतर लोक यांना कपडे, संरक्षण व आदराची वागणूक

दाखवून, त्यांना सन्मानाने घरी पोहचविले हे होय. कोणाही पकडलेल्या माणसाला यावेळी आपल्या तोफेच्या तोंडी देण्यात किंवा ठार तरी मारण्यात येईल असे वाटत होते. जखमी कैद्यांना आणि युद्ध कैद्यांना दुसरे दिवशी महाराजांपुढे हजर करण्यात आल्यावर त्यांच्या दर्जाप्रमाणे व्यवस्था व पाठवणी करण्यात आली.

प्रतापगडच्या या गाजलेल्या युद्धावर अज्ञानदास या नावाच्या पुण्याच्या शाहीराचा पोवाडा आहे. त्यात अफझुलखानाचे शीर शिवाजी राजाने कापले वगैरे मजकूर आहे. शिवाजी व खान यांच्या तोंडी घातलेली काही वाक्ये विचित्र वाटतात. तरीपण हा पोवाडा शिवकालातच प्रतापगडचे युद्ध झाल्यावर काही दिवस लोटल्यावर लिहिलेला आहे. पोवाडा स्वत: शाहीराने शिवाजी महाराजांना म्हणून दाखविला व त्याला महाराजांनी बक्षीसही दिले.

आता दुसरा एक पोवाडा फतनजी नावाच्या शाहीराने रचलेला आहे. तो भारत इतिहास संशोधक मंडळाने आपल्या त्रैमासिकाच्या वर्ष ४४ अंक १ ते ४ यात छापलेला आहे. पोवाडा विजापूरचे श्री. ना. व. जोशी यांना मिळाला. ही वही २०० वर्षांची जुनी असावी असे ते म्हणतात. ही वही त्यांना संगमनेर येथे मिळाली.

शिवाजी महाराजांचे स्वभावचित्र फतनजीने वर्णिलेले आहे.

या पोवाड्यात अफझुलखानाला भवाबल असे बाहुबली म्हटले आहे. राजा बोलला आपण कोणी खानाशी भांडू नका, ते आमचे धनी आहेत. हे सत्य ( सत् ) मानावे. आम्ही खानाजवळ सल्ला करून गडकोट त्याला देऊ. मी खानाबरोबर पादशहाला भेटावयाला जाईन. महाराजांनी गडोगडीचे ( हास्यम ) शिपाई प्रत्येक गडावरचे निम्मे जाऊलीला बोलविले. खानाला वाटले शिवाजी भ्याला आहे. त्याने सिद्दीहिलाल याला पुण्याला पाठविले व सिद्दी संभे याला कोंकणात पाठविले.

खानाला जासुदांनी सांगितले की जाऊली व प्रतापगड या महा अवघड

जागा आहेत. जाऊली सभोवार गहनारण्य व कळकाच्या घनदाट नाळ्या आहेत, आकाशाला भिडलेले कडे सभोवार आहेत. तिथे मैदान नाही, तिथे लढाई देता येणार नाही.

शिवाजीने प्रथम खानाकडे वकील पाठवून खानाजवळ सल्ला करण्याचे सुचविले व खानाने आपला वकील शिवाजीच्या वकीलाबरोबर देऊन शिवाजीच्या पत्राला उत्तर दिले. एकमेकांचे पत्रोपत्री लिखाणातही डावपेच चालले होते. खानाने लिहीले होते पादशहा व बडी साहेबा आमचा जाब मोडीत नाहीत असा माझा प्रताप आहे.

दोन वकीलांसमोर अफझुलखानाकडून आलेले कौलाचे पत्र शिवाजीने डोक्यावर ठेऊन शिरोधार्य असे दाखविले खानाचे वकिलाचा मोठा मान-मरातब आदराने केला.

'मला तेथे यावयाला फार भीती वाटते तेव्हा खानसाहेबांना येथे आणा' असे शिवाजीने खानाच्या वकीलाला सांगितले. खान मोठ्या साहसाने रड-तोंडीचा घाट उतरला. मांडव घालून खानासाठी एक ( सुखपाल ) पालखी व डोई ओझाने मेणा व मिठाई शिवाजीने खानासाठी पाठविली.

खानाने भेटीच्या जागी आल्यावर शिवाजीला बोलविण्यासाठी महालदार पाठविला, तेव्हा 'येतो तुम्ही पुढे चला' असे शिवाजी म्हणाला.

शिवाजी येता येता तिसरा प्रहर उलटून गेला. खानाने उशीर झाल्या-बद्दल विचारल्यावर शिवाजी म्हणाला, 'भाऊबंद सहोदर सर्व जमले आहेत, त्यांना विचारून सांगून मग आलो.'

चाळीस हजार पायदळ रानांत शिवाजीने ठेवले होते.

जेव्हा मी प्रतापगडावर आवाज करीन तेव्हा तुम्ही घाट रोखून धरा अशी आज्ञा पायदळाला होती.

तुमचे आमचे पाचजण भेटीच्या जागी असले तरच मी तुम्हाला भेटेन, असे शिवाजीच्या महालदाराने जाऊन खानाला सांगितले. खानाने भोई

मागवून एक पेशवा व एक पठाण बरोबर घेतला. चार सदरा तयार होत्या. पहिलीत जे कोणी तेथे येतील त्यांच्यासाठी, दुसरी सदर भोयांसाठी तिसरी सदर शिपायांसाठी होती. चवथ्या सदरेत कारकुनांचे दप्तर होते. पाचवी सदर सुंदर श्रृंगारलेली राजाची होती. या सदरेस जरतारी कापड व झगमगाट होता.

पालखीत बसून शिवाजी येत होता. अफझुलखानाकडे शिवाजीची दृष्टी गेली व शिवाजी पालखीतून उतरून खानासमोर उभा राहिला.

'तुझेच नाव शिवा आहे काय ?' खान म्हणाला. 'तु पातशहाची गावे व विलायत खातोस आणि गुमान करतोस. पातशहाचे गड तू घेतलेस ते तुला कसे जिरतील ! तुला पृथ्वीत ठाव कुठे मिळणार नाही. पातशहाचे वाईट चिंतून तू पातशहाशी भांडण लावले आहेस.'

महाराजांनी हात जोडले व 'आपण आज्ञा द्याल तर मी सर्व सांगेन' असे ते म्हणाला. 'मी पातशहाचा मुलूख जतन केला आहे. मोगलांची फौज मी अडकवून ठेवली आहे. मोंगल कोकण काबीज करावयास गेले आहेत ते मी सोडवून घेतले आहे. मी माल आणला तो शिपायांना वाटून दिला. पदरचे पैसे खर्च करून गडकोट मी बांधले आहेत. आता, ते मी तुम्हाला कसे देऊ?'

'मी पातशहाला गड दिले तर तुम्ही मला काय द्याल ? तसा देण्याचा परवाना पातशहाचा असेल तर तो मला पाहू द्या.'

यावर खानाचा पेशवा म्हणाला, 'खानाचा हात माथ्यावर घे, तो तुला घेतला पाहिजे. त्यांच्या पोटात डोई घालून तू त्याला शरण जा. अन्यायाची माफी माग.'

शिवाजी म्हणाला, 'मी तुमचे फार मोठे अन्याय केले आहेत. मी तुमच्या जागा सांभाळल्या आहेत.'

'खानसाहेब, शपथेवर सांगतो की आम्ही पातशहाचे उमराव आहोत. पातशहाचे 'सही शिक्याचे फर्मान मला दाखवा म्हणजे गड आणि मुलूख मी देऊन टाकीन.'

खानाचा पेशवा म्हणाला, 'तुम्ही खानाला भेटावे. मनातलं कपट टाकून द्या, ते दूर करा.' यावर शिवबा म्हणाले, 'खानाची फिरंग घ्यावी, मग भेटतो. माझ्या मनाची शंका घालविण्यासाठी खानाच्या हातातील फिरंग काढून घ्या. मराठ्यांची ही अक्कल आहे असे समजा.'

खानाने महालदार बोलावून त्याच्या हाती फिरंग दिली व त्याला वेगळा केला.

मग हसतमुख राजा भेटीला पुढे निघाला. धीट शिवाजी राजा ( धिट, पाट, नेहट राजा ) चांगले बोलू लागला होता. त्याने चौफेर नजर टाकली शिवाजी व अफझुलखान भेटले.

खानाने पोटात डोई घेऊन शिवाजीला गवसून धरला आणि कट्यार ओढून त्याने शिवाजीला मारली. जिऱ्याच्या चिलखतावर तिचे काहीच चालले नाही तेव्हा अफझुलखान दचकला.

शिवाजीने बेशक वेगीन काढली आणि वरमावर बिचवा मारला.

वाघनखांचा हात ओढला. खानाचे पोट फुटले. सावधचित्ताने खानानें फिरंग घेतली व हात टाकला. राजाने पट्टयाचा वार ओढून घेतला. खानाचा दुसरा वार ओढून मारला.

खानाने पालखीवाल्याला बोलाविले व तो पालखीत बसून चालला.

राजे ओरडले संभ्या (संभाजी कावजी) थांब. वैऱ्याला जाऊ देऊ नको. तू कोणावर काम टाकू नको, तू शीर काप.

संभाजीने खानाला पालखीतून ओढला व त्याची मान कापली.

पण सय्यदबंडा धावतच पुढे आला. पाच-सात त्या पठाणावर पडले. त्याला त्यांनी ठार मारला.

असा राक्षस आणखी जन्माला येणार नाही याला लवकर मूठ-माती द्या असे शिवबा म्हणाले.

शीर घेऊन राजा प्रतापगडावर गेला.

गडावर गेल्यावर तोफा डागल्या आणि शिपायांना तीच खबर मिळाली.

हत्यार फेकून देईल त्याला सोडून द्या असा महाराजांचा हुकूम होता.

इतक्यात ( पार गावावर तळ देऊन बसलेला ) मुसेखान तयार झाला. जमावानिशी तो निघाला. पार घाटाकडे तो धावला. पण त्याचे काही चालले नाही. मुसेखान पठाण वाईकडे पळाला आणि फाजलखानास त्याने वाईला गाठले. त्याला घेऊन मुसेखान विजापूराला गेला. या फतनशी शाहीराने पोवाड्याच्या शेवटच्या ओळीत ।। मागील मजकूर झाला शाहीर फतनजी बोले ।। असे स्पष्टपणे लिहिले आहे.

प्रतापगडाच्या युद्धानंतर तीस-चाळीस वर्षांनी हा पोवाडा रचलेला आहे. कदाचित् सन १७०० सालानंतर पाच दहावर्षात रचलेला असावा असे भाषेवरून कळून येणारे आहे. हा पोवाडा एका कवीच्या वहीत सापडला आहे व ती नक्कल आहे.

हा पोवाडा अज्ञानदासाच्या पोवाड्यापेक्षा निराळा व सरळ सरळ कथन करणारा वाटतो. तुळजापूर, पंढरपूर येथील देवी व विठोबा फोडल्याचे या पोवाड्यात नाही. अल्ली आदिलशहा लहान होता. अफझुलखानाला पाठविणारी वडी साहेबाच, म्हणजे पातशहाजादी कारण होती असे या पोवाड्यात लिहिले आहे. शिवाजीला चोर असे पातशहाजादीने म्हटले असे पोवाड्यात लिहिलेले आहे.

शिवाजी व अफझुलखानाचे संभाषण मोठे मार्मिकपणे या पोवाड्यात वर्णिले आहे.

या पोवाड्यात खानाला उत्तर देताना शिवाजीने हात जोडून 'आज्ञा द्याल तर सांगतो' असे खानाला सांगितले. हे गनिमी काव्याचे स्पष्ट लक्षण आहे. औरंगजेबाचे फर्मान आले तेव्हा शिवबा पायी सहा मैल फर्मानाला चालत सामोरा गेला तोही गनिमी कावाच होता.

अज्ञानदासाने शिवाजीच्या तोंडी घातलेले शद्व 'तू जर भटारनीका छोरा' 'तुमने करना दुकानदारी' वगैरे शब्द उच्चारून त्या तशा वेळी शिवाजी महाराज खानाला दुखवून कार्यनाशाला कारणीभूत होईल असे बोलतील असे सुतराम वाटत नाही.

फतनजीचा हा पोवाडा विश्वसनीय वाटतो व त्यात घडलेल्या गोष्टींचा वृत्तांताशी मेळ बसतो. म्हणून हा पोवाडा विश्वसनीय आहे असे म्हणावे लागते.

शिवरायावरील हा प्रसंग फार मोठ्या काळजीचा होता. या काळापर्यंत शिवाजी हा एखाद्या पुडयाळे गाराप्रमाणे दृढमूल झालेल्या सत्तेशी टक्कर देण्यात मोठी चूक करीत असून शेवटी या झगड्यात त्याला अपयशच येणार अशी भीती महाराष्ट्रातील अनेक सत्ता सावलीत सामावून बसलेल्या, सुखावलेल्या लोकांना होती. 'आदिलशाहीपुढे शिवाजी म्हणजे एक कस्पट असे ते मानीत. परंतु या प्रसंगानंतर फार थोड्या काळात शिवाजीकडे साऱ्या भारताचे लक्ष लागले व काही कर्तृत्व होईल तर हाच एक आशेचा दुवा आहे असे सर्व लोकांना पुरेपूर कळून चुकले. आदिलशाही चालविणारी बडी साहेबीण अफझुलखानाच्या मृत्यूची व स्वारीवरील सर्व काही गमावून बसल्याची बातमी ऐकून खिन्न झाली. तिला आशा होती की, अफझुलखान शिवाजीला जिवंत अगर मेलेला विजापूर दरबारात घेऊन येईल. परंतु अपार नुकसान आणि पराजयाची नामुष्की कळल्यावर ती मनाने खचून जाणे अगदी शक्यच होते.

यामुळे शिवबाचा दबदबा वाढला आणि शिवा मोठा झाला. ही वर्धिष्णू सत्ता आहे असे प्रमत्तांना कळले. याला आळा घातलाच पाहिजे असा मनांत पीळ घेऊन विजापूर दरबार पुन्हा उद्योगाला लागला. तसे करण्याशिवाय त्या दरबाराला दुसरा मार्गच नव्हता.

या विजयानंतर लगेच शिवाजीने मिळालेला पैसा, सामग्री, दारूगोळा, तोफा घेऊन विजापूरच्या आदिलशाहीचे मर्मस्थळ पन्हाळा, २८ नोव्हेंबर

१६५९ रोजी एका धसकीत घेतला. अफझुलखानाची इतीश्री १० नोव्हेंबरला झाली आणि १८ दिवसांनी पन्हाळा सर करून राजे २ डिसेंबरला पन्हाळ्यावर गेले. २८ डिसेंबरला कोल्हापूरजवळ रुस्तुमजामा व फाजलखान यांचा त्यांनी पराभव केला. या तारखा लक्षात घेतल्या म्हणजे आदिलशाही व शिवाजी, जीवन मरणाचाच लढा खेळत होते असे म्हणावे लागते.

प्रतापगडावरच्या या अटीतटीच्या युद्धानंतर प्रतापगडावरील श्रीतुळजाभवानीच्या वास्तव्यामुळेच गडाला राजकारणी व इतर भक्तजनांचे पाय लागत असत. श्रीछत्रपती राजाराम महाराज रायगडावरून निसटले ते प्रतापगडावर येऊन तेथून जिंजीकडे गेले. प्रतापगडाला वेढा देणारा खेळोजी विठोजी भोसले हा शिवाजी महाराजांचा चुलत भाऊ मिर्झाराजा जयसिंगाच्या स्वारीच्या वेळी आला. त्या अगोदर लोधीखान वगैरेंनी रायगड पडल्यावर प्रतापगड घेण्याचे प्रयत्न केले परंतु त्यांना तो गड घेण्यात अपयशच आले.

खेळोजी विठोजी भोसले हा वेरूळला रहात असे. शहाजी निजामशाही सोडून आदिलशाहीत गेला व खेळोजी मोगलांकडे गेला. शहाजहानचा पक्षपाती म्हणून याला पंचहजारी मिळाली. परंतु पुन्हा तो आदिलशाहीत आला. मोगलांनी याची बायको गोदावरी नदीवर स्नान करीत असताना पकडून नेली. त्यावेळी चार लाख रुपये दंड भरून याला तिला सोडवून आणावे लागले. नंतर हा मिर्झाराजाला जाऊन मिळाला व त्याने जावळी घेतली. जयसिंगाने याचेकडून पाचशे पायदळ मागितले होते. (राणा जयसिंग शिवाजी श्री- पगडी पान १३) पुढे औरंगजेबाने याला ठार मारले. (म. यु. च. कोश )

प्रतापगड औरंगजेबाच्या स्वारीचे वेळी घेतला गेला, परंतु गडाच्या किल्लेदाराने फितुरीने तो औरंगजेबाला दिला. मराठ्यांनी ४० दिवसानंतर तो परत रक्तपाताशिवायच घेतला. रामचंद्र निळकंठ आमात्य यांच्या प्रयत्नाने प्रतापगड पुन्हा मराठ्यांच्या हाती आला.

रामचंद्र निळकंठ हा निळो सोनदेव बहुतकर या शिवाजीच्या मित्राचा

मुलगा आणि मोरोपंत पिंगळयांचा जावई होय. इ. स. १६७३ मध्ये निळो सोनदेव मेल्यावर हा आमात्य पदावर चढला. हा अण्णाजी दत्तोच्यानंतर सचीव पदावरही होता. शिवाजीच्या तालमीत तयार झालेल्या या मुत्सद्याने कर्तृत्वाने मराठी राज्याची पडती इमारत तोलून धरली व कर्तृत्व प्रकट केले. औरंगजेबाला याने सात वर्षे कठीण अवस्थेत तोंड दिले. याला हुकूमतपन्हा हे नवे पद राजारामाने दिले होते. औरंगजेबाच्या कपटनितीला याने तसेच उत्तर देऊन मराठ्यांत नवा जोमच निर्माण केला. पुढे हा सन्यास घेऊन राजकारण निवृत्त होऊन राहिला. याची समाधी पन्हाळ-गडावर संभाजी महाराजांच्या समाधी मंदिरापुढे आहे.

पेशवाईत हा गड पेशव्यांकडे होता. राजकीय कैदी या गडावर ठेवले जात. या गडावर महाराष्ट्रातील साडेतीन शहाण्या मुत्सद्यांपैकी अर्धा शहाणा मुत्सद्दी सखारामबापू बोकील हा होता. (सन १७१६ ते २ ऑगस्ट १७८१) पंताजी गोपीनाथ वकील हा शिवाजी महाराजांच्या प्रतापगडच्या युद्धातील याचाच पूर्वज वकील होता. याचे पुतणे महादजी व गंगोपंत यांना शाहू-काका म्हणत असत. रायगड पडल्यावर पकडलेल्या मंडळीत येसूबाई व शाहू यांचेबरोबर हे होते. शाहू यांना काका अशी हाक मारी. सखाराम बापूचा बाप सखाराम भगवंत व भगवंतरावांचा बाप गंगोपंत अशी ही वंशावळ आहे.

सासवडला महादजीपंत पुरंदऱ्यांकडे हा एक शिलेदार होता. बाजीरावाने याला आपणाकडे घेतले व शनिवारवाडा बांधण्याचे काम दिले. ( सन १७३२ ) पुढे हा सरदार झाला. बारभाईच्या कारस्थानात हा प्रमुख होता. याने हुकूम करावे व नाना फडणवीसाने त्याची अंमलबजावणी करावी असे काम चालू लागले.

पुढे हा राघोबादादा यांना आतून मिळून आहे या बाबतीत दोन चिठ्या पकडल्या गेल्या. याला नाना फडणवीसाने तुरुंगात टाकले. तेव्हा हा प्रताप-गडावर एक वर्ष कैदी म्हणून होता. (१७८०) पुढे हा कारस्थाने करतो व प्रतापगडाचे तट उंच नाहीत या कारणामुळे याच्या पायात बेडी घालण्यात

घेऊन याला रायगडावर पाठवून देण्यात आले. तेथे तो श्रावण शु।। १३ शके १७०३ या दिवशी अतिसाराने मेला. हा पंतसचीव व अंताजी माणकेश्वर यांचा व्याही होता.

सन १८१८ मध्ये प्रतापगड बाजीराव पेशव्याने दिलेल्या त्याच्या राज्याबरोबर ब्रिटीशांच्या ताब्यात काही एक कटकट न होता आला. गडावर शिबंदी व तरतूद चांगली होती. तरीही गडाचा ताबा आज्ञेप्रमाणे दिला गेला. सन १८२९ मध्ये महाबळेश्वराचा विभाग प्रतापसिंह छत्रपतींनी मालकम साहेबाला दिला व खंडाळा आणि प्रतापगड हे आपल्या ताब्यात घेतले. सातारचे राज्य १८४८ मध्ये खालसा झाल्यावर प्रतापगड पुन्हा ब्रिटीशांच्या ताब्यात आला.

श्री देवीच्या दागिन्यांची चोरी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाशिवाय प्रतापगडावर विशेष असे काही घडले नाही.

♣ ♣ ♣

घेऊन याला रायगडावर पाठवून देण्यात आले. तेथे तो श्रावण शु।। १३ शके १७०३ या दिवशी अतिसाराने मेला. हा पंतसचीव व अंताजी माणकेश्वर यांचा व्याही होता.

सन १८१८ मध्ये प्रतापगड बाजीराव पेशव्याने दिलेल्या त्याच्या राज्याबरोबर ब्रिटीशांच्या ताब्यात काही एक कटकट न होता आला. गडावर शिबंदी व तरतूद चांगली होती. तरीही गडाचा ताबा आज्ञेप्रमाणे दिला गेला. सन १८२९ मध्ये महाबळेश्वराचा विभाग प्रतापसिंह छत्रपतींनी मालकम साहेबाला दिला व खंडाळा आणि प्रतापगड हे आपल्या ताब्यात घेतले. सातारचे राज्य १८४८ मध्ये खालसा झाल्यावर प्रतापगड पुन्हा ब्रिटीशांच्या ताब्यात आला.

श्री देवीच्या दागिन्यांची चोरी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाशिवाय प्रतापगडावर विशेष असे काही घडले नाही.

♣ ♣ ♣

मुलगा आणि मोरोपंत पिंगळ्यांचा जावई होय. इ. स. १६७३ मध्ये निळो सोनदेव मेल्यावर हा आमात्य पदावर चढला. हा अण्णाजी दत्तोच्यानंतर सचीव पदावरही होता. शिवाजीच्या तालमीत तयार झालेल्या या मुत्सद्याने कर्तृत्वाने मराठी राज्याची पडती इमारत तोलून धरली व कर्तृत्व प्रकट केले. औरंगजेबाला याने सात वर्षे कठीण अवस्थेत तोंड दिले. याला हुकूमतपन्हा हे नवे पद राजारामाने दिले होते. औरंगजेबाच्या कपटनितीला याने तसेच उत्तर देऊन मराठ्यांत नवा जोमच निर्माण केला. पुढे हा सन्यास घेऊन राजकारण निवृत्त होऊन राहिला. याची समाधी पन्हाळ-गडावर संभाजी महाराजांच्या समाधी मंदिरापुढे आहे.

पेशवाईत हा गड पेशव्यांकडे होता. राजकीय कैदी या गडावर ठेवले जात. या गडावर महाराष्ट्रातील साडेतीन शहाण्या मुत्सद्यांपैकी अर्धा शहाणा मुत्सद्दी सखारामबापू बोकील हा होता. (सन १७१६ ते २ ऑगस्ट १७८१) पंताजी गोपीनाथ वकील हा शिवाजी महाराजांच्या प्रतापगडच्या युद्धातील याचाच पूर्वज वकील होता. याचे पुतणे महादजी व गंगोपंत यांना शाहू-काका म्हणत असत. रायगड पडल्यावर पकडलेल्या मंडळीत येसूबाई व शाहू यांचेबरोबर हे होते. शाहू यांना काका अशी हाक मारी. सखाराम बापूचा बाप सखाराम भगवंत व भगवंतरावांचा बाप गंगोपंत अशी ही वंशावळ आहे.

सासवडला महादजीपंत पुरंदऱ्यांकडे हा एक शिलेदार होता. बाजीरावाने याला आपणाकडे घेतले व शनिवारवाडा बांधण्याचे काम दिले. ( सन १७३२ ) पुढे हा सरदार झाला. बारभाईच्या कारस्थानात हा प्रमुख होता. याने हुकूम करावे व नाना फडणवीसाने त्याची अंमलबजावणी करावी असे काम चालू लागले.

पुढे हा राघोबादादा यांना आतून मिळून आहे या बाबतीत दोन चिठ्या पकडल्या गेल्या. याला नाना फडणवीसाने तुरुंगात टाकले. तेव्हा हा प्रताप-गडावर एक वर्ष कैदी म्हणून होता. (१७८०) पुढे हा कारस्थाने करतो व प्रतापगडाचे तट उंच नाहीत या कारणामुळे याच्या पायात बेडी घालण्यात

येऊन याला रायगडावर पाठवून देण्यात आले. तेथे तो श्रावण शु।। १३ शके १७०३ या दिवशी अतिसाराने मेला. हा पंतसचीव व अंताजी माणकेश्वर यांचा व्याही होता.

सन १८१८ मध्ये प्रतापगड बाजीराव पेशव्याने दिलेल्या त्याच्या राज्याबरोबर ब्रिटीशांच्या ताब्यात काही एक कटकट न होता आला. गडावर शिबंदी व तरतूद चांगली होती. तरीही गडाचा ताबा आज्ञेप्रमाणे दिला गेला. सन १८२९ मध्ये महाबळेश्वराचा विभाग प्रतापसिंह छत्रपतींनी मालकम साहेबाला दिला व खंडाळा आणि प्रतापगड हे आपल्या ताब्यात घेतले. सातारचे राज्य १८४८ मध्ये खालसा झाल्यावर प्रतापगड पुन्हा ब्रिटीशांच्या ताब्यात आला.

श्री देवीच्या दागिन्यांची चोरी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाशिवाय प्रतापगडावर विशेष असे काही घडले नाही.

♣ ♣ ♣

# १२ शिवाजीमहाराजांचे मित्र

## कान्होजी नाईकजी जेधे

शिवाजी महाराजांना पतापगडाच्या युद्धप्रसंगात व त्या आधी शहाजी महाराज यांना मदत करणारे कान्होजी नाईकजी जेधे हे आदिलशाहीत फौजेचे अधिकारी होते. ( प. सा. सं. ३०७ ) कान्होजी रणदुल्लाखानाच्या हाताखालचा अधिकारी होता. त्याची हुशारी व लढयातील गनिमीकावा पाहून शहाजी राजांनी त्याला रणदुल्लाखानाकडून मागून घेऊन आपल्या पदरी ठेऊन घेतले. शहाजीचा हा समवयस्क असावा त्या दोघांचा घरोबा, स्नेह जमला. ते जिवाभावाचे मित्र बनले.

याचा कुलकर्णी व हितचिंतक दादाजी नरस प्रभू हा होता. नाईकजी जेधे हाही शूर वीर होता. याला कारीगाव इनाम होता.

दादाजी नरस प्रभू व कान्होजी जेधे यांना आदिलशाही दरबारातून ता. ३०–३–१६४५ रोजी एक ताकीदवजा पत्र आले. ( राजवाडे खंड १५ पान २६७ ) त्या पत्रात शिवाजीला सामील झालात तर गर्दन छाटली जाईल असे बजावलेले होते. कान्होजी हा बाजी फासलकरांचा जावई असल्याने सर्व मावळातील देशमुखात त्याची नाती होती व वचकही होता. शहाजीराजांनी बेलरोटीवर याच्याकडून शपथ घेऊन शिवाजीला सामील होण्याचे वचन घेतले होते, शहाजीबरोबर याचा कुलकर्णी व कान्होजी यांना कैद सोसावी लागली होती. खळद-बेलसरची लढाई याचा मुलगा बाजी यानेच जिंकली, त्याला सर्जेराव हा किताब शिवाजीने दिला. चंद्रराव मोऱ्यांच्या जावळीवरील स्वारीत जेधे, बांदल, सिलीमकर प्रथमच गेले परंतु त्यांना यश आले नाही.

आदिलशाही दरबार जेध्यांना फारच भीत असे असे दिसते. साम-दाम-भेदाने, दरबार कान्होजी जवळ वागे. मात्र त्याला दंड कधीच केला नाही,

कारण दरबारला पूर्णपणे माहीत होते की, दंड केला तर जडच जाईल.

खालील एक जुने पत्र ६ जुलै १६३७ चे कान्होजीला दरबाराकडून आलेले आहे.

कान्होजी याने सद्हेतूने व निष्ठेने पादशाहीसाठी अतिशय कष्ट व उपाय केलेले आहेत. पादशाहीसाठी प्राणार्पण करण्याचेही कष्ट करीत आहे. हे फर्मान पोहचताच रोहीडा किल्ला घेणे व हरामखोरीना दफे करणे, म्हणजे व्यवस्था व उत्कर्ष या बाबतीत हुकूम होईल. ( प. का. सं. २४ ले ५ )

'महेनत करावयाची कोताई न केली यासाठी बहुत कृपा करून मौजे चिखलगांव किल्ले मजदूर हा इनाम दिला आहे. ( प. सा. सं ९ हे पत्र तारीख १५ आक्टोबर १६३७ चे आहे. )

अफझुलखानच्या सैन्यात जमावानिशी सामील व्हावे असा हुकूम कान्होजीला आला ( प. सा. सं ७७४ ). तो हुकूम आल्यावर अफझुलखानानेही त्याला पत्रे पाठवून गोंजारण्याचा प्रयत्न केला.

'तुमचा बाप बिरादर शिवाजीची नोकरी १०–२० वर्षे करीत आहे. तरी आपण आम्हाला मिळावे.' सर्जेराव या कान्होजीच्या मुलाला हे पत्र पाठविलेले आहे. ( प. सा. सं ७८२ )

या पत्रानंतर पत्र लिहून मी काय करावे असे कान्होजीने महाराजांना विचारले.

शिवाजी महाराजांनी कान्होजीला भेटीसाठी बोलाविले तेव्हा तो सिवापट्टणास गेला. एकांती विचार विनिमय होत असतांना, शहाजी महाराजांनी शपथ देऊन महाराजांजवळ पाठविले आहे ते इमान खरे करून मी दाखविणार आहे, असे कान्होजी महाराजांना बोलला. माझे पांच मुलगे व जमाव साहेबांच्या कामात कामास आले तर इनाम खावे तरी कोणी ? असा प्रश्न कान्होजीने महाराजांना विचारला. महाराजांनी इनामाला पक्का

बसेल ते जाईल हे समजूनच या असे सांगितल्यावर मी इनामावर पाणी सोडले असे म्हणून कान्होजीने खरोखरीच पाणी सोडून वतन सोडल्याचे शपथेवर दाखविले. हे झाल्यावर आपली मुले माणसे ढमढेऱ्यांच्या तळेगांवी पाठवावी तेथे दादाजी कृष्ण लोहकरे आपले कारभारी आहेत ते तुमच्या बरोबर शहाजी महाराज कैद झाले तेव्हा कैदेत होते. कर्ते आहेत त्यांच्या जवळ कबीला ठेऊन मग यावे असे महाराजांनी कान्होजीला सांगितले ( जेधेकरांना )

शिवाजी व कान्होजी यांच्या आणाभाका झाल्यावर कान्होजीने सर्व देशमुखांची बैठक बोलाविली व त्यांच्यासमोर आपण वतनावर पाणी सोडल्याचे त्याने सर्व देशमुखांना सांगितले. आपले मुलगे व आपण शिवाजी-साठी प्राणही देण्यास तयार असल्याचे त्याने सर्वांना सांगितले. महाराजांचे महाराष्ट्र राज्य आहे. सर्वांनी हिंमत धरून एकनिष्ठेने सेवा करावी असा सर्व देशमुखांना सल्ला दिला. बांदल, हैबतराव सिलिमकर, पासलकर, मारणे ढमाले, मरळ व शेलार हे शिवाजीच्या बाजूला आले. हा शूर व नेटाचा पुरूष शिवाजीला मिळाल्याने शिवाजीची बाजू बळकट झाली (मध्य-यु-च कोश ) हा सन १६६० मध्ये वारला.

## कृष्णाजी बांदल देशमुख

हिरडस मावळचा हा देशमुख होता. याच्या जवळ १०,००० सैन्य व पायदळ नेहमी खडे असे. हा जुन्या देशमुखांपैकी एक होता. कृष्णाजी बांदलाने या हिरडस मावळच्या देश कुलकर्ण्याला आपलासा करून घेतला होता. बाजी पिलाजी देशपांडे यांचे वडील पिलाजी प्रभु हा मूळचा कुलाबा जिल्ह्यातील नागोठण्याचा प्रधान घराण्यातील होता. पिलाजी नागोठ-ण्याच्या जवळ कोडगांव या गावचा रहिवासी. पोट भरण्यासाठी घाटावर गेल्यावर पिलाजीला लोक नारकर असे रहाण्याच्या गावावरून म्हणू लागले व बाजी प्रभुला सिधकर असे म्हणत असत. रहिवासाचे गांव बदलले म्हणजे आडनाव लोक बदलीत असत. देशपांडे हा त्याचा हुद्दा होता.

कृष्णाजी बांदल इतर देशमुखांकडून दाइते वसूल करी. त्याचा हा गैर-कारभार, त्याच्याजवळ सैन्य असल्याने व बाजी प्रभुच्या शौर्याने कटकट नको म्हणूनच इतर देशमुख मानीत बाजी दांडपट्टा, कराचेली म्हणजे समशेर चालविणारा खराखुरा वीर होता.

कृष्णाजी बांदलाची बायको दिपाई व बाजी यांनी शिवाजी महाराजांना अतिशय मदत केली. काही हक्कावरून जेधे व बांदल यांच्या सहा चकमकी झाल्या त्यात बांदल अयशस्वी ठरले म्हणून कृष्णाजीने बायकोचा पायगुण म्हणून आपल्याच पत्नीच्या पायात बेडी घातली. परंतु पुढे तो विजयी झाल्यानंतर त्याने ती तोडली व दिपाईने विजयी वीर म्हणून त्याला ओवाळले हा जुन्या जमान्यातील व घराण्यातील देशमुख जबरदस्त होता. शहाजी महाराजांनाही तो जुमानीत नसे. त्याने दादोजी कोंडदेवाचा एका लढाईत पराभव केला परंतु दादोजीने त्याला किल्ल्यावर बोलणी करण्यासाठी बोलावून घेऊन तो मरेपर्यंत कैदेत ठेवला असावा. (बांदल घराण्याची तकरीर ए. सं नि. खंड १०)

याचा मुलगा बाजी हा होता दिपाई व बाजी प्रभू सर्व कारभार पहात असत. या बाजीने शहाजी व पठाण यांची विजापुरातील लढाई, खळद-बेलसरची लढाई, जावळीचा पहिला हल्ला यात भाग घेतला होता. बहुधा जावळीच्या या हल्ल्यात तो कामी आला असावा कारण जावळीच्या दुसऱ्या हल्ल्याच्या वेळी रायाजी हा त्याचा मुलगा हजर होता. प्रतापगडाच्या युद्धात रायाजी स्वत. आपली आई दिपाई व सरनौबत बाजी प्रभू यासह प्रतापगडाच्या खाली आपले सैन्य घेऊन दबा धरून बसलेले होते. शाहिस्तेखानाची स्वारी, पन्हाळगडचा वेढा, पावन खिंडीचे युद्ध, पुरंदरचा वेढा, आग्र्याची महाराजांची भेट, यावेळी हा हजर होता. राज्याभिषेकानंतर हा राघो बल्लाळ अत्रे यांच्या बरोबर असे. एका स्वारीत तो मरण पावला.

रायाजीचा चुलत भाऊ कोयाजी त्याने शाहिस्ताखानाच्या वेळी लाल महालात शिरून राजांबरोबर मोगल लोकांवर वार केले. त्याला चार

वार लागले होते. महाराजांनी त्याला मौजे आळंदेस नूतन इनाम जमीन रक्कम टक्के १७।। दिली. (प. सा. सं. २६७०)

वाजीप्रभूच्या हातात बांदलांचा कारभार आल्यावर त्याने शिवाजी महाराजांना फार मोठी मदत केली व शेवटी आत्मार्पणही केले. दिपाई बांदलीण व बाजीप्रभु यांनी अफझुलखानाच्या प्रसंगात फारच मोठी कामगिरी बजावली आहे. महाराज आग्र्याला गेले असताना दिपाई जिजा मातोश्रीं-जवळ राहिली होती. (बांदल तकरीर) नंतर दिपाईला शिवाजी महाराजांनी साडीचोळीसाठी मौजे पऱ्हेव खुर्द हे गाव इनाम दिलेले होते.

रायाजी नाईक व बाजीप्रभु हे विशाळगडास पऱ्हाळ्याहून महाराज जात असताना त्यांच्याबरोबर होते. रायाजी हा अज्ञान होता म्हणून बाजी-प्रभुने त्याला बरोबर न घेण्याची आज्ञा महाराजांकडून घेतली होती. पावन खिंडीत येऊन महाराजांनी पडलेल्या लोकांना पाहिले. रायाजी व त्याच्या लोकांनी पडलेल्या बाजीप्रभु व इतर लोकास विल्हे लाविले. त्यांचे जळीत वगैरे केले. यावेळी बाजीप्रभु बांदलाचा सरनौबत होता. विशाळगडावरून परत येताना महाराज मुक्काम कसबे सिंद येथे बाजीप्रभु यांचे घरी गेले. त्यांच्या घरातील बायका व मुले व भाऊबंद यांचे महाराजांनी समाधान केले. (बांदल घराण्याची तकरीर) बाजीप्रभुच्या मुलाचे नाव महादजी असे होते. सिंदगाव भोरजवळ आहे.

कृष्णाजी बांदल हा कदीम (जुना) देशमुख होता. तो शूर होता, आग्रही निग्रही होता. आदिलशाही अगर त्या अगोदरच्या सत्तांना तो जुमानीत नसे. कोणी अधिकारीही त्याच्या वाटेस जात नसत. कारण त्याची कराचेली (तरवार) तिखट होती व तो केव्हा काय करील हे कळण्यासारखे नव्हते.

जेधे व बांदल हे शिवाजीबरोबर अफझुलखान प्रकरणात हनुमंत अंगद (पोवाडा) याप्रमाणे असले तरी जेध्यांची निष्ठा आणि बांदलांची निष्ठा यात फार मोठे अंतर होते. कृष्णाजी बांदल तुरुंगात मेला हे खरे नसावे.

तो एखाद्या लढाईतच पडला असावा. त्याचा मुलगा बाजी व नातू रायाजी यांचा सांभाळ कृष्णाजी बांदलांची बायको दिपाईने केला. या बाईने आपल्या मुलांच्या वाटण्याही करून दिलेल्या होत्या. ( बांदल तकरीर )

## जिऊ महाला

शिवाजी महाराजांचा शरीररक्षक. कोंढीवली गावचा न्हावी कुळातील होता. आडनावाने तो सकपाळ. कोंढीवली हे गाव जोरखोऱ्यात माणगाव तालुक्यातील आहे. सडपातळ अंगाचा परंतु विलक्षण चपळ व उच निच भरदार बांध्याचा असा जिऊ महाला अनेक वर्षे शिवाजीचा शरीररक्षक म्हणून होता. कोंढीवली हे गाव वाई खोऱ्यांत सिगाण डोहाजवळही आहे

प्रतापगडच्या युद्ध प्रसंगात भेटीच्या वेळी महाराजांबरोबर हा होता. त्याची निवड शिवाजी महाराजांनी विचारपूर्वकच केली होती. अफझुलखानाने आपल्या डाव्या बगलेत राजांचे शीर दाबून धरले व वारही केला. त्यावेळी महाराजांनी वाघनखे चालवून खानाचा कोथळा बाहेर काढला तेव्हा काखेची पकड ढिली पडली व मुंडी हसडून घेऊन महाराजांनी भेटीच्या चौथऱ्याखाली उडी मारून ते मंडपाबाहेर आले तेव्हा सय्यद बंडा याने महाराजांवर चार वार केले. परंतु महाराजांनी कातर करून ते चुकविले. सय्यद बंडाने पाचवा वार महाराजांवर उगारला व तो मर्मभेदी होणार होता इतक्यात जिऊ महाला धावत येऊन त्याने सय्यद बंडाच्या उगारलेल्या हातावर खांद्याजवळच फिरंगेचा वार करून तो मुळातच छाटून टाकला. 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' अशी एक म्हण मराठी भाषेत तेव्हापासून पडलेली आहे. जिवा महाल्याने शिवाजीचा प्राण वाचविला व सय्यद बंडाला ठार मारले.

जिवा महाला हुकूम मानीतनासा झाला म्हणून शिवाजीने हुकमाची अमर्यादा केल्याने त्याला कामावरून दूर केले. ( मंडळ पंचम सम्मेलन वृत्त पान १६।१९ ) याला त्यावेळी काही इनाम जमीन दिलेली होती व त्याचे नांव सर्वतोमुखी झाले होते. हा महाराजांना फार मानी.

नोकरीवरून कमी केल्यावरही तो शिवाजी महाराजांजवळ अत्यंत आदबीने वागे.

## संभाजी कावजी

शिवाजीच्या नोकरीत हा भालदार म्हणून शिरला. पुढे शिवाजीचा शरीर-रक्षक झाला. विश्वासू म्हणून शिवाजी याला मान देत असे. बळकट घोडे उचलून धरण्याचे याचे बळ होते. प्रतापगडच्या युद्धात खानाच्या भेटीला जाताना हा व जिऊ महाला यांना बरोबर विश्वासू म्हणून घेऊन महाराज भेटीला गेले. महाराजांवर सय्यद वार करू लागल्यावर हा आपल्या पट्टयासह सय्यदकडे धावला परंतु त्या अगोदरच जिऊ महाल्याने सय्यदचा हात तोडून ठार मारले होते. इतक्यात पालखीचे अकरा भोई खानाजवळ आले व त्याला पालखीत घालून ते जाऊ लागले हे पहाताक्षणी संभाजी तिकडे धावला व पट्टयाने सपासप वार करून त्याने त्या आकरा भोयांच्या ढोण्या शिरा पोटऱ्यावर वार करून तोडल्या व त्यांना आडवे पाडून पालखी पाडली. खान जिवंत असावा कारण पालखी पाडल्याबरोबर त्याने खानाचे शीर कापले व तो शिवाजीकडे पळत गेला. नंतर जिऊ महाला, शिवाजी महाराज व संभाजी कावजी किल्यात आले. त्याची चपळाई व त्याने केलेल्या कामाबाबत महाराजांनी त्याची मोठी प्रशंसा केली.

मराठयांच्या चाकण येथील मुख्य पागेवर हा मुख्य म्हणून या वेळीच नेमला गेला. परंतु याच्या कारभारातील काही बाबींवरून तो महाराजांच्या मर्जीतून उतरला.

शाहिस्तेखानाने चाकण येथे याची अचाट शक्ति पाहून आश्चर्योद्गार काढले. पुढे शाहिस्तेखानाने चाकण सर केल्यावर याला चाकणचा हवालदार नेमले.

सन १६६९ मध्ये मराठयांची स्वारी चाकणवर झाली. तेव्हा मराठयांनी चाकण साफ लुटले. त्या लढाईत हा मारला गेला. शिवाजीच्या लोकांनी यास ठार मारला असेही म्हणतात. ( म. यु. च. को. )

# पासलकर देशमुख

प्रतापगडच्या युद्धात पासलकरांचा वाटा मोठा होता. मुसेखोऱ्याचा हा देशमुख हा मावळातील देशमुखात मोठा प्रसिद्ध होता. तो वतनी तंटे तोडण्यात मोठा पटाईत होता व त्याचे निकाल सर्वत्र मानले जात असत. फलटणचा वणगोजो नाईक निंवाळकर हा याचा जिवाभावाचा दोस्त होता तो याची मर्जी सांभाळून असे. नेहमी वणगोजीला जामीन रहात असे. इतर देशमुखांनाही जामीन राही. बाजी हा शिवाजीच्या जिगर दोस्तातील अग्रेसर होता. सन १६६० साली बाजी पासलकर वाडीच्या सावंतावर शिवाजीच्या सांगण्यावरून स्वारी घेऊन गेला. त्यावेळचा याचा पराक्रम फारच मोठा होता. १६४० ते १७१७ पर्यंत याचे नाव वारंवार येते. यानंतर तुळाजी व राणोजी यांची नावे येतात.

प्रतापगडच्या युद्धात हा जावळी व पारगावच्या मध्ये होता. त्याच्या पश्चिमेस जेधे व नंतर अनाजी रंगनाथ होते. यावेळचा याचा पराक्रम फारच नावाजण्यासारखा होता. छावणीच्या टेपाखाली हा दबा धरून बसला होता. याच्यापुढे दक्षिणेला बांदलांचे सैन्य, बाजी प्रभू व सरनोबत यांचे हाताखाली होते. पश्चिमेस हिरोजी फर्जद, कान्होजी जेधे व अनाजी रंगनाथ आणि दक्षिणेस बाजी पासलकर असा गराडा घालून ही मंडळी दबा धरून बसलेली होती.

पासलकर मुसेखोऱ्यात प्राचीन कालापासून देशमुख होते. विठोजी यशवंतराव यांचा भाऊ बाळाजी विठोजीजवळ भांडला व त्याने शिक्का आपल्या हाती घेतला. बाजी यशवंतराव हा साठ वर्षांचा वीर शिवाजी महाराजांकडे सेवा करीत होता. महाराजांनी या भांडणाचा निकाल बाजी यशवंतरावांच्या बाजूने दिला व देशमुखी बाजीची झाली. बाजी कावजी बरोबर खळद-बेलसरच्या मोहिमेवर गेला व वतन कावजी याचे हाती दिले. बाजी त्या मोहिमेत ठार झाला. तेव्हा कृष्णाजी यशवंतरावांना महाराजांनी देशमुखी दिली व नाव सवाई बाजी ठेवले.

(प. सं. २५-५९) हा सवाई बाजीच पुढे महाराजांच्या उपयोगी पडलेला दिसतो.

गोदाजी पासलकर या नावाच्या इसमाने अली आदिलशहाकडून नोकरी व सेवा करण्याच्या करारावर सन १६६० साली मौजे सायतन हाशीव व मौजे वरणगाव व जावळी या गावांतील शंभर व ऐंशी बिघे शेतजमीन इनाम करून मागितली आहे. ही जमीन पूर्वीच्या भोगवटयाप्रमाणे मला द्यावी अशी त्याने दरबारला विनंती केलेली आहे. सलाबतखानाबरोबर मीही स्वारीला जाईन असे तो म्हणतो पादशहाने त्याची सर्व मागणी मंजूर केली व नवी सनदापत्रे दिली. वंशपरंपरेप्रमाणे हे इनाम पासलकरांस मिळाले होते. (प. स. २६३९)

बाजी पासलकर प्रतापगडाच्या युद्धाच्यावेळी होता. तो जवान होता. म्हणजे ज्याला सवाईबाजी असे नाव शिवाजी महाराजांनी ठेवले तो कृष्णजी यशवंतराव हाच बाजी पासलकर ठरतो. या सर्व देशमुखांना विजापूर दरबार व शिवाजी महाराज वतने देत परंतु त्या वतनांचा भोगवटा दोन सत्तांच्या भानगडीत या देशमुखांना क्वचितच मिळे.

बाजी वृद्ध होऊन १७१७ सालापर्यंत होता हे खरे वाटत नाही. बाजी पासलकराची समाधी कुलाबा जिल्ह्यातील अवचितगड किल्ल्यावर दाखवितात. त्याचा दरसाल उत्सवही होतो.

कुलाबा जिल्ह्यातील अवचितगड किल्ल्यावर बाजी पासलकराची समाधी प्रसिद्ध असून तेथे त्याचा पुतळाही आहे. समाधीसमोर दिवा लावण्याची व्यवस्था असून पिंगळसई या गावचे लोकही दरसाल हा उत्सव करतात.

अवचितगडावरील हल्ल्यात बाजी पासलकर पडला किंवा काय हे सांगता येत नाही. मात्र ही समाधी बाजी पासलकर याचीच आहे याबद्दल पूर्वीपार माहिती व दंतकथा मेढे व पिंगळसई गावातून ऐकावयास मिळतात.

# हिरोजी फर्जंद

या नेकजात इमानी सेवकाचे नाव मराठी इतिहासात शिवाजीच्या नावाशी अत्यंत निगडीत आहे. दिसण्यात तंतोतंत शिवाजी असे याचे रूप, शरीर सौष्ठव व शरीराची ठेवण होती. हिरोजीला आणखी दोन भाऊ होते. कोंडाजी फर्जंद व येसाजी फर्जंद या दोन भावांची नावेही इतिहासाला पूर्ण परिचित अशीच आहेत. कोंडोजी फर्जंदांचे नाव हेरखात्यामुळे प्रसिद्ध तर येसाजी बुद्धिमान म्हणून राजारामाच्या काळात प्रसिद्ध झाला. जंजिऱ्याच्या सिद्दीकडे जंजिरा किल्ल्यात कोंडाजी वेश पालटून बराच काळ राहिला होता. पन्हाळा सर करताना आतील शिबंदीला दाद न लागू देता त्याने व अण्णाजी दत्तो यांनी तो गड सर करून पन्हाळगडकरांना चकितच केले होते.

फर्जंद बंधू हे शहाजी महाराजांचे लेकावळे असे बोलले व मानले जाते. हिरोजी हा तर सावलीप्रमाणे शिवाजी महाराजांच्या बरोबर नेहमीच असे.

प्रतापगडच्या युद्धात हिरोजीला मुख्य दरवाज्याखाली दरवाजाच्या ओहोळाचे बाजूला मुद्दाम खणून तयार केलेल्या जागी महाराजांनी चाळीस निवडक जवानांसह ठेवले होते. त्या जागी हिरोजी लपून राहिला होता. तेथून भेटीच्या जागेवरील हालचाली स्पष्ट दिसत होत्या परंतु तो व त्याचे वीर कोणाल्हाही दिसत नव्हते. त्यांच्याकडे पारगावच्या सैन्यावर हल्ला करणारांना मदत करण्याची कामगिरी होती. भेटीच्या जागी जरूरी पडली तर त्याला जावयाचे होते. ती वेळ न आल्याने जनीच्या टेपावरील खानाच्या १५०० लोकांवर त्याने हल्ला केला. पारच्या शत्रू सैन्यावर चालून जाऊन त्याने त्यांची दाणादाण केली.

हिरोजीची कामगिरी आग्रा भेटीच्या वेळी फारच मोलाची अशी झाली. शिवबावर भयंकर प्रसंग ओढवलेला त्याने जाणला, आणि औरंगजेबाने शिवाजीच्या गोटातच कायम ठेवलेला मदारी मेहेतर फरास याला वळविण्याची मोठी मोलाची कामगिरी याने केली. राजे सिंहासनावर बसले तर राज्याभिषेकाचेवेळी मदारीच्या तळहातावर प्रथम सोन्याच्या विष्णूमूर्तीची

पूजा करण्याची मदारीची अट तो मुसलमान असूनही त्याने कबूल केली व राजांना संकटातून सहीसलामत सोडविले. अद्याप या मदारीचा दर्गा राय-गडावर संभाजीच्या लाटेजवळ (मल्लखांबाजवळ) आहे. त्याला व त्याच्या वंशजांना तक्ताची पूजा व सर्वाधिकार राजांनी दिलेले आजही चालू आहेत.

हिरोजी शिवाजी महाराजांनंतर संभाजी राजांबरोबरही होता. पन्हाळ-गडचा किल्लेदार म्हणून तो असताना राजांच्या मृत्यूची बातमी घेऊन आलेल्या जासुदाची पत्राची बंगी संभाजीच्या हाती पडू नये असा प्रयत्न तो करीत असताना संभाजीने जासुदाची बंगी कोल्हापूरकडील पन्हाळगडच्या दरवाजातच घेतली. (हा दरवाजा आता काढून टाकण्यात आला आहे.) संभाजी यावेळी नजर कैदेत होता, यामुळे हिरोजी भीती घेऊन गोव्याकडे पळून गेला. परंतु संभाजीराजांनी अभयदान दिल्यावर परत महा-राष्ट्रात आला.

औरंगजेबाचा मुलगा अकबर याच्या तैनातीच्या व्यवस्थेसाठी नेताजी पालकराबरोबर हा पाच्छापूर (सुधागड) येथे होता.

या थोर देशभक्ताचा अंत हृदयद्रावक झाला. सन १६८१ च्या ऑगस्ट महिन्यात संभाजी राजांचा मुक्काम जांभूळपाडा-परळी या गावच्या मध्ये कुलाबा जिल्ह्यात अंबानदीच्या तीरावर पडलेला असताना संभाजी राजांना विषप्रयोग करण्याचा कट रचल्याबद्दल याला हत्तीच्या पायाखाली तुडवून मारण्यात आले. त्याच्याबरोबर कटांतील इतर म्हणजे श्री. बाळाजी आवजी चिटणीस, श्री अण्णाजी दत्तो, श्री. सोमाजी दत्तो यांना मरेमरेपर्यंत मार देऊन शेवटी हत्तीच्या पायाशी बांधून संभाजीने ठार मारले. तो काळ भाद्रपद शके १६०३ दुर्मतीनाम संवत्सरे म्हणजेच ऑगष्ट सन १६८१ हा होता.

## नेताजी पालकर

नेताजी पालकर यांचा जन्म खंडोबाची पाली, जि. सातारा येथे झाला. पालकर हे आडनाव याला चौक जि. कुलाबा या गावी तो लहानाचा मोठा होत असताना मिळाले. नेताजी हा माणकोजी दहातोंडयाच्या मृत्यूनंतर

सन १६४३ साली झाल्याने शिवाजीच्या घोडदळाचा सरनौबत झाला. (प. सा. सं. ९५४) हा लहानपणापासून आपल्या मातोश्री बरोबर चौकला होता. सरनौबत होण्याच्या अगोदर सन १६४० साली खंडोबाच्या पालीस आला असावा. अनेक शिलेदारांवर याचे वजन होते. एकदा मोगल पाठलाग करीत असताना याने ५० मैलांची दौड केली होती. रोज ४० मैल हा दौड करीत असे. (प. सा. सं. ९२३)

शत्रूशी गनीमी काव्याने लढणारा म्हणून हा प्रसिद्ध होता. दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत स्वाऱ्या करून हा खंडणी व लूट घेऊन नियमित परत येत असे. अफझुलखानाच्या प्रतापगडच्या प्रसंगात हा शिवाजीच्या सैन्यापैकी घोडदळावर सरनौबत म्हणून कुडेसर पठारावर दबा धरून होता. अनेक प्रसंगात सैन्य पिछाडी सांभाळण्याचे काम हा यशस्वीरित्या करीत असे.

पांच हजार घोडदळासह प्रतापगडच्या युद्धात हा कुडेसरच्या पठारावर दबा धरून असताना त्याच्याबरोबर रघुनाथ बल्लाळ सबनीस हा होता. जावळी सबनीसाने पहिल्या हल्ल्यात सर केल्यावर नेताजीने प्रथम वाई, पार आणि जावळी या खानाच्या तळातील दळणवळण तोडले व तो वीस बावीस मैलावर डोंगरातून सरळ निघून जाऊन त्याने वाईवर हल्ला केला. खानाची वाईची फौज वीस पंचवीस हजार होती. मुसलमान सेनापतीच्या हाताखाली तेथे भोसले, जगताप, घाटगे, इंगळे, पांढरे, बेंदरे, काटे, खोपडे यांच्याही फौजा होत्या.

सायंकाळी पांच वाजल्या नंतर इशाऱ्याची तोफ ऐकल्यावर तो जवळच्या वाटेने चार तासाभरात वाईला आला. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्याने एकदम चारी बाजूंनी येऊन लगट केली व वाईचे सैन्य पार पिटाळून लावले.

महाराजांनी आग्रा येथे जाताना मोरोपंत पिंगळे यांचे बरोबर नेताजीला महाराष्ट्रातच ठेवले होते. तहाप्रमाणे तो संभाजी बरोबरही औरंगाबादला गेला होता. नेताजीला प्रति शिवाजी म्हटले जाई.

शिवाजीचा व नेताजीचा बेबनाव झाला व तो विजापूरच्या नोकरीत गेला. नंतर तो मोगलांकडे गेला, त्याला कैद करून दिल्लीस पाठविण्यात आले.

(प. सा. सं. १६६६) त्याला व त्याच्या दोहोपैकी एका बायकोला बाटविण्यात आले व एक मुलासह तो महाराष्ट्रात आला. दिल्लीस त्याला बाटविण्यात येऊन त्याचे नाव मुहमंद कुलीखान असे ठेवले गेले. एप्रिल सन १६६६ मध्ये हा प्रकार झाला.

औरंगजेबाच्या दरबारातून निघून परत हा शिवाजीमहाराजांकडे आला. नऊ वर्षे मुसलमान राहून नंतर याने पुन्हा हिंदुधर्माची दीक्षा घेतली व हा हिंदू झाला. रायगडवर जिजामातेच्या प्रयत्नाने तो शुद्ध केला गेला. (१९-६-१६७६) (प. सा. १८६३) शिवाजी महाराजांच्या निधनानंतर हा संभाजी महाराजांकडे होता. औरंगजेबाचा मुलगा अकबर याची व्यवस्था ठेवण्यासाठी हिरोजीफर्जंद व हा पाच्छापूरास होता. बागलाणांत सन १६८१ मध्ये हा स्वारीवर आल्याचा उल्लेख आहे.

याचे दोन वंश सध्या आहेत. एक निजामाच्या राज्यांत सध्याच्या आंध्र॰ मध्ये मुसलमान व महाराष्ट्रात हिंदु वंश आहे.

शिवाजी महाराजांच्या सेवेत हा अत्यंत वरच्या दर्जाचा असताना आदिलशाहीकडे का गेला व नंतर औरंगजेबाकडे कसा व का गेला या बाबत विश्वसनीय पुरावे मिळत नाहीत. तरीही हा अत्यंत थोर लढवय्या व आपसातील तंटे तोडण्यात पटाईत असा मुत्सद्दीही होता. वृद्धापकाळामुळे यास मरण आले असावे.

## मोरो त्रिंबक पिंगळे

शिवाजी महाराजांचे मुख्य प्रधान व अत्यंत जिवाभावाचे मित्र त्र्यंबकसुत मोरेश्वर. आपल्या शिक्यांत बापाचे नाव त्र्यंबक असे देतात. सन १६५३ मध्ये शहाजी महाराजांनी शिवाजीबरोबर दिलेल्या जिवाभावाच्या लोकांपैकी हा एक तरूण लढवय्या होता. याचे वडील शहाजी महाराजांकडे नोकरी करीत असत. ते कर्नाटकातील शहाजी राजांच्या जहागीरीवर बेंगरूळात होते. मोरोपंतांना ३ एप्रील सन १६६२ रोजी पेशवेपदावर शिवाजी महाराजांनी नेमले. (शकावली) सन १६५३

मधील सखोभिकाजीचे पत्रात मोरोपंतांचा उल्लेख आहे. (प.सा.सं. २५९०) हे पत्र १६५३ चे आहे व व त्यात मोरोपंतांना पेशवे असे संबोधिले आहे. परंतु यावेळी मोरोपंत पेशवे नव्हते. शामराज निळकंठ, श्री. नरहरी आनंदराव यानंतर चैत्र व॥ १० शके १५८४ गुरुवारी मोरोपंतांना पेशवाई मिळाली. ( चरित्र प्रदीप २०५ )

पेशवाई मिळण्याच्या अगोदर मोरोपंतांनी पुरंदर, प्रतापगड वगैरे किल्ले बांधले. पुरंदरचे हे कारभारी होते. अफझलखानाच्या स्वरीच्यावेळी पारच्या सैन्यावर तुटून पडून मोरोपंतांनी त्यांना धूळ चारली. सिद्दी जोहारच्या स्वारीच्यावेळी मुलखाचे संरक्षण करताना यांनी मोठी निष्ठा व कर्तबगारी दाखविली होती.

महाराज दिल्लीस गेले तेव्हा यांच्यासह तीन इसमांवर सर्व राज्य सांभाळण्याचा भार टाकून गेले होते. शिवाजी महाराज पकडले गेले हे कळल्यावर याने दिलेले गड, किल्ले पुन्हा जिंकून घेण्याचा उद्योग सुरू केला. २५ आक्टोबर १६७० या दिवशी मोरोपंतांनी त्र्यंबकचा किल्ला घेतला, पट्टा, औंढा हे किल्ले याने घेतले. साल्हेर किल्यावर मोगली फौज आली असताना वीस हजार फौजेनिशी महाबतखान व दिलेरखान यांना त्याने पिटाळून लावले. हा पराक्रम फेब्रुवारी सन १६७२ मधील आहे. साल्हेर, मुल्हेर घेतल्यावर कोळवणांत उतरून याने रामनगर ६ जून १६७२ व जव्हार ता. १९ रोजी जिंकले. सिद्दी हिलाल व जगदेवराव जाधव हे वणीदिंडोरी व नाशिकचे ठाणेदार पराभूत केले. ते दोघेही पुढे शिवाजीला मिळाले.

कर्नाटकच्या स्वारीवर जाताना याच्याकडे कुलमुकत्यारी दिली गेली. यावेळी अण्णाजी दत्तो व यांच्यात वाद उत्पन्न झाला होता. सन १६७७ मधील ही गोष्ट आहे. पट्टाकिल्ल्यासभोवारचे सर्व २७ किल्ले याला हुकूम झाल्याबरोबर याने घेतले. जमीनधारा पद्धती व कायदे यानेच केले. हा शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर सन १६८० मध्ये आक्टोबरात वारला. ( चरित्रकोश )

# अनाजी रंगनाथ मलकरे

हा रंगभट मळेकराचा मुलगा. फुलाई ही रंगभटाची आई. मोरोतानदेव नावाचा एक जबरदस्त माणूस पुणे खेड या परिसरात स्वतंत्रासारखा वावरत होता. शहाजी महाराजांनी पुणे परगण्याचा पोट मोकासा शिवाजी महाराजांना दिल्यावर श्री. दादोजी कोंडदेव व मोरोतानदेवाचे कधीच पटले नाही. त्या अगोदर मुरार जगदेवरावाने याचा पुण्याचा वाडा लुटून टाकलेला होता. आनाजी रगनाथाच्या आजीने याला फार काळ लपवून ठेवला होता. शेवटी अनाजीने शिवाजी महाराजांच्या पायावर याला घातला व त्याला क्षमा मिळून त्याचे देशपांडेपण त्याला दिले गेले.

आण्णाजी रंगनाथ, मालकरे या गावचा राहणारा व तेथील अधिकारी होता. संभाजी कावजी शास्ताखानला मिळाल्यावर तो खानाच्या वतीने या मालकरे गावी ठाण मांडून बसला. अनाजीला हा अपमान वाटला असावा. तो महाराजांचा भक्त असल्याने त्याने महाराजांजवळून संभाजी कावजीवर छापा घालण्यासाठी सैन्य मागून घेऊन मालकरे गावावर छापा घातला. कडतोजी गुजर हा या लढाईत होता. त्याने एकाएकी छापा घालून संभाजी कावजीला गारद केले. कडतोजी हाच प्रतापराव गुजर होय.

अनाजी रंगनाथाचा मुलगा खंडो अनाजी ह्याने ९१ कलमी बखरीची नक्कल केलेली आहे त्यात ह्या युद्धाची हकीगत आहे.

अनाजी रंगनाथ प्रतापगडाच्या युद्धात कुंभरोशी या सध्याच्या गावाच्या जरा वर आडरानात आपले सैन्य घेऊन बसला होता. बांदलांचा सरनोबत बाजीप्रभू व हा एकदम हल्ला करून जनीच्या टेपावरच्या १५०० लोकांवर तुटून पडले. त्याच्या मागून जेधे, सिलीमकर हे भराभर येऊन जनीच्या टेपावरचे सर्व सैन्य त्यांनी गारद केले व राजांना पहिला विजय मिळाला.

अनाजी रंगनाथ हा शिवाजी महाराजांचा अत्यंत विश्वासू लोकांपैकी एक होता. त्याला महाराज मान देत. हे मोरो तानदेव याला त्याच्या मार्फत मिळालेल्या माफीवरून सिद्ध होते.

१०१९४६ 

किशोर ४४३

# शत्रू पक्षातील मराठे सरदार

खानाच्या सैन्यात जमलेले मराठे, देशमुख शिवाजी व शहाजीचे शत्रू म्हणूनच जमलेले होते. त्यांतील बाजीराजे घोरपडे हा शहाजी व शिवाजी या दोघांचाही कट्टा द्वेष्टा होता. या बाजीराजे घोरपड्याबद्दल काही माहिती यापूर्वी आलेली आहे. परंतु भोसले व घोरपडे यांचे भांडण काही पिढ्यांपासूनचे होते. याबद्दल जास्त माहिती देणे जरूरीचे वाटते.

बाजीराजे घोरपडे (१६०५ मृत्यू १६६४) हा मुधोळचा जहागिरदार. मेवाडचा राजा अजयसिंह याचा मुलगा सज्जनसिंह राज्य मिळत नाही हे पाहून महाराष्ट्रात आला. हाच घोरपडे व भोसले घराण्याचा मूळ पुरुष होय. त्याच्या वंशात भैरवजी किंवा भोसाजी या नावाचा एक शूर वीर निपजला. त्याच्या कुळीला भोसले हे नांव आले. याच वंशातील कर्णसिंह याचा मुलगा भीमसिंह याने घोरपडीच्या साहाय्याने कोकणांतील एक गड सर केला म्हणून भीमसिंहाच्या कुळीला घोरपडे हे आडनांव पडले. हा किताब होता. भीमसिंह घोरपडे घराण्याचा मूळ पुरुष तर शुभकृष्ण शिवाजी महाराजांच्या घराण्याचा मूळ पुरुष होता. (चरित्र कोश ५४८)

घोरपडे यांना वाई, मुधोळ वगैरे जहागिऱ्या मिळाल्या तर शहाजी महाराजांना पुणे, सुपे, इंदापूरची जहागिरी निजामशाहीतून मिळाली. सन १५६४ साली पहिला आदीलशहा यूसफ याने ही जहागिरी घोरपड्यांना दिली होती. सनदा मिळविणारा चोल राजा कर्वसिंह याला बहामनी राज्याच्या पूर्व काळातही ही जहागिरी होतीच. त्यांत काही मुलखांची व अधिकाऱ्यांची भर घालून आदीलशहाने घोरपड्यांना आपले जहागिरदार केले. सनदेत पूर्वीपासून ही जहागिर तुमचेकडे चालू आहे असे म्हटले आहे. (मुधोळ. इ–प.ले. १०)

भोसले व घोरपडे यांच्या जहागिरीच्या हद्दी एकमेकांना भिडल्या. त्या हद्दी व अधिकार यांमुळे वारंवार झगडे होत. समशेरीला समशेर भिडे. घोरपड्यांची ही जहागिरी दुसऱ्या इब्राहिम आदिलशहाने ९ आक्टोबर

१५९८ रोजी प्रतापसिंह पिलाजी घोरपडे याला बक्षिस दिली होती. (प. सा. सं. २३३७)

शहाजी महाराज आदीलशाहीत आल्यावर या जहागिरीतील ती पूर्वापारची म्हणून निम्मा हिस्सा पादशहाकडे मागितला ता. १५ नोव्हेंबर सन १६३७ रोजी शहाजी व त्याच्या वंशातील इतर लोकांना या जहागिरीचा निम्मा हिस्सा देण्याचा हुकूम देऊन तंटयाच्या बाबतीत निकाल दिलेला आहे. (प. सा. सं २४५८)

या निकालामुळे घोरपडे व भोसले यांच्यातील भाऊबंदकीची भांडणे वाढली. शहाजीचे तेज आदिलशाही दरबारात वाढते होते. बाजी घोरपडे शहाजीच्या बाबतीत पातशहाचे मन नेहमी कलुशित करीतच होता. जिंजीच्या वेढयात शहाजी गुंतला असताना २५ जुलै १६४८ रोजी बाजी घोरपडे व इतर सरदारांनी शहाजीला पातशाही हुकूमाने पकडले व त्याचा छळ आणि अपमान केला. कैदेतूनच शहाजीला बाजी घोरपडे व अफझलखान यांनी १० मार्च १६४९ रोजी विजापुरात आणले.

प्रतापगडच्या युद्धात बाजी घोरपडे मुद्दामच आला होता. या स्वारीचे सेनापतीत्व मिळावे म्हणून त्याने खटपट केलेली दिसते. तरीही दरबारने अफझलखान या रणदुल्लाखानाच्या खिजमतगाराला या स्वारीचा मुख्य नेमले. रणदुल्लाखान निपुत्रीक होता व त्याने अफजलला मान सन्मान मिळवून दिलेला होता (जेधे करीना) व आपली सर्व इस्टेट मृत्यूनंतर दिलेली होती.

या प्रतापगडच्या युद्धात बाजी घोरपडे म्हणजे खानाचा मुख्य सल्लागार बनला होता. तो दूमदारीस होता. (जेधे करीना). पळापळीत तीसचाळीस स्वारांसह त्याने पळ काढून आपला जीव वाचविला. बाजी विलक्षण शौर्यशाली, बेडर व रणात ठाम उभा राहणारा होता. त्यालाही जीव घेऊन पळावे लागले.

सन १६६० साली तो कोकणात जाण्याच्या बेतात असतानाच मुधोळावर छापा घालून धाडसाने शिवाजीने त्याला मारले. खवासखान कोकणच्या

स्वारीवर शिवाजी महाराजांच्या मुलखात धुमाकूळ घालण्यासाठी जाणार होता. खजिना, रसद, फौज पोहोचविण्याची कामगिरी दरबाराने बाजीला दिली होती. बाजीच्या मृत्युनंतर शिवाजीने शहाजीला लिहिलेले एक पत्र प्रसिद्ध आहे. त्यांत मुधोळवर स्वारी करून आपण बाजीचा काटा काढल्याची हकिगत शिवाजीने लिहिलेली आहे. त्या पत्राच्या पहिल्या चार सहा ओळीवरून शहाजीराजांनी ही कामगिरी शिवाजीकडे पत्र पाठवून दिलेली होती असे स्पष्ट होते.

बाजीचा मुलगा मालोजीराजे घोरपडे याना दरबारने ता. २० ऑक्टोबर सन १६७० रोजी पांच परगण्याचे इनाम दिलेले आहे. त्यात बाजीच्या मृत्यूची हकिगत आलेली आहे. (प. मा. सं. २७२४)

कै. डॉ. बाळकृष्ण यांनी मुधोळकर घोरपडयांचा इतिहास छापलेला आहे तो वाचकांनी अवश्य वाचावा म्हणजे भोसले व घोरपडे यांच्यातील संघर्षाचे अनेक प्रसंग कळून येतील.

## झुंझारराव सर्जेराव घाटगे

खानाबरोबर प्रतापगडच्या युद्धासाठी आलेला दुसरा मराठा सरदार झुंझारराव सर्जेराव घाटगे मलवडीकर हा होय. या वृद्ध इसमाचा व शहाजीचा मोठा घरोबा होता. इतकेच काय सर्जेरावाला शिवाजी महाराज काका असेच संबोधित असत.

घाटगे हे माणनदीच्या काठचे मलवडी या गांवचे देशमुख सरदेशमुख भिल्लम यादवाचे काळापासून होते. मलवडी सध्याच्या माण तहशिलीत सातारा जिल्हयात आहे. युद्धात सर्वदा विजयी होणारा हा वीर प्रतापगडच्या युद्धांत पारगावच्या सैन्य आघाडीला होता. तो कैद झाला आणि शिवाजी महाराजांनी त्याचा सत्कार करून त्याला मलवडीला पोहोचते केले.

घाटग्यांचे राणे फार पुरातन. त्यांच्या पिढ्यान् पिढ्यांचे वीर पुरुष माण नदीच्या तीरावरील खडकाळ डोंगर रांगांच्या कुशीत जन्मले. मलवडी गावात घाटग्याचा बुरुजाचा पुराणा तटबंदीचा वाडा अद्याप जीर्णशिर्ण अवस्थेत उभा आहे. उंच डोंगरांच्या घेऱ्यांत तो शोभून दिसतो. यादव राजांच्या कालच्या अगोदरपासून माण देशाचे देशमुख व सरदेशमुख हे घाटगेच आहेत. भिल्लम यादवाने पूर्वीच्या सनदा कायम केल्या होत्या. बहामनी राजे आले तेव्हा पूर्वीच्या अधिकारात बदल न होता घाटगे दस-हाजारी मनसबदार झाले. या घाटग्यांचा प्रदेश म्हणजे स्वतंत्र राज्यच होते. मुख्य सत्ता नावालाच ते मानीत, आदिलशाहीची स्थापना झाली तेव्हा रामराजा घाटगे स्वतंत्रच होता या कालाच्या अगोदर पासून तो सर्वतंत्र स्वतंत्र होता. नागोजी माने या शूरविराने युसूफ आदिलशहाला मदत केली म्हणून सन १६२६ साली त्याला सर्जेराव हा किताब दरबारने दिला. इनामी गावे मोकासदारी, देशमुखी, सरदेशमुखी असे अनेक अधिकार घाटग्यांना या काळी होते.

सर्जेराव घाटगे हजरजबाबी होता. तो कोणाचीही मुलाहिजा करीत नसे. शहाजी राजांचा जुना जाणता व जिगरदोस्त म्हणून सारा दरबार सर्जेरावाला ओळखीत असे. अफझलखान याला वचकूनच असे. खानाला शहाजी व सर्जेरावाचे जिवाभावाचे नाते माहीत होते. मात्र तो शिवाजीचा चाहता नाही हे खानाला माहीत होते. म्हणूनच वाईच्या तळावर त्याला न ठेवता संभाजीराव काटे व सर्जेराव घाटगे यांचे सैन्यतळ पारगांवच्या पश्चिमेस ठेवण्याबद्दल खानाने हुकूम दिला होता. आघाडीवरच या लोकांना ठेवण्यात हल्ला आलाच तर तो गडावरून येणार व तोंडावर हे सांपडणार असे खानाचे धोरण होते. सर्जेराव लढवय्या होता. त्याच्याशी दोन हात करणे शत्रु सैन्याला कठिण जाईल असेच खानाला वाटले असावे.

शिवाजी कावेबाज आहे. तो धूर्त, बेडर व मुत्सद्दी आहे असे खानाला सर्जेराव वारंवार बजावीत असे. बजाजी निंबाळकरांच्या मायणीच्या तळा-वरील प्रसंगात सर्जेराव व राजे नाईकजी पांढरे यांनी खानाला खडसावलेले होते. म्हणूनच निंबाळकर खानाच्या हातून दंड देण्यावर सुटला होता.

सर्जेराव युद्ध कैदी म्हणून शिवाजी महाराजांपुढे आणून उभा केल्यावर शिवाजीने त्याला बहुमानाने वागविले हे सर्वश्रुत आहे.

## मंबाजी राजे भोसले

आदिलशाहीकडील मातवर सरदारात मंबाजीराजे भोसले हा एक मोठा लढवय्या होता. शिवाजीचा हा चुलत चुलत भाऊ. शिवाजीकडे येऊन मिळालेल्या बाबाजीराजे भोसले यांचा हा सख्खा भाऊ. कल्याण प्रांतात मुरंजन किल्यावरचा हा किल्लेदार होता. मुरंजन मामले मुरंजन कर्यात बदरापूर (बदलापूर) तपे चोण (चौक) (प. सा. सं. २५०३) असे मुरंजन बद्दलचे उल्लेख आहेत. मुरंजन उर्फ कल्याण असा स्पष्ट उल्लेख प. सा स.२५१६) आहे. म्हणजे मंबाजीभोसले हा दुर्गाडीच्या किल्ल्यावर हवालदार असावा. कारण तो किल्ला शिवाजीने बांधून काढल्याचा उल्लेख जेधे करीन्यात आहे. हा किल्ला मिर्झा राजांच्या तहात महाराजांनी मोगलांना दिला होता. (राणाजयसिंग शिवाजी, बेंद्रे पान ४४-४५) व त्याचा ताबा मोगलांनी घेतलाही होता.

मंबाजी भोसले मुरंजनाचा अधिकारी असतांना. बिचाऱ्याला या रणसंग्रामात सत्तेचा सेवक म्हणून यावे लागले. समोर सख्खा भाऊ चाळीस घोडेस्वारासह मार्ग अडवून बसलेला असताना याला चोहोबार्जूनी मराठ्यांचा हल्ला आलेला दिसला. पराजीत होऊन मोरोपंत पिंगळे यांच्या हा आधीन झाला. याच्या सर्व सैनिकांची वाताहत झाली.

महाराजांनी यालाही प्रेमाने वागविले. त्याच्या मर्जीप्रमाणे त्याची रवानगी करून दिली.

## संभाजीराव काटे

संभाजीराव काटे हा एक सरदार पकडला गेला होता. काटे व शहाजी महाराज यांचा घरोबाचा संबंध होता. सुपे परगण्याचे हे देशमुख होते.

घाटग्यांचे राणे फार पुरातन. त्यांच्या पिढचान् पिढचांचे वीर पुरूष माण नदीच्या तीरावरील खडकाळ डोंगर रांगांच्या कुशीत जन्मले. मलवडी गावात घाटग्याचा बुरुजाचा पुराणा तटबंदीचा वाडा अद्याप जीर्णशिर्ण अवस्थेत उभा आहे. उंच डोंगरांच्या घेऱ्यांत तो शोभून दिसतो. यादव राजांच्या कालच्या अगोदरपासून माण देशाचे देशमुख व सरदेशमुख हे घाटगेच आहेत. भिल्लम यादवाने पूर्वीच्या सनदा कायम केल्या होत्या. बहामनी राजे आले तेव्हा पूर्वीच्या अधिकारात बदल न होता घाटगे दस-हाजारी मनसबदार झाले. या घाटग्यांचा प्रदेश म्हणजे स्वतंत्र राज्यच होते. मुख्य सत्ता नावालाच ते मानीत, आदिलशाहीची स्थापना झाली तेव्हा रामराजा घाटगे स्वतंत्रच होता या कालाच्या अगोदर पासून तो सर्वतंत्र स्वतत्र होता. नागोजी माने या शूरविराने युसूफ आदिलशहाला मदत केली म्हणून सन १६२६ साली त्याला सर्जेराव हा किताब दरबारने दिला. इनामी गावे मोकासदारी, देशमुखी, सरदेशमुखी असे अनेक अधिकार घाटग्यांना या काळी होते.

सर्जेराव घाटगे हजरजबाबी होता. तो कोणाचीही मुलाहिजा करीत नसे. शहाजी राजांचा जुना जाणता व जिगरदोस्त म्हणून सारा दरबार सर्जेरावाला ओळखीत असे. अफझलखान याला वचकूनच असे. खानाला शहाजी व सर्जेरावाचे जिवाभावाचे नाते माहीत होते. मात्र तो शिवाजीचा चाहता नाही हे खानाला माहीत होते. म्हणूनच वाईच्या तळावर त्याला न ठेवता संभाजीराव काटे व सर्जेराव घाटगे यांचे सैन्यतळ पारगांवच्या पश्चिमेस ठेवण्याबद्दल खानाने हुकूम दिला होता. आघाडीवरच या लोकांना ठेवण्यात हल्ला आलाच तर तो गडावरून येणार व तोंडावर हे सांपडणार असे खानाचे धोरण होते. सर्जेराव लढवय्या होता. त्याच्याशी दोन हात करणे शत्रु सैन्याला कठिण जाईल असेच खानाला वाटले असावे.

शिवाजी कावेबाज आहे. तो धूर्त, बेडर व मुत्सद्दी आहे असे खानाला सर्जेराव वारंवार बजावीत असे. बजाजी निंबाळकरांच्या मायणीच्या तळा-वरील प्रसंगात सर्जेराव व राजे नाईकजी पांढरे यांनी खानाला खडसावलेले होते. म्हणूनच निंबाळकर खानाच्या हातून दंड देण्यावर सुटला होता.

सर्जेराव युद्ध कैदी म्हणून शिवाजी महाराजांपुढे आणून उभा केल्यावर शिवाजीने त्याला बहुमानाने वागविले हे सर्वश्रुत आहे.

## मंबाजी राजे भोसले

आदिलशाहीकडील मातबर सरदारात मंबाजीराजे भोसले हा एक मोठा लढवय्या होता. शिवाजीचा हा चुलत चुलत भाऊ. शिवाजीकडे येऊन मिळालेल्या बाबाजीराजे भोसले यांचा हा सख्खा भाऊ. कल्याण प्रांतात मुरंजन किल्यावरचा हा किल्लेदार होता. मुरंजन मामले मुरंजन कर्यात बदरापूर (बदलापूर) तपे चोण (चौक) (प. सा. सं. २५०३) असे मुरंजन बद्दलचे उल्लेख आहेत. मुरंजन उर्फ कल्याण असा स्पष्ट उल्लेख प. सा स.२५१६) आहे. म्हणजे मंबाजीभोसले हा दुर्गाडीच्या किल्ल्यावर हवालदार असावा. कारण तो किल्ला शिवाजीने बांधून काढल्याचा उल्लेख जेधे करीन्यात आहे. हा किल्ला मिर्झा राजांच्या तहात महाराजांनी मोगलांना दिला होता. (राणाजयसिंग शिवाजी, बेंद्रे पान ४४-४५) व त्याचा ताबा मोगलांनी घेतलाही होता.

मंबाजी भोसले मुरंजनाचा अधिकारी असतांना. बिचाऱ्याला या रणसंग्रामात सत्तेचा सेवक म्हणून यावे लागले. समोर सख्खा भाऊ चाळीस घोडेस्वारासह मार्ग अडवून बसलेला असताना याला चोहोबाजूंनी मराठ्यांचा हल्ला आलेला दिसला. पराजीत होऊन मोरोपंत पिंगळे यांच्या हा आधीन झाला. याच्या सर्व सैनिकांची वाताहत झाली.

महाराजांनी यालाही प्रेमाने वागविले त्याच्या मर्जीप्रमाणे त्याची रवानगी करून दिली.

## संभाजीराव काटे

संभाजीराव काटे हा एक सरदार पकडला गेला होता. काटे व शहाजी महाराज यांचा घरोबाचा संबंध होता. सुपे परगण्याचे हे देशमुख होते.

यांच्या घराण्यातील वतनाचा तंटा शेवटी शहाजी राजांकडे गेला व त्यांनी तो सोडवून वाटण्या करून दिल्या होत्या. पत्रात शहाजीराजांना याने साहेब म्हटलेले आहे. वाटण्याच्या बाबतीत शामराज नांवाचा आपला हिस्सेदार तक्रार करतो म्हणून काटयांनी लिहिलेले पत्र प्रसिद्ध आहे तें इ. स. १६५१ चे आहे. (प. सा. सं. २६०३)

## सरदार बोंद्रे व सरदार राजे पांढरे

आदिलशाही सैन्यात बोंद्रे व पांढरे हे दोन मोठे मनसबदार होते परंतु त्यांना वाईसच ठेवलेले होते. नेताजी पालकरांचा हल्ला झाल्यावरोबर आपल्या तळावरून हे लोक निघून गेलेले दिसतात. नाईकजी पांढरे यांना राजे पांढरे असा किताब होता. फलटणचे राजे पवार निंबाळकर, डफळा-पूरचे राजे डफळे यांच्या तोडीचे हे घराणे होते. यांच्या एकमेकात नाते-संबंध असावेत म्हणूनच निंबाळकरांवर संकट आले असताना या नाईकजी पांढऱ्याने व झुंजारराव घाटग्याने खानाला समजाऊन दिले व निंबाळकरांची सुटका केली. मानमान्यतेचा असा हा नाईकजी राजे पांढरे शिवाजीला व शहाजीला मानणारा होता. नाईलाजाने तो युद्धात आला होता.

खानाच्या सैन्यात जमलेले लोक सर्व मावळातून आलेले होते आणि केदारजी खोपडयांसारखे शिवाजीकडे जावयाचे नाही म्हणूनच खानाच्या गोटात समाविष्ट झालेले होते. त्यांना घरच्या भांडणाचा सूड उगवून घ्यावयाचा होता इतकेच. खोपडे जेधे यांचा तंटा पुराणा होता.

खानाचे तोफखान्याचे सर्व लोक पठाण होते. लहान लहान तोफा खानाने पार येथे आणलेल्या होत्या बाकीच्या अवघड तोफा वाईच्या तळावरच ठेवलेल्या होत्या. या तोफांचा काहीही उपयोग झाला नाही कारण शिवाजी महाराजांचे लोक ताबडतोब एकाएकी चोहोकडून खानाच्या सैन्याला येऊन विलगले. कोणी कोणाचे ऐकत नव्हते. अशावेळी मुसेखान तोफा भरलेल्या असूनही त्या डागू शकला नाही. कारण त्या तोफांनी

त्याचेच सैन्य जाया होण्याची भिती होती. मुसेखानाने वीरश्रीचे भाषण करून लोकांना ठाम उभे करण्याचे आवाहन केले परंतु त्याचेकडे कोणीही लक्ष दिले नाही.

## फाजलखान

अफझलखानाचा मुलगा फाजलखान हा खंडोजी खोपडयांच्या मदतीने बरोबरच्या तीनशे लोकांसह वाई कऱ्हाडकडे सुखरूप पळाला. खानाचे दोन मुलगे कैदी झाले व त्यांना महाराजांनी सोडून दिले.

फाजलखान पन्हाळचाच्या वेढयांत सिद्दी जोहारबरोबर आदिलशा सेनापती म्हणून आला होता. शेवटी चंदनवंदन किल्ल्यावर तो हवाल ठाणेदार व कारकून हे सर्वाधिकार घेऊन शिवाजीचा सूड उगविण्या आला होता. परंतु त्याच्या नशीबी निराशाच होती. (प. सा. सं. २६६ परळी किंवा सज्जनगडावरही तो हवालदार, ठाणेदार, कारकून या अधिकाराने आला होता. (प सां. सं.) तो चौल प्रांताचा अधिकारी म्हणून काही काळ आला होता. परंतु पित्याच्या वधाचा सूड त्याला उगवून घेता आला नाही.

याशिवाय शिवभारतात मांढरे, खराडे,, जाधव जगताप, प्रतापराव मोरे वगैरे लोक होते. असे लिहिले आहे. ते सर्व देशमुख शिवाजीचे द्वेष्टे होते असे नाही.

## केदारजी व खंडोजी खोपडे बंधू

केदारजी नरसोजी खोपडे व खंडोजी धर्माजी हे उत्रोलीचे देशमुख होते. जेधे व खोपडे यांचे देशमुखीच्या वतनाबद्दल नेहमी तंटे चालू होते. आपसातही ते एकमेकांशी भांडत असत. ता. ८ ऑगस्ट १६४८ चे (प. सा. सं. नं. २५३९) हे पत्र आपणांस त्यांच्याबद्दल माहिती देते. अलीअदिलशहाने केदारजीला कळविल आहे. की ' फत्तेखान खुदावंतखान याला मिळून आपल्या सैनिकांसह कोंडाणा किल्ल्याच्या मसलतीत सामील व्हावे. त्याच्या

आज्ञेत रहावे. खानाच्या लिहिण्यानुसार निष्ठा व्यक्त करावी त्याप्रमाणे उर्जीत होईल या बाबतीत विसर पडण्याचा परिणाम चांगला होणार नाही. तरी तादकी जाणावी.'

याच्या आईला खंडोजीने जिवे मारले व तो हिरडस मावळात शहाजीच्या मुलखात रहावयास गेला. ' केदारजी निष्ठेने चाकरी करीत असल्याने खंडोजीला पकडावा व योग्य शिक्षा द्यावी अशी शहाजी राजाने त्याचा मुलगा शिवाजी यालाही आज्ञा केली आहे. हे पत्र नोव्हेंबर ४ सन १६५० चे आहे. (प. सा. सं. २५७१) हा आदिलशहाचा हुकूम होता.

ता. ४ नोव्हेंबर १६५५ चे आणखी एक पत्र आहे. त्यांत ' खंडोजी खोरी करून विलायती खराब करीत आहे तकशीर करणे बरे नव्हे. रेनी तक्रार केली तर तुमची देशमुखी दुसरेची मऱ्हामत (सुपूर्त) केली जाईल. या हुकमानंतर केदारजी भिऊन गेला. त्याने पातशहाला कळविले आहे की,

'या नीच मनुष्याला नऊजण भाऊबंद आहेत. मी थोरल्या घरचा वडील आहे. सध्याचा हवालदार हा खंडोजीचा पाठपुरावा करतो. शिवाजीचे लोक बरोबर घेऊन खंडोजी माझे इनामगाव अंबोडे लुटून घेऊन गेला. तीन रयत मेले व दहाबारा जखमी झाले. सर्व गाव जळून गेले. मी मुलांसह पळून गेलो शेतकीची अवजारेही राहिली नाहीत. शिवाजीजवळ चार हजार स्वार आहेत. सध्या हवालदार नरसिंगराव सदोबाजी आले आहेत. त्यांना मी भेटलो. दोन माणसे दरबारकडे पाठविली आहेत. ते सांगतील खंडोजी हजर झाला तर मी हजर राहीन. साहेब न्याय देण्यास समर्थ आहेत.'

प्रतापगडच्या युद्धात हा अफझलखानाकडे ससैन्य होता. त्याचा पाडाव झाला व त्याचा शिरच्छेद करण्यात आला ही गोष्ट खरी नाही. ५ सप्टेंबर १६६१ चे पत्र शिवाजीने केदारजीला दिलेले अभयपत्र आहे. तो जिवंत होता. (प. सा. सं. २६५६)

BVBK-0400046